# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० ५ माहे मे सन १८७८ इसवी. | अंक १८


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |


## बुकविक्रीची जाहिरात.

आमचे छापखान्यांत खालीं लिहिलेलीं बुकें विक्रीस आहेत तीं रोख किमतीनें दिलीं जातील.

| बुकाचें नाव. | किंमत. रु. आ. |
|---|---|
| मुंबई इलाख्यांतील मुलकी सर्क्युलरें | ४ |
| क्रिमिनल पोसिजर टिपांसहित | ४ |
| पिनलकोड | १०४ |
| अबकारीचे नियम | ०६ |
| पोलिसाचे रूळ | ०२ |
| बसंतमाला | ०१० |
| रुक्मिणीहरण नाटक | १०४ |
| गोपीचंद नाटक हिंदुस्थानी | ०१० |
| विराटपर्व नाटक | ०१० |
| हरिश्चंद्रसत्वदर्शन नाटक | ०१० |
| सुहास्यवदना | ०८ |
| वालीवध नाटक | ०५ |
| मयूरकृत मंत्ररामायण | १०४ |
| सर्वसंग्रह वेगवेगळ्या कवींचीं आख्यानें | ०८ |
| सर्व संग्रह वामन पंडित कृत भाग १ ला. | ०१० |
| ,, ,, भाग २ रा. | ०१० |
| चतुःश्लोकी भागवत | ०६ |
| नलाख्यान मोरोपंती आर्या | ०३ |
| सिंहासनबत्तिशी हिंदुस्थानी | ०१२ |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०१० |
| रत्नमाला | ०५ |
| वेताळपंचविसी | ०४ |
| ध्रुवाख्यान | ००६ |
| हिंदुस्थानच्या स्थितीवर निबंध | ०१ |
| चक्रव्यूह | ०१०६ |
| व्यंकटेशस्तोत्र | ०१ |
| शिवसहस्रनामावली | ०२ |
| विष्णुसहस्रनामावली | ०२ |
| गायनप्रकाश | ०३ |
| रामनवमी कथा | ०१ |
| भूपाळ्या | ०१ |
| हरिपाठ | ००९ |
| हार्वर्ड कृत इं० तिसरे बुकाचे मराठी भाषांतर | ०१२ |
| धातुरूपावली | ०३ |
| लहान मुलांकरितां मूळाक्षरांच्या गंजिफा | ०२ |
| बालकांकरितां पहिलें पुस्तक | ०१ |
| अंकलिपी | ००९ |
| व्यवहारोपयोगी तारतम्य | ०३ |
| बालज्ञान | ०१०६ |
| हार्वर्ड कृत इं. १ले बुकाचे म. भाषांतर | ०१०६ |
| प्राकृत आरत्या | ०१ |
| स्कुलडायलाग | ०१ |
| काव्यमाधुर्य | ६ |
| सौभाग्यरत्न | ०२ |

## जाहिरात.

NOTICE.

THE BANK OF BOMBAY.

The Khamgaum Branch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 percent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, and upwards other arrangements may be made by addressing the undersigned.

Harry H Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November 1877.

## जाहिरात.

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ०६सहा आणे.

हें औषध गजकरण शिवाय कुरून खरूज, व नायेट यांजवरी चांगले प्रकारें लागू होतें.

** या गजकरणाच्या औषधाच्या डब्या दोन वर्षां पूर्वीं आमचे छापखान्यांत विक्री करितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलीकडे सदहू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी ह्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत ता. १८ एप्रिल सन १८७८ इसवी.

## जाहिरात.

"मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी" स्थापन होण्यास हल्लीं जितके वर्गणीदार पाहिजे होते तितके मिळत आले आहेत याजकरितां कोणत्या प्रकारचे ग्रंथ तयार करावे व ते कोणी करावे, व मंडळीचें आफिस कोणत्या ठिकाणीं असावें वगैरे गोष्टींचो निकाल करण्याकरितां पुण्यांत ता० ११ मे १८७८ रोजीं सभा भरणार आहे. तर सदर तारखेस मराठी ग्रंथकार, वर्तमानपत्रकर्ते व मासिक पुस्तककर्ते यांणीं मेहेरबानी करून सभेस यावें, व येण्यास होईल किंवा नाहीं हें सभेचे तारखेपूर्वीं ३ दिवस अगाऊ कळवावें, व येण्यास सवड न सल्यास मंडळीचे कामाचे संबधानें वगैरे ज्या सूचना करण्यासारख्या असतील त्या लेखी ता. ५ मे सन १८७८ पूर्वीं रावजी प्रभाकर भावे, ट्रान्सलेटर, फर्स्ट क्लास सब जज्ज कोर्ट, पुणें, यांजकडे येऊन पोंहोचतील अशा पाठवाव्या. पुणें तारीख २२ एप्रिल सन १८७८ इसवी.

रावजी प्रभाकर भावे.

## जाहिरात.

तमाम लोकांस जाहिर होण्यास्तव कळविण्यांत येतें कीं, अकोले म्युनसिपाल कमेटीचे हद्दींतील पायखाने सफा करण्याचा व त्याजकरितां लोकांपासून जो ठरावा प्रमाणें कर घेण्याचा तो वसूल करण्याचा मक्ता मुनसिपाल कमेटी देण्यास तयार आहे. ज्यास मक्ता घेण्याची इच्छा असेल त्यांणीं तारीख १२ माहे मे सन १८७८ चे आंत म्यानेजिंग कमेटीकडे अर्ज करावे मक्तया संबधी विशेष माहिती पाहिजे असल्यास म्युनसिपाल अफिसांत कमेटीचे सेक्रेटरी यांजपासी मिळेल कळावे

अकोले ता. १९ एप्रिल १८७८

V. K. Desai.
व्हाईस सेक्रेटरी अकोले म्युनिसिप्यालिटी.

## नोटिसा.

मारुती व परसू वल्लद निवाजी माजेरे रहाणार पास्टुल परगणे पातुर शेखबाबू यास एकुसा चतुरसा लाड दुकान मौजे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे १२ बारा रुपये खात्यावरून येणें त्याचा वायदा टळून गेला सबब नोटिस दिली आहे. तर मुद्दल रुपये १२ व व्याज नोटिस पोचल्यापासून एक महिन्याचे आंत आणून द्यावे. व नोटिसीचा खर्च द्यावा असें न केल्यास तुह्मावर कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां रकम भरून घेण्यांत येईल. कळावें तारीख २९ माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) एकुसा चतुरसा लाड
रहाणार पास्टुल
दस्तुर खुद.

### नोटिस.

मलु वल्लद नारायण पवतकार वस्ती मौजे आगोखेडें परगणे पातुर शे. बा. तालुके बाळापुर यासी येकुसा चतुरसा लाड दुकान पास्टुल परगणे पातुर शेख बाबू याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुजकडे १० दाहा मण जवारी येणें आहे तिचा वायदा टळून गेला अजून दिली नाहीं सबब मुद्दल दाहा मण व तिची वाढ मिळून नोटिस पोंचल्या पासून एक महिन्याचे आंत पाठवून द्यावी. न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां भरून घेण्यांत येईल. कळावें तारीख २९ एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) येकुसा चतुरसा
लाड दस्तुर खुद.

### नोटिस.

रावजी वल्लद तिमाजी नाईक करवते वारस भाउ, हरकु वल्लद तिमाजी रहाणार मौजे कोसगाव तालुके बाळापुर यांस, येकुसा चतुरसा लाड रहाणार मौजे पास्टूल परगणे पातूर शेखबाबु याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुजकडे रुपये ५० पन्नास व व्याज पुरज्यावरून येणें त्यांस दोन वर्षें होत आलीं अजून रकमेचा उलगडा केला नाहीं ह्मणून मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत मुद्दल रुपये व व्याज व या नोटिसीचा खर्च पाठवावा असें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां रकम भरून घेण्यांत येईल, कळावें तारीख २९ एप्रिल १८७८ इ.

[ सही ] येकुसा चतुरसा लाड
रहाणार पास्टुल दस्तुर
खुद.

### नोटिस.

चुनीलाल भागिरथ भैया मुक्काम मुंबई येथें गणेशदास कृष्णाजी यांचे दुकानीं रोकडचे काम पाहातो यास मंगनीबाई भ्रतार बलदेवदास मुक्काम तेल्हार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, दि० मो० नंबर ३४ सन १८७५ यांचे काम चालविण्याकरितां मी तुह्मास जनरल मुकत्यार पत्र दिलें होतें तें अजरोजीं मी रद्द केलें आहे. माझे देण्या घेण्याविषयीं व कोणतेंच कामासंबधी पाहण्याविषयीं तुह्मास अधिकार राहिला नाहीं. माझे नावावर कोठून पैसा घेतल्यास किंवा मालकीसंबंधानें कांहीं काम केल्यास मंजूर केलें जाणार नाहीं कळावें तारीख २८ माहे एप्रिल सन १८७८ मुक्काम अकोला.

( सही ) मंगनीबाई भ्रतार बलदेवदास रहाणार
तेल्हारें.

### नोटिस.

रा. दयाजी वल्लद तपाजी गाळ मौ

कदम मौजे केनवड तालुके वाशीम जिल्हा मजकूर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे सख्खे चुलतभाऊ असतांना तुह्मास संतती होत नसल्या कारणानें तुह्मी दत्तक दुसऱ्या भाऊबंदाचे घराण्यातला मुलगा घेत अहा अशी मजला बातमी कळली त्यावरून तुह्मास या नोटिशीच्या द्वारानें कळवितों कीं तुह्मी दुसऱ्याचे घराण्यांतील दत्तक घेऊ नये. जर तुह्मास दत्तक घेणेंच आहे तर तुह्मी माझे मुलगे २ व माझे भावाचा १ असे तीन मुलगे आहेत त्यांपैकीं जो तुमचे लक्ष्यांत येईल त्या मुलास दत्तक घ्यावें. माझा भाऊ व मी असे आह्मी दोघेजण मुलगा देण्यास राजी आहों अगर तुह्मास आमचे मुलांपैकीं कोणताच मुलगा दत्तक घेण्याचा नसेल तर आपण दुसरी बायको करावी तिच्यापासून संतती झाल्यास आमचा कांहीं प्रतिबंध नाहीं. जर तुह्मी हें अमान्य कराल तर तुह्मावर कायदेवरहुकुम फिर्याद करून आह्मी आपली मालकी व दत्तक घेण्याबद्दल हक्क शाबीद करून घेऊं. कळावें तारीख १४ माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

[ सही ] झेलाजी वल्लद एकुजी गोळे मोकद्दम रहाणार केनवड तालुके वाशीम.

---

नोटिस—हनवंतजी वल्लद कोंडजी गोळे मोकद्दम रहाणार मौजे केनवड परगणे शिरपुर तालुके वाशीम यास खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी आपला मुलगा फकीऱ्या याला दर्याजी वल्लद तपाजी गोळे यास दत्तक देणार अशी बातमी मजला समजली त्यावरून ह्या नोटिशीनें कळवितों कीं, दर्याजी हा तुमचे खुटांतील भाऊ नसून दुसरे खुटांतील ह्मणजे माझे खुटांतील भाऊ आहे. वें त्याजला मुलगा दत्तक देण्याचा अधिकार माझा आहे असें असतां तुह्मी आपला मुलगा फकीऱ्या दत्तक देतां तर तुह्मास दर्याजी याजला मुलगा दत्तक देण्याचा अधिकार नाहीं व तुह्मी मुलगा दत्तक देऊं नये जर तुह्मी आपला मुलगा दत्तक दिलातर कायद्याप्रमाणें तुमचेवर फिर्याद करून दत्तक माघारा फिरवू व फिर्यादीस लागलेला खर्च व नोटिशीचा खर्च भरून घेऊं तारीख १४ माहे एप्रिल सन १८७८ इसवी-

( सही ) झेलाजी वल्लद एकुजी गोळे मुकद्दम. नि. खु.

---

नोटिस—देवजी वल्लद कृष्णा माळी वस्ती मौजे कोंडोली तालुके मंगरूळ पीर जिल्हा वाशीम यास ठमी मर्द देवजी माळी हल्लीं वस्ती मौजे मजकूर तालुके व जिल्हे मजकूर इजकडून नोटिस देण्यात येतें कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमार १० वर्षें झालीं पण अलीकडे या चार वर्षांपूर्वीं तुह्मास महारोगाची भावना होऊन हल्लीं तर तो रोग तुमच्या शरीरांत इतका प्रबल झाला आहे कीं, तेणेंकरून तुमचे हाता पायाचीं बोटें सुजून पायाचें एक बोट फुटलेंही आहे. आतां दुर्धर रोगाचें निवारण होणें तर कठीण खरेंच तथापि प्रयत्नीं परमेश्वर या ह्मणीप्रमाणें कांहीं औषधोपचाराची वगैरे खटपट करून बरें होण्याची तजवीज करणें चांगलें पण तसें तुह्मी कांहींएक करीत नसून स्वस्थ बसला आहा. तेव्हां पुढें तुमचा माझा संसार कसा व्हावा? मला ऋतु प्राप्त होऊन सुमार २ वर्षें झालीं आहेत व सुमार १२ महिने त्यानंतर मी तुह्मा बरोबर काढिलेही पण रोग अधिकाधिक होऊं लागल्यावरून एक वर्षापूर्वींपासून मी तुह्मापासून अलग आहे आतां या नोटिशीनें इतकेंच कळवावयाचें कीं, ही नोटिस पावल्यापासून तीन महिन्यांच्या आंत तुह्मी औषधोपचारानें बरें होऊन मला वागवावें अगर या मुदतींत तुह्मी नीट झाला नाहीं तर मला सोडचिठ्ठी द्यावी. सोडचिठ्ठी न दिल्यास कायद्याप्रमाणें तुमचा नवरेपणाचा हक्क रद्द करून दुसरा गंधर्वाचा घरठाव करीन ह्मणून करणें तें लवकर करावें कळावें तारीख ४ माहे मे सन १८७८ इसवी.

( सही ) ठमी मर्द देवजी माळी इचे हातची निशाणी नांगडी

---

नोटिस

देवजी वल्लद ढोनमाळी रहाणार कवठे तालुके मंगरूळपीर व तिमाजी वल्लद रावजी माळी रहाणार कसबे खडीधामणी तालुके मंगरूळपीर या उभयतांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी उभयता माझे अनुक्रमें लग्नाचे व गंधर्वाचे पति आहां. तुह्मी उभयताही मजवर हक्क चालवितां पण मला वागवून सांभाळ एकाकडूनही रीतीप्रमाणें होत नाहीं. व मी निराधार मेहनत मजुरी करून आपलें पोट भरतें. ह्मणून या नोटिशीनें मी तुह्मा उभयतांस असें कळवितें कीं, ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत तुह्मी उभयतां मला फारकती लिहून द्याव्या. कारण पहिल्यानें सात वर्षें टाकून दिल्यामुळें मला गंधर्व करणें भाग पडलें. पण माझ्या दुर्दैवानें हें गंधर्व ही गैरकायदा झालें व त्याबद्दल दुसऱ्या नवऱ्यानें सजाही भोगिली. तेव्हां आतां माझा संसार तुह्मा उभयतांकडूनही होणें नाहीं व तुह्मासही मजपासून उपयोग घेऊं शकत नाहीं. ह्मणून तुह्मी फारकती द्याव्या हें उत्तम आहे. याप्रमाणें तुह्मी मुदतीचे आंत न केल्यास तुह्मा उभयतांचाही नवरेपणाचा हक्क कायदेशीर रीतीनें रद्द करीन व या कामास लागणारा खर्च तुह्मापासून भरून घेऊन नवीनच गंधर्वाचा तिसरा घरठाव करून संसार करीन. कळावें तारीख ४ माहे मे सन १८७८ इसवी.

( सही ) सोनी मर्द देवजी व तिमाजी माळी रहाणार पेठ खुदाबंदपुर मंगरूळपीर इचे हातची निशाणी नांगडी.

---

नोटिस.

महादू वल्लद शिवाजी गायगोळ रहाणार वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडुन नोटिस देण्यांत येतें कीं, सालबंदीचे रुपये ३०० चढलेले ते आह्मी तुह्मास दोन वेळा मागितले असतां तुह्मी देतों देतों ह्मणतां पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून १५ दिवसांचे आंत रुपयांचा निकाल करावा. न केल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद केली जाईल. कळावें तारीख ३ माहे मे सन १८७८ इसवी.

[ सही ] चुनीलाल बनसीलाल रहाणार वडनेर दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

पंढरी वल्लद विठोबा कासार रहाणार वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे दुकानची खाते बाकी तुह्माकडे असून ते रुपये तुह्मी देत नाहीं व हिशेबही करीत नाहीं. तर ही नोटिस पावल्यापासून १० दिवसाचे आंत हिशेब करून रुपये द्यावे न दिल्यास नोटिशीचे खर्चासहित रुपये घेतले जातील कळावें तारीख ३ मे सन १८७८ इ.

( सही ) चुनीलाल बनसीलाल रहाणार वडनेर दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

गोविंदा वल्लद गिरी तेली रहाणार वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मास शेत कर्जदारींत दिलें होतें तें शेत पांच वर्षें आमचे कबजांत असून हल्लीं त्या शेतावर तुह्मी काम करण्याकरितां जातां तर तुह्मी शेतांत जाऊं नये. आमचा निकाल १५ दिवसांचे आंत करावा. निकाल न केल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद केली जाईल. निकाल केल्याखेरीज तुह्मी शेतांत जाऊं नये. कळावें तारीख ३ मे सन १८७८इ.

[सही] चुनीलाल बनसीलालसाहू र. वडनेर भोलजी दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

शंकर वल्लद गिरी तेली रहाणार वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येतें कीं तुह्मी आह्मास शेत कर्जदारीमध्यें दिलें होतें. तें शेत पांच वर्षें आमचे कबजांत असून हल्लीं त्या शेतावर तुह्मी काम करण्याकरितां जातां तर तुह्मी शेतांत जाऊं नये. आमचा निकाल नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत करावा. निकाल न केल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद केली जाईल. निकाल केल्याखेरीज तुह्मी शेतांत जाऊं नये.कळावें. तारीख ३माहे मे सन १८७८ इसवी.

(सही) चुनीलाल बनसीलाल साहू. र० वडनेर द० खुद्द.

---

नोटिस.

सदु वल्लद गोविंदा तेली रहणार वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येते कीं, आमचे दुकानची रकम तुमचेकडे घेणें आहे व त्या बाकीचा अजून निकाल होणें आहे. करितां तुह्मास ही नोटिस देण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत रुपयांचा निकाल करावा. असें न केल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद केली जाईल. कळावें तारीख ३ माहे मे सन१८७८ इसवी.

[सही] चुनीलाल बनसीलाल साहु र. वडनेर भोलजी द. खु.

---

नोटिस.

वेडू वल्लद चाहादाजी माळी वस्ती वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचेकडेस आमची बाकी येणें आहे तर त्याचा निकाल ही नोटिस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत करावा या मुदतींत निकाल न केला तर शिरस्त्याप्रमाणें फिर्याद करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख ३ माहे मे सन १८७८ इसवी.

( सही ) चुनीलाल बनसीलाल रहणार वडनेर दस्तुर खुद्द

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुध्द ३ शके १८००

## लढाई

याही आठवड्यांत लढाईविषयीं निकराचें वर्तमान नाहीं. हिंदुस्थानांतून फौजा जाऊं लागल्या आहेत व विलायतेंतही व्हालंटियर पलटणी भरण्याची गडबड सुरू आहे तरी पण ही सर्वतयारी युद्धाची नव्हे, अगाऊ बंदोबस्ताची होय असें स्टेट सेक्रेटरी यांनीं एके प्रसंगीं बोलून दाखविलें. हिंदुस्थानांतून लढाईकरितां उत्साहानें हिंदू शिपाई येत आहेत त्यांची विलायतचे लोकांनीं व सरकारानें फार तारीफ केली. जर्मनीचा बादशहा उभय राष्ट्रांची लढाई होऊं नये ह्मणून मध्यस्ती करीत होता पण त्याचें कांहीं चालत नाहीं असा आतां एक बूट निघाला आहे. —आस्त्रिया देश तुर्कस्थानांतील कांहीं प्रांत मागत होता तें त्याचें गाणें अजून संपलें नाहीं. बोसनिया व हरजिगोविना या प्रांता बद्दल तो पुन्हा उचल करणार असें वर्तमान आलें आहे.—रशियाची फौज कानस्टंटिनोपल जवळ आहे तेथें थोड्या दिवसांपूर्वीं तिची व तुर्की फौजेची गोळागोळी झाली. व तींत ८० लोक जखमी झाले. हें छांटूं प्रकरण काय असेल तें समजत नाहीं. रोमेलियांतील मुसलमान लोकांच्या बंडाची उठावणी तर दिवसें दिवस अधिक आहे. व त्याचा मोड करण्याचें काम त्या भागास हल्लीं असलेल्या रशियन फौजेकडून होत नाहीं. अमेरिकेकडून वर्तमान आलें आहे कीं रशियन लोकांचे एका लढाऊ जहाजानें कांहीं हालचाल केली आहे. व मार्मोरा समुद्रांतील इंग्लिश लढाऊ जहाजेंही थोडथोडी हालचाल करीत आहेत. म्यांचेस्टर एथील स्वस्थता इच्छिणार लोकांची सभा भरली होती तींत ते ह्मणाले कीं स्वस्थतेच्या कामास ब्रिटिश सरकार आडवे येत आहे हें चांगलें नाहीं व हिंदुस्थानांतील फौज लढाईवर आणावी हेंही चांगलें नाहीं.

तिसऱ्या तारखेची लंडनची तार सेंटपिटर्सबुर्ग एथें अशी बातमी असल्याविषयीं आली आहे कीं कोणाच्या मध्यस्थी शिवाय प्रत्यक्ष इंग्लंड व रशिया यांचे तहाचे बोलणें व्हावें असा घाट रशियास मानवला आहे. व समेटीच्या शेवटाचे विचार चालू आहेत.

याप्रमाणें या आठवड्यांत तारेतील वर्तमानें आहेत.

---

## होळकर सरकार व माळवा अखबार.

माळव्यांत होळकरांचें राज्य आहे. इंदूर त्यांच्या राजधानीची जागा. तेथें वर्त-

मानपत्रांची पांच पंचवीस वर्षे वस्ती असावी असें दिसतें. होळकर सरकार मोठ्या दक्षतेनें स्वतां राज्यकारभार चालवितात अशी त्यांची ख्याति आहे. त्यांनीं नुकतीच आपल्या राजधानींतील माळवा अखबार नावाच्या वर्तमानपत्रकर्त्यास ३, महिन्यांच्या कैदेची शिक्षा दिली असें वर्तमान कित्येक पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. पण त्याच्या खरेपणाविषयीं आह्मास संशय वाटतो. व नुकतेंच एक थोर गृहस्थ इंदुर दरबारचे चांगले माहितगार आह्मास भेटले त्यांचे सांगण्यांत आलें कीं ही गोष्ट खरी नसावी; तथापि त्याच्या पुढेंही टाइम्समध्यें आह्मी ही बातमी पाहिली व गुजराथमित्र पत्रांत तिच्या संबंधानें टीका झालेली पाहिली यावरून खरी गोष्ट कशी काय असेल समजत नाहीं. या शिक्षेला कारण लिहितात कीं त्या पत्रांत एक मजकूर छापलेला आहे व प्रेस संबंधी नवा कायदा करण्यास साधक असे जे उतारे कायदेकौन्सला पुढें ठेविले त्यांत या पत्राचाही उतारा ठेविला गेला आहे. यावरून असा मजकूर छापणारास शिक्षा असावी असें होळकर सरकारास वाटून त्यांनीं पत्रकर्त्यांस कारागृहांत पाठविलें ह्मणतात.

कित्येक नेटिव वर्तमानपत्रांतील निवडून काढिलेले सुमार ३०।४० मजकूर कायदे कौन्सलच्या माहितीकरितां योजिलेले गेल्या मार्च महिन्यांतील एका टाइम्समध्यें छापले आहेत ते आह्मी पाहिले पण दुर्दैवाची गोष्ट कीं त्यांत माळवा अखबारचा मजकूर नाहीं ह्मणून त्यांत काय होतें व तो इतक्या शिक्षेच्या योग्यतेचा होता किंवा नाहीं तें समजत नाहीं. तरी तें कसेंही असो. होळकर सरकारानीं पत्रकर्त्यास कैदेची शिक्षा जर खरोखरी दिली असेल तर ती फाजील दिली असें ह्मणणें भाग आहे. कारण खुद्द इंग्लिश सरकारानें देखील इतर पत्रकर्त्यांतून कोणास असा नीच प्रसाद दिला नाहीं, फार झालें होतें तर होळकर सरकारानीं त्या पत्रकर्त्यास मुचलका मागावयाचा होता किंवा त्याचें पत्र बंद करावयाचें होतें. ह्मणजे मराठीशाही शोभती.

दुसरें असें कीं हे जे उतारे प्रसिद्ध झाले आहेत ते कित्येक महिन्याच्या मागचे आहेत ह्मणून ज्या वेळीं हा मजकूर प्रथम माळवा अखबारांत आला त्या वेळींच तो इतका भयंकर होता तर सरकारास किंवा त्याच्या मुत्सद्दी लोकास तो कसा समजला नाहीं, व तेव्हांच त्या विषयीं कांहीं तजवीज त्यांनीं कां केली नाहीं, याजबद्दलही लोकांस आश्चर्य वाटण्यासारखें आहे.

होळकर सरकार केवळ इंग्रज सरकारच्या कृपासंपादनार्थ एवढें दुश्राव्य कृत्य करील असें आह्मास वाटत नाहीं आणि इतर प्रकारचें कांहीं खरें कारणही बाहेर निघत नाहीं ह्मणून आह्मासही त्याविषयीं कांहीं अधिक लिहितां येत नाहीं त्यास निरुपाय आहे.

---

**रशियाची फौज**— एका इंग्लिश वर्तमानपत्रांत लिहिलें आहे कीं, रशियाच्या बादशहाची फौज १९४६०० आहे. ह्मणजे फील्ड ७५९०००, पहिला रिझर्व १११०००, दुसरा व शेवटचा रिझर्व ९०००००, व कासाक १८००००, याप्रमाणें आहे. या शिवाय कारण पडल्यास सार्‍या राष्ट्रांतील लोक शस्त्रधारी होऊन युद्धास यावे अशी त्यांची व्यवस्था आहे. तसें ह्मटलें ह्मणजे आठ कोटि प्रजेत तीन कोटि स्त्रिया व दोन कोटि मुलें आणि ह्मातारे वजा करून बाकी च्यार कोटि पुरुष समयास लढाईस सिद्ध होतील असें ह्मणतात.

ही फौजेची गोष्ट झाली पण एवढ्या खटाटोपास खर्च किती पाहिजे व रशिया देशाची पैशाची स्थिति कशी आहे हें पाहिलें ह्मणजे कांहीं विलक्षण तऱ्हा मनांत येते. टर्कीची व रशियाची लढाई तारीख १२ एप्रिल सन १८७७ पासून ता० ४ मार्च सन १८७८ पावेतों ह्मणजे ३२२ दिवस चालली तिजकरितां त्यास एकंदर ८० कोटि रुबल खर्च झाले. यांत निम्याहून अधिक रक्कम कर्ज काढलेली आहे. व टर्कींत असलेली फौज माघारी न्यावयाची झाल्यास तिला ६ कोटि रुबल खर्च येईल व कर्जाचें व्याज दरसाल साडेचार कोटि रुबल आकारलें जाईल या मानानें पाहिलें असतां आतां रशियास इंग्रजाबरोबर लढण्यास पैशाची वगैरे मदत मिळविणें व शिणलेली फौज पुन्हा रणभूमीवर आणणें ह्मणजे नरा पंचाईतीचेंच काम आहे व आमच्या प्रबल इंग्लिश सरकाराशीं गाठ आहे. त्यांचा नवा दम, पैसा विपुल, व सोयी चांगल्या ह्मणून रशिया माघार घेतो किंवा सज्ज होऊन उभाच रहातो तें पाहिलें पाहिजे.

---

**प्रेस आक्ट**— बंद व्हावा या बाबदींत मोठी गडबड चालली आहे. विलायतेंत पार्लमेंट सभेंत लवकरच हा विषय निघणार आहे, शिवाय विलायतेंत असलेल्या सर्व हिंदु गृहस्थानीं सभा करून या कायद्याच्या भयंकर स्वरूपाचा विचार केला व त्याजबद्दल पार्लमेंट पुढें तें प्रकरण चालविणार. पुण्यास २ हजार लोक जमून मोठी टौनहॉल सभा भरली व पांच तास या गोष्टीचा विचार झाला व विलायतेस दाद लागावी असा ठराव झाला. कलकत्यास ५ हजार लोकांची सभा भरून तेथून नुकताच अर्ज गेला आहे. "पांचा मुखीं परमेश्वर" या ह्मणीप्रमाणें या लोकांच्याप्रयत्नीं परमेश्वर उभा राहो व त्यांस यश देवो असें आह्मी इच्छितों.

## वऱ्हाड.

हिंदुस्थान सरकारच्या या आठवड्याच्या ग्याझेटांत छापून आलें आहे कीं, मि० ए जे डनलप हैदराबाद असाईनी मुलखाचे थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस तारीख २५ आक्टोबर सन १८७७ इसवी पासून क्या० ट्रेव्हर साहेब रजेवर आहेत तोंपर्यंत रेसिडेन्ट साहेबांचे आफिसांत वऱ्हाडचे सेक्रेटरी या हुद्यावर नेमिलें.

---

उमरावतीचे डिपुटी कमिशनर मि० हार्डेन रजेवर गेले कारणानें पुढें लिहिल्याप्रमाणें नेमणुका झाल्या.

लेफटिनेंट कर्नल एच सी मेंजिस फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर यांस थर्ड क्लास डिपुटी कमिशनर नेमिलें.

मेजर डी डब्ल्यु लाटण सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर हे फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

मि० एच एस निकोलेट्स थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर हे सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

मि० आर डी हेर यांस थर्ड क्लास असिस्टंट कमिशनरचे कामीं कायम केलें.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, अकोल्याच्या मंडळीनें कैलासवासी वामनराव बाळाजी ओझरकर याजबद्दल कृतज्ञतापूर्वक कांहीं स्मारक कृत्य करावें असें मनांत आणून या आठवड्यांत त्याकरितां एक सभाही भरविली व तींत सर्वानुमतें तसें घडावें असा ठराव झाला. मंडळीचा बेत वर्गणी जमवून तिच्या व्याजांतून एथें हायस्कूल परिक्षेचे प्रसंगीं उत्तम ठरेल अशा मुलास दर वर्षास कांहीं बक्षिस देत जावें व येणेंकरून त्यांचे नाव अमर करावें असा आहे. आह्मास याविषयीं अधिक लिहावयाचें होतें पण आज सवड नाहीं. वामनरावास एक लहान मुलगा आहे व त्यांचें घराणें अगदी गरीब स्थीतींत आहे ह्मणून जमणारी रकम त्याच्या मुलाच्या विद्याभ्यासाकडे लावण्याचें किंवा कुटुंबास देण्याचें ठरविलें असतें तर बरें होतें. अस्तु. अजूनही मंडळी त्यास सहाय करितील असा आह्मास भरवसा वाटतो व त्याप्रमाणें लवकर घडावें अशी आमची इच्छा आहे.

---

रा. रा. वामनराव कृष्ण देशमुख डायरेक्टर साहेबांचे हेड क्लार्क अडीच महिन्याची हक्काची रजा घेऊन मुंबईस गेले आहेत.

---

रा. रा. रामचंद्र धोंडदेव एथील स्टेशन मास्तर परत आले. त्यास खामगावास पाठवून एथें कोणी युरोपियन स्टेशन मास्तर आणणार असें वर्तमान आहे.

---

इलिचपुरास क्या० मेकंजी साहेब याचे प्रयत्नानें लोकांनीं वर्गणी जमवून तेथें एक छोटासा टौनहाल बांधण्याचा विच्यार केला आहे हें एकून आह्मास संतोष होतो. व साहेब बहादुरांचे सदुद्योगास आह्मी चहातो. वर्गणीची रकम २५०० व अवांतर जमा ५०० मिळून ३००० रुपये लोकांचे आहेत तर सरकारानें कृपाळु होऊन तीन हजार रुपये यांत भरीस घावे ह्मणजे काम चांगलें होईल, अशाविषयीं रेसिडेन्ट साहेबांकडे नुकताच तेथील मंडळीकडून अर्ज झाला आहे. त्याप्रमाणें ती रकम त्यास मिळो व तें काम लवकर तयार होवो असें आह्मी इच्छितों.

---

जुडिशियल कमिशनर साहेबांचे सेकंड क्लार्क रा. रा. वासुदेव सदाशिव पिंसोळकर हे रजेवर जाण्याकरितां चिखलदऱ्याहून एथें आले आहेत ह्मणून रा. रा. भास्कर सखाराम क्लार्क आफ दि कोर्ट यांस जु. कमिशनर साहेब यांनीं बोलाविल्यावरून ते शुक्रवारीं तिकडे गेले.

---

नागपुरास "फणींद्रपुरमणिप्रकाश" या नावाचें गेल्या आठवड्यापसून वर्तमानपत्र निघूं लागलें आहे हें पाहून आह्मास संतोष झाला. नागपुरास वर्तमानपत्राची फार अवश्यकता होती. यास चांगला आश्रय मिळो व हें दीर्घायु होवो असें आह्मी इच्छितों.

---

अकोल्याचे हायस्कूल व ट्रेनिंग कालेज यांतील विद्यार्थ्यांचे सोयीकरितां एथें बोर्डिंग ह्मणजे भोजनशाळा आहे हें आमचे वाचकांस माहित असेलच. ही उत्तम खानावळीचीच तऱ्हा आहे ह्मणजे मुलांचे पैसे घेऊन मुलांस जेवावयास घालावयाचें पण हायस्कुलावरील अधिकाऱ्यांचे पैरवीनें व इतर कांहीं तजविजीनें एथें व्यवस्था चांगली राखतां येते व मुलांचे आरोग्यावर नजर ठेवितां येतें. ह्मणून हें बोर्डिंग सरकारानें मुद्दाम विद्याखात्याकडे दिलेलें आहे. असें असतां कांहीं प्रसंगीं एथें या प्रकरणीं बरीच गडबड होते असें कानावर येतें व त्याचप्रमाणें या सुटीच्या आरंभास प्रकार झाला असें समजतें. ह्मणजे कित्येक मुलांस आयते वेळीं जेवावयास न घालतां हाकून दिलें व त्यामुळें कित्येक विद्यार्थ्यांचा उपासमार झाला व कित्येकांचे मोठे हाल झाले. व अशा भर उन्हाळ्यांत दोन प्रहरीं नदीवर त्यांस हातानीं अन्न शिजवून खावें लागलें. व कित्येकांस आगंतुकी करावी लागली याविषयींची सविस्तर हकीकत मागच्या आठवड्यांतील उर्दू अखबारांत लिहिलेली पहावी. याचें कारण असें कळतें कीं, त्या मुलांनीं शनिवारीं रात्रीं संस्कृत भाषेंत विद्वज्जनांस एक उत्तम नाटक करून दाखविलें त्याकरितां उपाशी मारणें ही त्या मुलांस बोर्डिंगाकडून बक्षिशी मिळाली! अरेरे! बोर्डिंगाच्या सुपरइंटेंडेंटाचें व त्यावर पैरवी ठेवणाऱ्या मास्तरांचें हें करणें केवळ अयोग्य होय. मुलांस उपाशी हाकून देण्याचा त्यास कांहीं हक्क नव्हता. कोणी रात्री घरीं निजावयाचे, ते कथेस गेलें ह्मणून खानावळवाल्यानें त्यास जेऊं घालीत नाहीं ह्मणावयाच्या तोडीचेंच हें कृत्य होय. आतां हा दृष्टांत थोडा हलका आहे. तरी कृत्याचा प्रकार त्याहून गौण आहे. कारण खानावळवाल्याचें मन उत्तम विद्येनें याच्या इतकें प्रकाशित झालें नसतें. अस्तु. या गोष्टीची चौकशी व्हावी व या पुढें असा प्रकार न व्हावा अशाविषयीं बंदोबस्त करण्याचें ज्यांचें काम असेल त्यांनीं या कामीं लक्ष पुरवावें असें आह्मी इच्छितों.

## वर्तमानसार.

बेंगाल्यांत कलकत्ता येथील दुसऱ्या नदरांत शत्रूच्या लढाऊ तारवांस येतां न यावें ह्मणून बंदरांतून टार्पीडोज ठेवण्याची तजवीज चालली आहे. टार्पीडोज ठेवण्याचीवगैरे व्यवस्था पहाण्याकरितां क्यापटन डल्ड हे कलकत्यास पोंचले असें कळतें.

भागलपुरच्या तुरुंगांत लोकरीचीं वस्त्रे तयार करण्याचे कारखाने मांडावयाचे आहेत त्यांकरितां माहितगार इंजिनियर ५ वर्षांची बोली करून विलायतेहून आणण्याचा विचार झाला आहे.

स्वीडन देशचे नांगर मद्रास इलाख्यांत आणिले आहेत व ते इकडे चांगले लागूं होतील असें ह्मणतात; आणि तसें झाल्यास ते इकडेच तयार करविण्याची योजना करावी लागेल कारण त्या नांगराचा नमुना इंग्लिश नांगराजवळ जवळ आहे व तिकडून नांगर आणण्यास खर्च फार लागेल.

हली टेलिग्रम पत्राच्या बहयना एथील बातमीदारास जनरल इग्नेटिफ यांनीं असें कळविलें आहे कीं, लढाई होण्यास कांहीं क्षुल्लक देखील कारण दिसत नाहीं व लढाई झालीच तर याचा निकाल ताबडतोब होणार आहे. सानस्टिफानो एथील तहाच्या वेळेस ग्रेटब्रिटन व आस्त्रिया यांच्या हितास बिलकूल धक्का बसूं नये अशाविषयीं नेहेमीं खबरदारी घेत असे.

डाका एथील शाळेचे सब डेपुटी इन्स्पेकटर बाबू काली नारायण यांनीं सरकारी पैसा खाल्याबद्दल त्यांस २ वर्षें सक्तमजुरीची कैद व २०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली.

## "हिंदुस्थानची जमा वे खर्च."

मि० लटमन जान्सन सर जार्ज क्यांबेल यांचे माजी प्रायव्हेट सेक्रेटरी व आसामच्या कमिशनराचे सध्याचे सेक्रेटरी या गृहस्थानीं 'हिंदुस्थानचा जमाखर्च' या नांवचे एक पुस्तक लिहिलें आहे त्यांत ते आरंभीं लिहितात कीं, 'या देशाच्या राज्यव्यवस्थेचा परिणाम त्याच्या जमाखर्चावर आवलंबून आहे. आमच्यानें ही व्यवस्था करण्यास जीं साधनें उपलब्ध आहेत त्याच्या योगानें जर ती होत नाहीं तर आह्मी आमची चूक कबूल केली पाहिजे. व तो देश सोडून देण्यास तयार झालें पाहिजे.' प्रत्येक इंग्लिशमन जो या देशांत कांहींना कांहीं अधिकारावर आहे त्यास मि० जान्सन ह्मणतात कीं, 'वर लिहिलेला विचार ध्यानांत ठेवणें जरूर आहे व ज्या अर्थी नेटिव लोकांचा त्यांच्या जमाखर्चाच्या बाबतींत अभिप्राय घेतला जात नाहीं. त्याअर्थी सरकारी कामदारांनीं त्यांच्या हिताकडे विशेष लक्ष देणें आवश्य आहे.' आह्मांस वाटतें या मारुल्याच्या विचारांस आमचे अधिकारी लोक आपल्या अंत: करणांत स्थल देतील तर इंग्लिश सरकारचा अंमल या देशांत आहे त्यापेक्षां विशेष प्रियकर होईल. असो मि० जान्सन यांणीं या जमाखर्चाच्या बाबतींत फार उत्कृष्ट माहिती मिळविली आहे व त्यावर चांगलें लक्ष देऊन विचारही केला आहे असें त्यांच्या लिहिण्यावरून दिसून येतें. साहेब महसुफ यांणीं या देशाच्या उत्पन्नाचें वर्गीकरण खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—

१. सुमारें पांचतेरांश उत्पन्न साऱ्यापासून आहे.
२. सुमारें दोन तेरांश खंडणी पासून
३. दोन तेरांशांहून कांहीं जास्त अफू वगैरे पासून.
४. सुमारें दोन तेरांश उत्पन्न कांहींएक खात्यांचा खर्चवेंच भागून बाकी शिल्लक राहते तें.
५ तीन तेरांश उत्पन्न करांपासून आहे.
६ या करांपासून उपजणाऱ्या पैशापैकीं सुमारें दोन तृतियांश पैसा मनुष्याच्या जीवितास अवश्यक अशा पदार्थांवरील करांपासून उत्पन्न होतो.

याचप्रमाणें मिस्तर जन्सन यांणीं खर्चाच्या बाबीचें वर्गीकरण केलें आहे तें येणें प्रमाणें:—

१. दोन सप्तमांश खर्च सरकारी कामदारांच्या पगाराकरितां.
२. एक चतुर्थांशापेक्षां किंचित् कमी देशाच्या बचावाकरितां ह्मणजे लष्कर वगैरे करितां
३. एक षष्टमांशाहून कांहीं जास्त खर्च जहागिऱ्या. देवस्थानें, पेनशनें वगैरे करितां.
४. एक विसांश खर्च ज्या खात्यांची प्राप्ती त्या खात्यांच्या खर्चाकरितां पुरत नाहीं अशा करितां.
५. सुमारें एक दशांश खर्च फायदेशीर सार्वजनिक कामाकरितां.
६. सुमारें एक दशांश खर्च सार्वजनिक सुधारणा करितां.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांच्या उत्पन्नाच्या मानानें त्यांचा खर्च पाहिला असतां दर शेकडा खालीं लिहिल्या प्रमाणें आहे.

| | | |
|---|---|---|
| आयोध्या | ३३ | टक्के |
| मध्यप्रांत | ४० | ,, |
| ब्रिटिश बर्मा | ३३ | ,, |
| आसाम | ४९ | ,, |
| बंगाल | ३२ | ,, |
| वायव्यप्रांत | ३५ | ,, |
| पंजाब | ३७ | ,, |
| मद्रास | ३० | ,, |
| मुंबई | ४५ | ,, |

बंगाल्याविषयीं जान्सन साहेब लिहितात कीं, 'यांत इंग्रजी अंमल अगदी आरंभीं झाल्यानें या प्रांताचें उत्पन्न सरकारास दुसऱ्या प्रांताच्या खर्चाकडे लावावें लागलें त्यामुळें त्यांतील व्यवस्था फारच काटकसरीनें ठेवावी लागली. दुसरें असें कीं, 'या प्रांतांत जमीनीचा सारा घेण्याचें वारंवार ठरवावें लागत नाहीं. या कारणानें तो वसूल करण्यास इतर प्रांतांपेक्षां फार थोडा येतो.' यानंतर साहेब महसूफ यांणीं इंग्लंड व हिंदुस्थान या उभय देशांतील लोकांचीं व त्यावरील कराच्या ओझ्याची तुलना केली आहे त्यावरून असें कळतें कीं जरी इंग्लडच्या लोकांवर या देशांतील लोकांपेक्षां कराचें ओझें विशेष आहे, तरी इकडील लोकांपेक्षा तिकडील लोकांची प्राप्ती विशेष आहे, ह्मणजे या देशांतील दर मनुष्यास दरसाल सरासरी सहा शिलिंग (३ रु.) मिळतात व इंग्लडांतील दर मनुष्यास तीन पौंड ह्मणजे तीस रुपये मिळतात. यावरून इंग्लंडच्या लोकांपेक्षां या देशांतील लोक किती दरिद्री आहेत याचा विचार करण्यास दूर जाणें नको. मिस्तर जानसन ह्मणतात कीं, 'या देशाच्या राज्यव्यवस्थेच्या खर्चांत काटकसर झाली पाहिजे' व "या देशाचा खर्च कमी केला पाहिजे किंवा सध्यां जें उत्पन्न होतें तें वाढविण्यास उपाय योजिले पाहिजेत. यातून कोणतें विहित आहे याचा विचार करणें पार्लमेंट सभेकडे आहे. कारण हिंदुस्थानांतील अधिकारी आपली किफायत आपल्याच हातानें कापण्यास पहातील अशी इच्छा करणें निरर्थक आहे." तथापि जानसन साहेब सरकारास एक गोष्ट लक्षांत ठेवण्यास सूचना करितात ती ही कीं "जागा पाहून पाय पसरावे." या देशांत सांप्रत जें युरोपियन लष्कर आहे तें थोडेंसे कमी करावें व लष्करी खात्यासंबंधीं बराच खर्च कमी करावा दिवाणी खात्यांतही खर्च कमी करावा असें साहेब मजकूर याचें मत आहे. साहेब बहादूर ह्मणतात कीं, आपला देश सोडून परदेशांत रहाण्याची जी गैरसोय आहे व ज्या अडचणी आहेत त्या मनांत आणल्या असतां युरोपियन लोकांस त्याच्या खर्चाकरितां मोठे पगार देणें जरूर आहे हें खरें आहे; परंतु या देशांत सांप्रत युरोपियन कामदारांची जी संख्या आहे ती कमी करण्याचा विचार केला पाहिजे व त्यांच्या जागीं नेटिव लोक नेमण्याची तजवीज झाली पाहिजे. अलीकडे युरोपियन कामदारांची संख्या फारच वाढली गेली आहे. कितीएक जागा अशा आहेत कीं, त्या युरोपियन लोकांनींच भरल्या पाहिजेत; परंतु कितीएक अशा आहेत कीं, त्या नेटिव लोकांस देण्यास कांहीं अडचण नाहीं. साहेब महसूफ विचारतात कीं, पब्लिक वर्क्स खातें, जंगल खातें, मेडिकल खातें पोलिस खातें, तसेंच अफीण पिकविण्याचें व विकण्याचें खातें—या खात्यांत इतके युरोपियन असण्याची काय जरूर आहे? युरोपियन अकौंटंट कशाकरितां पाहिजेत? जुडिशियल खात्यांतील मुनसफांच्या वगैरे जागा नेटिव लोकांकरितां केल्या आहेत पण त्यांतही युरोपियन लोक बरेच नेमले गेले आहेत. युरोपियन लोक ज्या पगारावर नोकरी करितात त्याच्या तिसऱ्या हिशावर नेटिव लोक मोठ्या खुशीनें नोकरी करितील व जेथपर्यंत आमचे फिनान्स मिनिस्टर युरोपियन पाहिजे-तिकडे युरोपियन व नेटिव पाहिजेत तिकडे नेटिव नेमण्याची तजवीज करणार नाहींत. तेथपर्यंत या देशांतील राज्यव्यवस्थेचा खर्च कमी होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे.

अ. द.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

### श्लोक

वसंतीं पुष्पांचा परिमल जनाला वश करी।
अनायासें येतें कुसुमविशिखाच्या यश करीं॥
मदाच्या धुंदीनें न युवति युवे रात्रि दिवस।
प्रमदा जाणूनी रतिसुखचि घेती बहुवस
॥ १४ ॥
निश्चया हालवी पालवी ती मना।
कालवी गौरवा मालवी, स्त्री जना॥
घालवी त्याकडे, जो पती वांकडें।
गर्वभारें वदे, यापरी स्त्री नडे॥ १५॥
बागांमाजि सरोवरें प्रतिसरीं
अब्जें बहू शोभतीं।
पराब्जीं मधु बिंदु दाटति, तया
एकैक बिंदूप्रती॥
संघें येउनि भृंग झोंबति, तया
एकैक भृंगाप्रती।
होती मंजुल गुंज नाद, मग त्या
एकैक नादाप्रती॥ १६॥
अत्युन्माद विलासिनी जनमनीं
थारा करी, बावरें।
तें होतां, समयज्ञ मन्मथ शरें
त्याला करी घाबरें॥
तेव्हां नायक आर्जवेंहि करुनी
जो श्रांत झाला असे।
त्यातें टाकुनि मान, याचिति कृपा
कांता, न तें चित्त्वंसे॥ १७॥
पवन मृदु दिनांतीं, वाहती मेघमाला— ।
परि दिसति तमालाम्रादिपंक्ती विशाला॥
विजचि गणिति त्यांला, ज्या तयांमाजि बाला।
रिघति पिउनि हाला कंदुकक्रीडनाला
॥ १८॥
अणिक जन लफंगे जाति घेऊनि मेवा।
रमविति गणिका त्यां गायनें नर्तनें वा॥
पिक अणि शिखि त्यांच्या सद्गुणींदाविहेवा।
करिति इतर भावें कामदेवाचि सेवा॥ १९॥
हरिणगणहि तेथें कूदती त्यक्तभीती।
शुक पिक तरुखंडीं हिंडती मंजु गीतीं॥
चरुनि सुरभि रानीं घेति तेथे विसांवा।
लढतिहि परि नाहीं त्यांत अन्योन्य दावा
॥ २०॥
करि परवृषभांचा भंग युद्धप्रसंगीं।
विखरि ढुंकडे जो टेकडे तीक्ष्ण शृंगीं॥
भयद पृथु जयाची भव्य मूर्ती विराजे।
घन चिखल विषाणीं देपला फार साजे
॥ २१॥
नयन युगुल ज्याचे पूज्य गुंजाफळाला।
पावि कठिन खुरानी कर्षि जो भूतळाला॥
मुख अवनितळाशीं नेउनी गर्जता जो।
जन ह्मणति घनाची गर्जना यास लाजो
॥ २२॥

### आर्या

ऐसा महोक्ष कळपीं।
एकचि तो पाळितो पशुकदंबा।
करुणा अभिमान मनीं,
धरुनि जशी अनुचरास जगदंबा
तो सर्वांमागुनि ये,
धेनुकदंबीं वसे, मिटी डोळे।
रंवत करी, सुसकारे,
टाकी ज्याच्या पुढें झुडुप लोळे

### श्लोक

नमुनि अणिक ठायीं वत्स ते एकमेकां।
हटविति निकरानें दाविती फार हेका॥
थकुनि विव्हळ कोणी जाय धावोनि माते।
प्रति मग ममतेनें चाटिये ती तयाते २५
सजवुनि डफ वेणू खंजिरी ढोल चाळ।
भरुनि परम रंगीं गाति गोपाळ बाळ॥
जणु अनुभविली हो गोकुळीं कृष्णलीला।
ह्मणुनि सरसताही प्राप्त या मंडळीला २६
( पुढें चालू. )

हे पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ — अकोला, रविवार ता० १२ माहे मे सन १८७८ इसवी. — अंक १९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साळअखेर | ७ |
| फिरकोळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लो-काकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

NOTICE

THE BANK OF BOMBAY.

The Khamgaum Branch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 per-cent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, and upwards other arrangements may be made by addressing the under signed.

Harry H Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November

## कृष्णाकुमारिकाव्य.

( मागील अंकावरून पुढे चालू. )

श्लोक

ऐशा रम्य चमत्कृती विविध या
जेथें सदा वर्तती ।
ज्या उद्यानगणें समावृत उदं-
पुर प्रकाशे भर्ती ॥
तेथें वास करी प्रसन्नहृदयें
लक्ष्मी, तयाची सरी ।
अन्या नाहिं, ह्मणोनि वर्णिल कसी
साकल्य हो हा तरी ॥ २७ ॥

आर्या.

उपवन शेवलवलयें
परिवृत पुरतें सहस्रपत्र, कर्ती ।
ह्मणतां, त्याची हर्ये
ती पत्रे, हे गणूं नये अनृती ॥२८॥
नृपसदन कर्णिका ती,
ह्मणुनि जिचे शंकरादिही दास ।
ती मोठ्या ममतेनें
तेथें कमलालया करी वास ॥ २९ ॥

श्लोक.

पुर तें विशाल पुरतें विलोकुनी ।
सुर तेहि सर्व झुरतेसि सांडुनी ॥
स्मरतो मनांत, मुरती निकेतनीं ।
ह्मणुनी दुराप जणु त्यास मेदिनी ॥३०॥
लोक स्वस्वाधिकारें जपुनि विचरती
त्यक्तमर्याद नाहीं ।
कोणी तेथें, न शोकाकुल, न गद नसे
दस्युची भीति कांहीं ॥
राजे प्रेमें प्रजाला जनक, परिजना
भासती मित्र, मित्रा ।
बंधूचि, ज्ञानशौर्यादिखिल वश तया
ज्ञात नाहींच भित्रा ॥ ३१ ॥
त्यांचे वैरी तयाला ह्मणति जणु महा-
रुद्र हे सर्वभक्ष ।
ते राजे चारचक्षू न समय चुकती
नीतिशास्त्रांत दक्ष ॥
व्यूहीं वा लक्ष्यवेधीं अकुशल भितरा
नाहि त्यांच्या बळांत ।
तेणें त्यांचा दरारा सतत पसरला
सर्व भूमंडळांत ॥ ३२ ॥
व्यसनहीन धृतिस्मृतिशांतिमान् ।
विगतमोह अलोलुप कांतिमान् ॥
नर सुरूप युवे मतिसागर ।
करिति तें अधिकार, न पामर ॥ ३३ ॥
सभासद जनांसह व्यवहृतीं अर्थी बोधुनी ।
विवादपदपद्धतें स्वतां सकल पाहतो शोधुनी
पुरोहितमतें विनिर्णय करूनि दंड्या नग
करीत नृपदंड ते, अळस ज्यां न वा न खरा
॥ ३४ ॥

अशा सौराज्यानें
सतत निजकर्त्योत्सुक जन ।
स्वकर्तव्यां साधी,
मिळवि बहु लोकांत बजन
अशा चौदा विद्या
द्विज, इतर चौसष्टीहि कळा
तशा संपादूनी
मिरविति यशा ते अविकळा ॥ ३५ ॥

( पुढे चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेला मजकूर सर्वांस कळावा अशी इच्छा आहे.

एथील ई. म. स्कुलाची परिक्षा दरसाल होऊन पास झालेल्या मुलांस पुस्तकें बक्षीस दिलीं जातात त्याप्रमाणें साल मजकुरीही मुलांची परिक्षा होऊन सुमार ४॥ रुपये किमतीचीं पुस्तकें बक्षीस देण्याकरितां सरकारांतून आलीं होतीं. त्यावरून रा. रा. रामचंद्र विनायक चिपळूणकर हेडमास्तर यांनीं एक यादी करून ता. १४ रोजीं रीतीप्रमाणें पाठविली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं सूचनेप्रमाणें सर्व सरकारी नोकर, वकील मंडळी, गांवांतील संभावित गृहस्थ, शेटसावकार, वगैरे लोक शाळेंत येऊन सभा भरली.

अध्यक्षस्थान मि० बापूजी रंगनाथ ए. अ. क. यांनीं स्वीकारलें. नंतर सरकारांतून आलेलीं पुस्तकें फार थोडीं असल्यावरून अध्यक्षांनीं सर्व सभासदांचे अनुमोदनानें वर्गणी करून सुमारें ३० रुपये जमाविले. त्यापैकीं आठ रुपये किमतीचीं पुस्तकें जास्त देऊन, मुलांची परीक्षा घेऊन व कांहीं सुरस कविता ह्मणवून त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांस बक्षिसें दिलीं. व दोन रुपयांची मिठाई वाटली. बाकी राहिले रकमेंतुन शाळेकरितां एक तास व घड्याळ आणवावें ह्मणून विचार झाला आहे.

याप्रमाणें सभासद मंडळी वर्षांतून निदान तीन वेळ जमून विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली तर मुलांचे अंगीं सभाधीटपणा येऊन त्यांच्या विद्वत्तेची चांगले प्रकारें वृद्धी होईल. व तेणेंकरून ती स्वहितासही पावतील. आणि आपासून सभासद मंडळीचे कीर्तीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होईल. त्याचप्रमाणें विद्याभ्यास शिकविणारे मास्तर लोकांसही आपले कामांत जास्ती मन घालण्यास उत्तेजन येईल वगैरे विषयावर रा. रा. केशव भास्कर कर्णिक यांणीं बरेंच भाषण केलें. नंतर रीतीप्रमाणें पानसुपारी, अत्तर गुलाब, वगैरेची व्यवस्था रा. रा. रामचंद्र विनायक हेड मास्तर यांनीं केली होती ती देणें झाल्यावर हेड मास्तर यांणी सर्व मंडळीचे वर लिहिलेल्या मदती बद्दल या शाळेच्या संबंधानें आभार मानून सभा विसर्जन झाली.

वर्गणीदारांचीं नांवें खालीं लिहिल्याप्रमाणें

| | रुपये |
|---|---|
| रा. रा. बापुसाहेब ए. अ. क. | १ |
| ,, ,, आपासाहेब देशपांडे | २ |
| ,, ,, गणेश दाजी वकील | २ |
| ,, ,, गोपाळ नारायण वकील | २ |
| ,, ,, कृष्णराव गणेश वकील | २ |
| ,, ,, विठ्ठल गंगाराम वकील | १ |
| ,, ,, शेट कुंजीलाल मारवाडी | २ |
| ,, ,, नरहरपंत बवा देशपांडे | १ |
| ,, ,, रंगो जनार्दन शिरस्तेदार | १ |
| ,, ,, सखारामपंत स्पे० स० र० | १ |
| ,, ,, रामचंद्र विनायक हे. मा. | १ |
| ,, ,, नारायण रामचंद्र वकील | १ |
| ,, ,, मोरो गणेश वकील | १ |
| ,, ,, विष्णू रामचंद्र वकील | १ |

आठ आणे देणारे वर्गणीदार १६ इसम व चार आणे देणारे ६ एकंदर मिळून १० रुपये.

एक फिरस्ता
क्ष.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपल्या पत्रीं जागा द्याल असें समजून थोडा मजकूर लिहितो.

एडिटर महाराज सर्व हिंदू मध्यें आर्य लोक अगर ब्राह्मण लोक श्रेष्ठ वर्णाचे गणले जातात हे सर्वांस विदित आहेच. भिक्षुक लोकांमध्यें बापाचें नाव लिहितांना पूर्वी बिन या शब्दाचा उपयोग करितात, तसा गृहस्थामध्यें करीत नाहींत. याप्रमाणेंच शूद्र वर्णाचे लोकांमध्येंही बिन या शब्दाचाच उपयोग करितात. तेव्हां त्याजमध्यें अर्थभेद असणें जरूर आहे. तो कोणता हें जर आपण आपल्या पत्रद्वारें कळवाल तर फार चांगलें होईल.

महाराष्ट्र देशाचा इतिहास पाठ करते वेळेस सहज प्रश्न निघतो कीं शिवाजी राजा रजपूत असतां मराठ्यांच्या मुलीशीं त्यानें विवाह कसा केला! व तसें आतां केल्यास चालेल काय ? व न चालेल तर त्याचे कारण काय ! दक्षिण प्रांतांत कित्येक मराठे लोक आह्मी क्षत्रिय आहों असें समजतात तें त्यांचे ह्मणणें खरें कीं काय ? व ते क्षत्रिय कसा वरून गणल्यानें याजबद्दल आपले वाचकांतून कोणी माहिती कळविल्यास महत् उपकार होतील.

वऱ्हाडांत अफिणीचा पेरा आज कित्येक वर्षांपासून चालू असतां व त्यापासून सरकारास कोणत्याही प्रकारें त्रास नसतां तो आतां एकदम बंद केला. यापासून शेतकरी लोकांचें मोठें नुकसान आहे. वऱ्हाडामध्यें अफूचा रोजगार बराच मोठा असून अफूही चांगल्या जातीची निपजते. दुसरें उत्पन्न कापूस या शिवाय कांहीं होत नाहीं. हेच मुख्य दोन पदार्थ परदेशी जाणारे आहेत. इकडील लोकांस जे पदार्थ आपल्या देशांत नाहींत ते दुसरी कडून आणून कसे निपजतात ते पहावे याजबद्दल कोणाही मनुष्यास जिज्ञासा नाहीं ह्मणून बराच देशाचा तोटा होत आहे.

वऱ्हाडांतील शाळाखात्यांत एक नवीन चाल सुरू झाली आहे ती येणेंप्रमाणें:— दर वर्षीं ज्या प्रमाणें युनिव्हर्सिटीच्या परिक्षा होत असतात त्याप्रमाणें इकडे इयत्तेच्या परिक्षा होतात. व ४ थे इयत्तेंत जी मुलें पास होतात त्यांस मिडल क्लास स्कुलांत जाण्यास सांगतात आणि त्यांस काढून टाकावें लागतें असा क्रम दर वर्षाचा असल्यामुळें प्रत्येक वर्षी शाळा बाल्यावस्थेस येती व ती पुन्हा आपल्या पणांत ये यास ४।५ महिने लागतात. इतक्या वाळांत कोणी एखाद्या अधिकाऱ्यानें परिक्षा घेतल्यास तिचा परिणाम चांगला दिसून येत नाहीं. दुसरें, डेपोमध्यें बुकेंही जितकीं मिळावीं तितकीं मिळत नाहींत ह्मणून खालच्या वर्गांतील मुलांचा अभ्यास कोता होतो. अद्यापपर्यंत वऱ्हाडांतील लोकांस विद्येची गोडी लागली नाहीं. त्यांजवर हा एक जुलूम आहे असें ते समजतात. शाळेस मुलें कमी झालीं ह्मणजे मास्तर कामाला लायक नाहीं, लोकप्रिय नाहीं अशा प्रकारचे दोष वरिष्ठ अधिकारी देतात याशिवाय

नास्त कांहीं करीत नाहींत. नियमितपणें मुलें आल्यास अभ्यास चांगला होणार नाहीं असें नाहीं; कारण बहुतेक मास्तर लोक परदेशांतून पोटाकरितां आले आहेत, मग ते मेहेनत कशी करणार नाहींत? स्कुलकमेट्या ज्या आहेत त्या तर फक्त नावाच्याच आहेत. कळावें ता. ४।५।७८ इ.

एक क्ष.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुध्द १० शके १८००

## विधवांचें वपन.

अलीकडे शास्त्रग्रंथ पूर्वी पेक्षां बऱ्याच अधिक लोकांचे पहाण्यांत येतात त्या मुळें त्यांतील कित्येक अयोग्य गोष्टींविषयीं लोकांस वाईट वाटतें व त्यांच्या सुधारणेविषयीं ते काळजी बाळगतात. व कित्येक गोष्टी तर अशा आहेत कीं त्यांस शास्त्रांत म्हणण्यासारखा थारा नाहीं व लोक व्यवहारांतही त्या अति अप्रयोजक दिसतात म्हणून त्यांविषयीं शास्त्रंशास्त्र म्हणून जें उगीच बंधारण झालें आहे तें दूर व्हावें व लोकांचा समज सुधारावा या गोष्टीचें फार अगत्य आहे.

आज आह्मी या निबंधास जें सदर घातलें आहे त्याचाही प्रकार असाच आहे म्हणून समजण्यांत आलें आहे. म्हणजे विधवांचें वपन झालेंच पाहिजे असा शास्त्राधार नाहीं. व विधवांचे पुनर्विवाह व्हावे अशाविषयीं शास्त्रसंमती असतां ती गोष्ट लोकांनीं बाजूस टाकिली व तद्विपरीत उगीच एक केराकचऱ्यासारखें वाक्य लोकांनीं अत्यादरें मान्य करून त्याच्या आधारानें लक्षावधि तरुण विधवांचे कराकर केश कापण्याची रुढी सुरू केली आहे. ही गोष्ट खरोखर अत्यंत शोचनीय आहे. तरुण विधवांचे त्यांच्या इच्छेविरुद्ध जुलुम जबरीनें केश काढणें व त्यांस विद्रूप करून संदीत टाकणें हें समंजस मनुष्यास अत्यंत निंद्य व लाजीरवाणें आहे यांत संशय नाहीं. म्हणून शास्त्राचें प्रमेय समजून ही रुढी यापुढें तरी आपले देशांतून नाहींशी होईल तर सर्व देशसुधारणेच्छु लोकांस अत्यानंद होईल.

ज्ञानप्रकाशाच्या कोल्हापुरकर एका विद्वान लिहिणारानें असें प्रसिद्ध केलें होतें कीं विधवावपनाला शास्त्राधार नाहीं. त्यावर किरण पत्राच्या तुळजापुरकर बातमीदारानें लिहिलें कीं विधवावपनास धर्मसिंधुसार व वृद्धपाराशर यांत आधार आहे. त्यावर कोल्हापुरकरानीं स्पष्ट लिहिलें आहे कीं सदहूं ग्रंथांत विधवावपन संबंधानें शास्त्रवचनें आलीं तीं कोणत्या शास्त्रग्रंथांतून आलीं तें दाखवावें. म्हणजे धर्मसिंधुसार हा ग्रंथ जुन्या शास्त्र ग्रंथांतून निवडक वेंचे घेऊन लिहिलेला आहे तो स्वतंत्र शास्त्र ग्रंथ नव्हे. श्रुतीस व स्मृतीस अनुसरून हिंदुधर्माचें शास्त्र आहे आणि श्रुतींत म्हणजे वेदांत विधवांचें वपन सांगितलें नाहीं, त्याचप्रमाणें स्मृती पाहिल्या तर मनु, अत्री, हारीत, याज्ञवल्क्य, उशना, अंगिरा, यम, आपस्तंब, संवर्त, कात्यायन, ब्रहस्पती, पराशर, व्यास, शंखलिखित, दक्ष, गौतम, शातातप, वशिष्ठ इतक्या ग्रंथकारांच्या शास्त्ररूप मानिल्या आहेत. आणि त्या तितक्यांतही विधवांच्या वपनाविषयीं कोठें सांगितलें नाहीं. असें कोल्हापुरकर गृहस्थ स्पष्ट म्हणतात, असें जर खरें आहे तर लोकांनीं या नासदाग त्याच्या गोष्टीचा विचार करूं नये काय? अवश्य करावा.

दुर्दैवानें बहुत लोकांच्या मुलीवर, सुनांवर, व भगिनींवर विधवा होण्याचे दुःखदायक प्रसंग येतात पण विधवांचें वपन झालेंच पाहिजे असा शास्त्रांत निग्रह नसेल तर या हजारो लोकांनीं या पुढें तरी आपल्या पोटच्या गोळ्याच्या केशावर तें दुष्ट शस्त्र चालवावें काय? व त्यांस विद्रूप करावें काय? नाहीं. तें मना होण्याची तजवीज करावी.

धर्ममार्ग प्रवर्तक शंकराचार्य जगद्गुरु आहेत व लोकरूढींत अलीकडे ते बऱ्याच सुधारणा करीत आहेत याजकारितां त्यांस आमची विनंती आहे कीं त्यांनीं या गोष्टीविषयीं लोकांस स्पष्ट शास्त्र सांगावें. व सकेशा विधवा राहिल्या असतां त्या अमंगळ नाहींत या शास्त्र बीजाचें घोषण गावोगांव करीत जावें म्हणजे देशावर त्यांचे मोठे उपकार होतील. विलायतेस जाणें निर्दोष आहे असें त्यांनीं एक दोन उदाहरणांनीं सांग्या देशांत जसें गाजवून सोडलें तसेंच सकेशा विधवा सर्व धर्मकर्मास विहित आहेत हें शास्त्रमत स्वामींनीं सकळ जगतांत श्रुत करावें व तशी वहिवाट सुरू होऊं द्यावी.

पांच पंचवीस वर्षांमागच्या गोष्टी आह्मांस ठाऊक आहेत कीं, त्यावेळीं शंकराचार्यांचा सकेशा विधवांवर मोठा कटाक्ष असे. गावांत शंकराचार्य येणार अशी बातमी मिळाली कीं, त्या बिच्याऱ्या दहापांच कोस कोठें पळून जाऊन लपून रहावयाच्या. कारण त्या गावांत राहिल्या तर सोवळ्या करविण्याविषयीं स्वामीचा तगादा लागे. व तसें झालें नाहीं तर कांहीं द्रव्यदंड स्वामीस द्यावा लागे. तो काळ बदलत बदलत आतां अगदीं बदलला आहे. आतां कित्येक सकेशा विधवा पन्नास पन्नास साठ साठ वर्षांच्या वयाच्या होत्सात्या करडे झालेले आपले केश उत्तम प्रकारें सावरून शंकराचार्य स्वामी गावांत असतां खुशाल रस्त्यानीं हिंडतात तेव्हां त्यांचें जें पहिलें सक्तीचें भय आतां नाहींसें झालें आहे व दंडाखंडाचाही कोठें बोभाट नाहीं असें दिसतें. याचें कारण, शास्त्रविधी मनांत आणून स्वामीनीं मौन धारण केल्याचें, असल्यास उत्तमच आहे पण तें लोकांत प्रसिद्ध करण्याची अवश्यकता आहे म्हणजे सर्वत्र तसा प्रकार पडेल व सर्व लोकांस दुःखांतही कांहीं सुख होईल.

देशाचे परम कनवाळु व लोकहिता साठीं झटणारे एक गृहस्थ आपले देशांत आहेत त्यांनीं लोकहितवादी अशा आपल्या नावानें बहुत ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यांत 'निबंध संग्रह' म्हणून एक बाराशे पृष्ठांचा ग्रंथ आहे त्यांत एके ठिकाणीं शास्त्रकर्त्यांविषयीं त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, त्यांच्या थोड्याही चुकीनें हजारो लोकांचा मोठा नाश होतो यासाठीं ते मोठ्या योग्यतेचे पाहिजेत. कोणी गरीब ब्राह्मणानें आदि पुराणांत विधवा स्त्रियांच्या केशवपनाविषयीं एक श्लोक लिहिला आहे, त्याला त्यावेळेस तो लिहिण्याचें कोणतें मोठें प्रयोजन पडलें किंवा लोकांचा मोठा आग्रह दिसला असेल तो असो. पण त्या श्लोकानें केवढा अनर्थ केला! त्या एका श्लोकाचे आधारानें लक्षावधि स्त्रियांचे केश उकिरड्यावर किंवा खिंडींत टाकले जात आहेत! ज्या केशास सुगंधीक तेलें लावावयाचीं, ज्यांवर रत्नजडीत फुलें शोभावयाची, ज्यांवर शेवंत्यांचे व शालकोड्यांचे कांठ फडकून त्यांची मयूरा सारखी छाया दिसावयाची, ज्यांत रेशमाचे व कलाबतूचे गोंडे व मोत्यांची बिंदी चमकावयाची, व ज्यानीं मुख चंद्राचा सतेज आणि प्रफुल्लीत शोभा वाढवायाची; ते केश प्रयागास देखील प्राप्त होणें अशक्य असे अश्रूंच्या जलानें व बाप भाऊ आई बहिण यांच्या धाकानें परकीय नापिका कडून त्याच्या उग्र शस्त्रानें चरचर कापावे अशी दुर्दशा अपराधावाचून बिच्याऱ्या स्त्रियांस कशानें प्राप्त झाली म्हणाल! तर त्या अविचारी व निर्दय ब्राह्मणाच्या एका श्लोकानें! अरेरे!

## अक्कलकोटकर स्वामींची समाधि.

आह्मांस लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं आमचे अक्कलकोटकर स्वामीमहाराज समाधिस्थ झाले. अलीकडे सुमार पंध्रा वीस वर्षे यांच्या ठिकाणीं लोकांची भक्ती विशेष बसली व तिचें मान प्रतिवर्षी वाढत जाऊन हल्लीं केवळ कळसास गेलें होतें. त्यांचें स्वैर व अकृत्रिम वर्तन, निर्लोभ वृत्ती, वयमान, लोकश्रद्धा आणि आगगाड्यांच्या योगानें मार्गाची सुलभता हीं ईश्वरेच्छेनें त्यांच्या प्रसिद्धीस उत्तम कारणें झालीं व त्या योगें स्वामी महाराजांचस्तोत्र साऱ्या हिंदुस्थानांत आबाल वृद्धांचे मुखीं झाले होतें. व ज्या त्या प्राण्यास त्यांच्या दर्शनाविषयीं लालसा असे. सबब असा मोहरा आमच्यांतून गेला हें आमच्या देशाचें नष्टचर्य होय यांत संशय नाहीं यांचें मरण ऐकून यांस जाणणारा कोणी हळहळला नाहीं असा विरळा, रामदास, तुकाराम प्रभृति सत्पुरुष मानाकेंत यांची गणणी करण्यास कांहीं हरकत नाहीं. यांनींही अद्भुत चमत्कार बहुत केले व यांच्या दर्शनाचे नवसाचे बहुत कामुक जनांस प्रत्यय आले अशाविषयीं ख्याति आहे. म्हणून यांच्या हयातींत जर यांची इतकी कीर्ति होती तर ती यांचे पश्चात शतपट वाढेल यांत संशय नाहीं कारण मागील ओघ असाच आहे कीं साधू सत्पुरुषाची कीर्ति त्यांचे पश्चात अधिक वाढत असते.

या मूर्तीचा मूळ देश, जाति, घरवगैरे कोठें होतें याचा पत्ता नाहीं. तसेंच ते विशेष कोणाशीं बोलत नसल्यानें त्यांच्या वाणीस संस्कार, विद्वत्ता, बहुश्रुतपणा इत्यादि विषयींही कांहीं समजण्यांत आलें नाहीं. त्यांचें वय ८० वर्षांचें होतें. कांती फार सतेज पक्क निंबापरी असून पुरुष धिप्पाड, हाड मोठें व शक्ती चांगली असल्यामुळें ती मनोहर मूर्ती पाहिल्या बरोबरच अंतःकरणांत गढून जात असे. वृत्ती जरी फकीरी बाण्याची असे तरी मोठाले भाग्यशाली व राज्यपदस्थ पुरुष जे सुखोपभोग भोगितात ते त्यांस नित्य असत व त्यांच्या दुःखाचा अथवा काळजीचा यांस विटाळ नसे हेंच ईश्वरी साक्षात्काराचें त्यांत मध्यें बीज होतें व अशाच प्रकारावरून कोणास बरवा अवतारी सिद्ध साधू सत्पुरुष असें म्हणण्याची रुढी आहे व हे त्याप्रमाणें म्हणवून घेण्यास अधिकारी होते यांत संशय नाहीं.

गेले मंगळवारचे मागील मंगळवारीं म्हणजे चैत्र वद्य १३ रोजीं दोन प्रहरीं चार वाजतां अक्कलकोट मुक्कामीं वटवृक्षाखालीं यांचें देहविसर्जन झालें. हे एक वर्षभर आजारी होते व शेवटच्या आठवड्यांत त्यांचा आजार फार वाढला होता असें समजतें. अरेरे! सत्पुरुषासही व्याधीनें व काळानें सोडिलें नाहीं! हें पाहून आह्मी क्षुद्र मानवानीं विवेक करून दुष्ट कृती व पापवासना सोडाव्या म्हणजे ईश्वर कृपाकरून कांहीं यातना कमी केल्यास करील.

आतां दक्षिणेंत आमचे विख्यात सत्पुरुष महाराज यशवंतराव महादेव देव मामलेदार एकटे राहिले आहेत त्यांस कृपाळु परमेश्वरानें दीर्घायु करावें व व्याधि निर्मुक्त ठेवावें. देव मामलेदाराची माणुसकी, नम्रता, धर्मनिष्ठता, उल्हास हीं त्या महाराजापेक्षांही वरच्या प्रतीतील आहेत व एकंदरीत हीहि कोटि असाधारण व दैविक आहे सबब सर्व भाविक लोकांचे आल्हादार्थ हे बहुत कालमर्याद वांचोत असें आह्मी मनापासून इच्छितों.

फिर्याद करणारास शिक्षा — मुंबईचे अॅक्टिंग पोलिस कमिशनर यांनीं आपणासी मारहाण केली अशाबद्दल मि. जोसेफ डाटी या नावाच्या मनुष्यानें मि. डोसाभाई फ्रामजी माजिस्ट्रेट यांजकडे फिर्याद केली होती या मुकदम्याची हकीकत अशी कीं; मि. डाटी यास दारू विकण्याचें लायसेन्स पाहिजे होतें. म्हणून तो पोलिस कमिशनरचे आफिसांत गेला तेव्हां सर सूटर साहेब पोलिस कमिशनर व मि. विनसेंट त्यांचे असिस्टंट होते. सूटर साहेबानीं डाटी यास सांगितलें कीं दारूचे लायसेन्स जितके कमी देववतील तितके द्यावे असा सरकारचा हुकूम आहे. शिवाय भगिन खात्याच्या अधिकाऱ्याकडून लिहून आलें आहे कीं, आमच्या आसपास अतिशय दारूचीं दुकानें झालीं आहेत सबब या दोन कारणां

वरून तुह्मास लायसेन्स देता येत नाहीं. हें ऐकून डाटी साहेब माघारे गेले व नंतर कांहीं तासानें परत आले आणि मि. विनसेंट साहेब यांस ह्मणाले कीं आह्मास दुसरे प्रकारचें लायसेन्स घावयाचें आहे त्या करितां पोलिस कमिशनरची भेट पाहिजे. विनसेंट साहेब ह्मणाले त्यांची भेट आतां होणार नाहीं- विलायतची डाक जाण्याचा आजचा दिवस आहे, उद्यांक सुटी आहे, आणि पो० कमिशनर हे रजेवर जाणार आहेत इतक्या कारणामुळें त्यांची आतां भेट होणार नाहीं. डाटी साहेब आग्रहानें ह्मणाले कीं त्यांची भेट झालीच पाहिजे. पुन्हा विनसेंट साहेबांनीं सांगितलें कीं भेट होणार नाहीं तुह्मी जावें. परंतु तें न ऐकतां डाटी साहेब तेथेंच उभे राहिले व गडबड करूं लागले तेव्हां विनसेंट साहेबांनीं कानस्टेबलाला हाका मारून याला दरवाज्या बाहेर काढून दे असें सांगितलें. तरी ते गेले नाहींत. तेव्हां साहेबांनीं स्वतां येऊन त्याचा आंगरखा धरून त्याला दरवाज्याशीं पोंचविलें, याजबद्दल डाटी साहेबांनीं फिर्याद केली होती. तिचा सर्व साक्षी पुरावा पडतां माजिस्ट्रेट साहेबाची खात्री झाली कीं विनसेंट साहेबांनीं जें वर्तन केलें तें योग्य केलें व फिर्यादानें स्वतां आगळीक केली असून उलट आपणच फिर्याद केली. सबब मुकदमा डिसमिस केला व फिर्यादीस १० रुपये दंड करून तो विनसेंट साहेबास देवविला. व विनसेंट साहेबांनीं ते रुपये लागलेच धर्मादाय दिले.

खरेंच, या प्रकरणांत फिर्याद करण्याजोगें कारण नसून व विनसेंट साहेबांनीं केवळ सभ्यपणानें अर्जदारास जबाब दिला असतां त्यानें दुराग्रह दाखवून आपला अपमान करून घेतला आणि पुन्हा त्याच्या कोर्टांत 'हात दाखवून अवलक्षण' व्हावें तशी आपली फजीती व नुकसान करून घेतलें सबब तशा मनुष्यास जी शिक्षा झाली ती योग्य होय. व तशा प्रकारच्या तर्कटी मनुष्यानीं असले ढंग करण्यापासून सावध रहावें ह्मणून उदाहरणार्थ ही गोष्ट आह्मी आपले पत्रांत दाखल करितों.

**सिविल सर्व्हिस**— अशी एक संतोषाची बातमी निघाली आहे कीं, सिविल सर्व्हिसच्या ज्या जागा आहेत त्यांत नेटिव लोकांचा प्रवेश फार थोडा होतो तो पाहून अधिक व्हावा अशी कांहीं सबब योजून हिंदुस्थान सरकारानें विलायत सरकारास गेले महिन्यांत विस्तारयुक्त आपला अभिप्राय कळविला आहे. आतां तिकडून त्या विषयीं कसा काय जबाब येतो पहावा. बहुत लांबच्या कालापासून या गोष्टीची वाटाघाट चालू आहे. व आमचे लोकांनीं सिविल सर्व्हिसींत आपला अधिक प्रवेश होण्यास परीक्षेचें स्थल बदलण्याची व वयाची यत्ता वाढविण्याची वगैरे तजविजी योजाव्या ह्मणून सरकारास अनेक अर्ज केले. व शेवटीं विलायतेंत खटपट करण्याकरितां कलकत्याकडून बाबु सुरेंद्रनाथ ब्यानरजी हे हुशार व उद्योगी मनुष्य आपला धंदा सोडून नुकतेच गेले आहेत व पार्लमेंट सभेस कित्येक अर्जही झाले आहेत त्यावरून तिकडे चर्चा सुरू असेलच, व विलायतेंतील बहुत दयाळु लोक हिंदुस्थानचें कल्याण चाहतात सबब ते आमच्या कल्याणाविषयीं तजवीज होण्यांच कामीं ते अधिक लक्ष देतील व हिंदुस्थान सरकारचाही अनुकूल अभिप्राय याच समयास इकडून गेला असल्याची सुवार्ता निघाली आहे तेव्हां हें महत्कार्य बऱ्याच अंशीं आपले हितास अनुकूल असें घडून येवो असें आह्मी सोत्कंठ इच्छितों.

**हिंदुस्थानची विलायतेंत कीर्ति**— फ्रान्स देशाचें राजधानी शहर पारीस एथें गेले आठवड्यांत प्रदर्शन सुरू झालें आहे. तें पहाण्यास आपले युवराज प्रिन्स आफ वेल्स हे इंग्लंडाहून गेले होते त्यांनीं तेथें हिंदुस्थानच्या कारागिरीचे व हिंदुस्थानांत उत्पन्न झालेले पदार्थ मांडलेले सर्व पाहिले, व एकंदर पृथ्वींतील चांगल्या चांगल्या पदार्थांत त्यांची योग्यता बरोबरीची व वाखाणण्या जोगी दिसून आली त्यावरून त्यांस फार संतोष झाला व त्यांनीं तो संतोष स्टेट सेक्रटरी यांस तारायंत्रानें प्रदर्शीत करून दाखविला. आणि त्यावरून स्टेट सेक्रटरी यांनींही तारायंत्रांतून इकडील गवरनर जनरल साहेबांस तें आल्हादाचें वर्तमान कळविलें. हें ऐकून आमचे लोकांस संतोष झाल्याशिवाय रहाणार नाहीं. जो आमचा देश थोड्या वर्षांमागें सर्व प्रकारांत केवळ निकृष्ट होता त्याची योग्यता दिवसानुदिवस वाढत चालली ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. व असाच सुरळीत कालक्रम चालल्यास आणि ईश्वराचे मनांत असल्यास हिंदुस्थान देश आपले नाव याहून शतपट विख्यात करील व सर्वत्र त्याची वाहवा होईल, आणि त्याप्रमाणें अवश्य घडण्यास दयाळु परमेश्वरानें आमचे देशास कृपादृष्टि न द्यावें असें आह्मी इच्छितों व त्याजवळ मागतो.

## वऱ्हाड.

**लढाई** — आनंदाची गोष्ट कीं इंग्लंड व रशिया यांची लढाई न होतां तह होईल अशा खबरा या आठवड्यांत भरवशा दाखल आल्या आहेत व हिंदुस्थानांतून फौज यापुढें तिकडे पाठविण्याचें कारण नाहीं असाही मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

मि० आर डी हेर साहेब आकिशियर्ड झास असिस्टंट कमिशनर यांनी मराठी भाषेची हायर स्टयांडर्ड प्रमाणें परीक्षा पास झाली.

एथील धर्माधिकारी रा. रा. रामराव पुरुषोत्तम देशपांडे यांनीं शंकराचार्य स्वामीशीं योग्य प्रकारें वर्तन केलें नाहीं व त्यांचा अवमान केला ह्मणून त्यांस त्यांनीं बहिष्कृत केलें आहे असें समजतें.

गावांतील ग्रामण्याचा तट मोडला घोंगे, दीक्षित, व वैद्य यांस स्वामींनीं तीर्थ देऊन त्यांचा समेट केला. नंतर कार्य प्रसंगानें एके ठिकाणीं त्यांचा पंक्तिव्यवहारही झाला. हें चांगलें झालें.

शंकराचार्य स्वामी खामगावाकडे गेले.

उमरावतीस मोफ्युसील कंपनीचे क्लार्क रा. रा. नारायणराव यादव यांजकडे चोरी होऊन त्यांचा अदीच तीन हजारांचा विषय चोरीस गेला. दागिने, कापड, रोकड वगैरे सर्व गेले असें ऐकतों चोरास इतकी फुरसत मिळाली कीं, नेववल्या त्या पेट्या ते घेऊन गेले व मोठी पेटी फोडून आंतील सामान यथेच्छ घेऊन गेले. मुंजी करितां आणिलेला खारका, खोबरें, केशर सुद्धां माल त्यांनीं नेला असें कळतें. चोरांचा पत्ता अजून लागला नाहीं. नारायणरावावर हा प्रसंग आला याजबद्दल आह्मांस वाईट वाटतें. आताशा ज्या चोऱ्या होतात त्यांतून कित्येकांचा पत्ता लागत नाहीं त्यांतून उमरावतीस चोरी होणें ह्मणजे पक्के कामनशीबच समजावयाचें. मनुष्य मरण पावल ह्मणजे जसें त्याचें पुनर्दर्शन होणें नाहीं तशा जवळ जवळ चोरीस गेलेल्या मालाचे दर्शनाची स्थिति होऊं लागली आहे. पोलिसास दाद न देण्याजोगे चोर शिरजोर झाले आहेत किंवा पोलिसच्या बंदोबस्तांत न्यून आहे, ठाऊक नाहीं. कांहीं असलें तरी दुःखदायक खरें!

टाऊनहालचे बगीच्यांत इमारती समोर रस्त्यावर कारंजे करण्याचें काम चालू आहे. तेणेंकरून टौनहालास शोभा येईल व लोकांस करमणूक होईल.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, एथें राम प्रताप मारवाडी यांजकडे या आठवड्यांत सुमार दोन हजार रुपयांची चोरी झाली होती तिचा पत्ता पोलिसानें ताबडतोब लाविला. याजबद्दल आह्मी मि० साविपल साहेब इन्स्पेक्टर यांची तारीफ करितो.

अलीशान रेसिडेंट साहेब यांनीं सन १८७८ सालांत सर्व सरकारी आफिसें बंद ठेवण्याकरितां सणाच्या सुट्या दिलेल्या तारीख १ मेच्या रेन्सीडेंसी आर्डरमध्यें छापल्या आहेत त्या ख्रीश्चन लोकांस १०, मुसलमान लोकांस ६, हिंदु लोकांस ११ व पार्शी लोकांस १३ आहेत. व कोर्टांना सर सालांत सुट्या ४६ दिल्या आहेत. त्यांची तारीखवार याद करून कोर्टांत डकवावी असा हुकूम आहे या सुट्यांत वसंतपंचमी, अक्षयतृतीया; आषाढी कार्तिकी एकादशी, नागपंचमी, पोळा, अनंत चतुर्दशी, व पितृपक्षी अमावस्या याही दिवशीं कोर्टें बंद रहातील असें ठरविलें आहे. शिवाय ताजा कलमांत लिहिलें आहे कीं दर महिन्याचा सरता शनिवार, तसेंच ज्या गावीं कोर्ट आहे तेथील कोर्टानें सुटी दिल्यास उत्साह, उरूस, जत्रा वगैरेचा प्रसिद्ध दिवस, सूर्यग्रहणाचा दिवस, व चंद्रग्रहणाचा दुसरा दिवस हे कोर्ट बंद रहाण्याचे दिवस ठरविले आहेत.

तसेंच एप्रिलचे १९ वे तारखेपासून जूनचे १९वे तारखेपर्यंत दिवाणी अवल कोर्टें बंद रहातील व ज्या कोर्टांवर जज्ज नेटिव आहेत त्यांस नाताळच्या सुट्या मिळणार नाहींत असें प्रसिद्ध झालें आहे.

वणी तालुक्याचे नायब तहशिलदार रा. रा. बाबुराव दत्तात्रय यांस थर्ड क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार दिले.

एथें या वर्षी रुईच्या तगाचें काम बरेच जारीं झालें आहे हें लोकांच्या पहाण्यांत आहेच, आणखी आह्मास वर्तमान समजलें आहे कीं बेलारी कडून कोणी युरोपियन गृहस्थ एथें कापुस दाबण्याचा विलायती प्रेस मांडण्याच्या इराद्यानें आले आहेत. व मे. दस्तुर नाहिमनजी साहेब अशा कामाचे चाहणारे त्यांस सहाय करीत आहेत तेव्हां प्रेसाची मांडणी एथें होईल असा योग दिसतो. व असें झाल्यास एथील व्यापारास अधिक तेजी येईल यांत संशय नाहीं.

नबाबपुऱ्यातील एका रजपुतानें आपले बायकोचा भयंकर रीतीनें खून केला. व गावाबाहेर जाऊन विहिरींत उडी टाकून आपण बुडून मेला. हें एवढें साहस कशा करितां झालें तें अजून बाहेर पडलें नाहीं, बायकोची व त्याची चांगली प्रीति होती व तिला चार लेकरें झालेलीं आहेत व तिच्या वाईट चाली विषयीं कांहीं बोभाटा नव्हता असें ह्मणतात.

उन्हाळा फार प्रखर होऊं लागला आहे. दोन प्रहरीं फार काहली होते व रात्री ९।१० वाजतां वारा सुटून थंडावा होऊं लागतो. चांदणें फार नामी पडतें.

मंगरूळाहून पत्र आलें आहे त्यावरून कळतें कीं मि. महमद शाह्मसखां तहशिलदार हे बदली होऊन तेथून तेव्हां गेले लोकांनीं मोठ्या थाटाची सभा करून त्यांस पान सुपारी दिली. त्यावेळीं चिराकदान व चंद्रज्योती नळे वगैरे दारू कामही बरेच केले होते.

नवीन तहशिलदार रा. रा. लक्ष्मण शिंगा बाळाराम चिखलीहून गेले महिन्याचे अखेर तारखेस एथें येऊन तारीख १ मे रोजीं कामावर रुजू झाले.

याच रात्रीं गणेश मंदिरापुढें गाववाले लोकांनीं दक्षयज्ञ नावाचें एक नाटक केलें.

## वर्तमानसार.

जी. आय. पी. रेलवे कंपनी सुमार १९० गुड्स क्लार्क लोकांना काढून टाकणार व त्याबद्दलच्या तिनें त्या लोकांस नोटिसा दिल्या आहेत.

रेलवेवर जे पोलिस आहे त्यांवर सुपरइंटेंडेंटही रेलवेचाच असे. हल्लीं सरकारानें सर्व रेलवे पोलिस सुपरइंटेंडेंट कमी करून तें पोलिस ज्या त्या जिल्ह्याच्या सुपरइंटेंडेंटच्या ताब्यांत देण्याचा ठराव केला.

मुंबईचे मि. महमद अली रोगे गेल्या आगबोटींतून विलायतेस गेले. त्यांना पोचविण्याकरितां पुष्कळ मंडळी बंदरावर गेली होती.

पोर्तुगालच्या राज्याचें ठाणें गोवें म्हणून हिंदुस्थानांत आहे. तेथें तापाची सांथ आली तेणेंकरून तेथील गवरनर जनरल, हायकोर्टाचे चीफ जस्टीस, व एक सेक्रेटरी असे तीन मोठाले कामदार ५ दिवसांच्या अवकाशांत मरण पावले.

हिंदुस्थानांतून जी फौज रशियाच्या लढाईच्या निमित्तानें रवाना झाली आहे ती माल्ट्यास न जातां सुएझ व पोर्टसैद एथें जाणार असें समजलें आहे.

मि ग्याथोर्न हार्डी यांस हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी नेमिल्याविषयीं लंडन ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. व त्यांस व्हाईकौंट क्रानब्रुक अशी पदवी दिली आहे.

तुर्कस्थानानें आपली इच्छा प्रदर्शीत केली आहे कीं रशियाची व इंग्लंडाची लढाई सुरू झाल्यास आपण तिऱ्हाईत राहू. म्हणजे कोणच्याच बाजूस मिळणार नाहीं. व आपल्या देशाचें मात्र संरक्षण करूं. कानस्टांटिनोपलच्या सभोंवार जी टर्कीं फौज रक्षणार्थ आहे तिच्या पहिल्या भागावर वेफर पाच्छा यांस सेनापति नेमिलें आहे.

म्हैसुरास गेल्या वर्षी विद्याखात्याकडे ३२४१७१ रुपये खर्च झाला. ज्या शाळांना सरकारची मदत नाहीं त्यांस दुष्काळामुळें मोठें नुकसान झालें म्हणजे १२५० शाळा होत्या त्या ९३५ राहिल्या. व १८८९ पुर्वी विद्याभ्यास करीत होती ती १३१६५ राहिली. गेल्या वर्षी तिकडे ६८ नवीन ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले त्यांत एकमात्र इंग्लिश होता.

कलकत्त्याच्या हायकोर्टाला ११ जज आहेत व आणखी एक बारावा नेमण्याचा विलायत सरकारचा ठराव झाला आहे.

सिंध प्रांत पंजाबाला जोडावा किंवा नाहीं याचा निर्णय सिमल्यास आतां लवकरच होईल.

अमेरिकेहून केरोसाईन आइलची पिपें एका कंपनीनें नुकतींच २८६०० आणिलीं आहेत व दुसरे एके कंपनीनें ३५०० आणिलीं आहेत.

यंदाचे लिटिलगोचे परीक्षेंत एकंदर १७ उमेदवार पास झाले असें मुंबईचे सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

आग्रा रेलवे स्टेशनावरील एका युरोपियन नोकरानें एका नेटिव उतारकरूस मार दिला सबब माजिस्ट्रेटासमोर याबद्दल चवकशी होऊन अपराधास सहा माहिने कैदेची शिक्षा झाली.

चीन देशाच्या पश्चिम सरहद्दीवरून त्या देशांत प्रवास करण्याकरितां कोणी कूपर नावाचे इंग्रज गृहस्थ जात असतां त्यांत त्यांच्या बरोबर असलेल्या शिपायापैकीं एकानें ठार मारण्याची धमकी आली आहे.

इंडस व्हाली स्टेट रेलवेची लैन मुलतान पासून कोट्री [ सिंध ] पर्यंत येत्या जून महिन्यांत सुरू होणार म्हणून कळतें.

इंग्रज सरकार आपली फौज माल्टा एथें पाठवीत आहे हें भूपाळचे बेगम साहेबांस समजल्यावर आपण आपली फौज या कामांत देण्यास कबूल असल्याचें बेगम साहेबांनीं सरकारास कळविलें आहे.

हिंदुस्थानच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांची नीट व्यवस्था व बंदोबस्त करण्याकरितां विलायतेहून आडमिरल बायतिसी यांस हिंदुस्थान सरकारानें आणविलें होतें, त्यांनीं सर्व बंदरें पाहिल्यावर सरकारास कांहीं सूचना केल्या; परंतु त्या सूचनाप्रमाणें योजना होण्याचा संभव आतां कमी आहे म्हणून कळतें.

तारीख ३० एप्रिलचे मुंबई ग्याझेटावरून कळतें कीं, हिंदुस्थान सरकारानें चाकर व धनी यांच्या संबंधानें कायद्याचा मसुदा कायदे कौन्सिलापुढें आणला होता तो हल्लीं रहीत केला. ने. ओ.

## आजाराचीं साधारण कारणें.

मनुष्यास क्षुधा लागली, झोंप आली, व शौचास साफ झालें म्हणजे त्याची प्रकृति चांगली असते. वरील तिन्ही गोष्टीं पैकीं एकाचा व्यत्यय आल्यास आजार उत्पन्न होण्यास आरंभ होतो. याचीं साधारण कारणें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

निद्राभंग— आपल्या घरांत निजण्यास हवाशीर जागा नसते. ढेकूण, डास, पिसा, चिलटें, यांपासून नेहमीं उपद्रव होतो. उन्हाळ्यांत निजण्यास ज्यास्त हवाशीर जागा लागते, ती आपल्या घरीं नसते सबब च्यार महिने जाग्रण साहजीक होतें. याप्रमाणें निद्राभंग क्षुल्लक कारणानीं होतो. याजबद्दल आपण विचार करीत नाहीं, हें बरोबर नाहीं. निजण्याची जागा स्वच्छ ठेवावी व हे घोडक्या खर्चांत होणारें आहे.

जाग्रण— कित्येक लोकांस नाच, रंग, तमाशे यामुळें जाग्रण होतें कित्येकांस हरिकीर्तन, भजन व अभ्यासामुळें जाग्रण होतें. जाग्रण चांगलें नव्हे. झोंप न लागल्यामुळें अन्नपचन होत नाहीं, अन्न पचन न झाल्यामुळें शौचास साफ होत नाहीं, व यामुळें क्षुधा लागत नाहीं, त्यापासून आजार उत्पन्न होतो. तर रात्रीं दहा वाजल्याच्या पुढें फार्शी जागूं नये. नाटकास जाऊन जाग्रण केल्यानें कशी अवस्था होते हें बहुतेकांस ठाऊक आहेच.

दिवसा निजणें— कित्येक लोकांस दोन तीन तास दिवसा येई पावेतों निजण्याची सवय असते, हें चांगलें नाहीं. यामुळें अंगांत जडत्व व आळस येतो. लौकर पहाटेस उठल्यानें अंगांत हुशारी व चपलता येते व हें प्रकृतीस फार चांगलें. तसेच दोन प्रहरीं निजणें ही वर्ज करावें. दोन प्रहरीं निजल्यानें रात्रीं झोंप येत नाहीं.

पित्त— अनेक कारणानीं उत्पन्न होतें त्यांत मुख्यत्वें करून जाग्रण होऊन शौचास साफ न झाल्या मुळें फार होतें. पित्त हें रोगाचें घर आहे यामुळें नेहमीं मळमळतें व डोकें जड झाल्यासारखें वाटतें, सकाळीं उठून मुखमार्जन झाल्यावर कांहीं तरी खावें. अन्न व पाणी ( भाजी भाकरी का असेना) स्वच्छ व ताजें असावें म्हणजे पित्त होणार नाहीं.

स्नान— पुष्कळ लोक डोकीवरून स्नान करीत नाहींत. वैद्य शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं आंघोळ करतेवेळीं प्रथमतः डोकें भिजवावें असें केल्यानें डोक्यांतील उष्णता अंगांत शिरते. मग अंगावर घेतलेलें पाणीं बाधत नाहीं. स्नान केल्यानें अंग न पुसतां तसेंच राहतात यामुळें केशाचे रंध्रांतून पाणी जाऊन थंडी होते अघोळ केल्यावर भस्म लावावें म्हणजे अंगांतील थंडी भस्म काढून घेतें.

स्वच्छता —खाणें पिणें, कपडालत्ता हे नेहमीं स्वच्छ असावे. रहाण्याचें ठिकाण स्वच्छ असावें. स्वच्छतेपासून मनाला समाधान वाटतें, व हुशारी, चपलता अंगीं येते, वरील प्रकार सांगितले यांपासून जरी तात्कालिक दोष दृष्टीस पडणार नाहींत तरी पुढें ते दिसूं लागतात त्यांकडे दुर्लक्ष्य करूं नये. जो सशक्त व ज्याचा श्रमाचा पिंड असेल त्याला कदाचित वरील प्रकारांपासून बाधा होणार नाहीं, परंतु ज्यानां शारीरश्रम कमी व ज्यांचे स्वभावतांच प्रकृति अशक्त त्यांनीं याकडे लक्ष द्यावें.

क. त.

## नोटिसा

बनाम रतनमल भवानीराम मारवाडी रहाणार कुरणखेड तालुके अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येते कीं, आळशीचे सवद्या प्रकर्णी आम्हास नोटिस दिली ती पोहचली ज्या वेळेस आळशीचा सवदा झाला त्याचे दुसरे दिवशीं तुम्हास बयाण्याबद्दल दरखंडी ५ रु. प्रमाणें २५० रु. तुम्हास देऊन आठ दिवसांत मूर्तिजापुर स्टेशनावर माल चांगला मोजून घेऊन बाकीचे रुपये चुकते द्यावे असें ठरलें असून बोलीप्रमाणें माल मोजला नाहीं चवघा बेपाऱ्यानीं तुम्हास समजाऊन बोली प्रमाणें माल नसल्या कारणानें सवदा रहीत करविला व अडीचशे रुपये बयानाबद्दल दिले ते परत घेणें ठरविलें असें असून बयाण्याबद्दल रुपये न देतां तुम्ही उलट आम्हास नोटिस देता याजकरितां आम्हास बयाण्याबद्दल अडीचशें रुपया करितां दिवाणी कोर्टांत दावा करणें भाग आहे. या नोटिसीनें कळवितो कीं आठ दिवसांचे आंत बयाण्याबद्दल २५० रुपयाचा उलगडा करून द्यावा नाहीं तर या नोटिसीचा व कोर्ट खर्च सुद्धां भरून घेतला जाईल हे आतां खचित समजावें. कळावें तारीख ३ मे सन १८७८ इसवी.

( सही ) लक्ष्मण सखाराम पापळकर

दलाल रहाणार मूर्तिजापुर

दस्तुर खुद

नोटिस.

रा. रा. नारायण वल्लद गोविंदा बढे रहाणार अकोट यांस खालीं सही करणार गणेशदास आत्माराम मारवाडी दुकान अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आम्ही आपली लक्ष्मणराव दादांची दिवाणखान्याची जागा तुम्हास १०० रुपयांस विकली पण तुम्ही त्या जागेवरील विटा, गोटे, व माती या मसालाही हक्क चालविता. व तो मसाला आम्हास उचलू देत नाहीं हे फार गैर करता. कारण आम्ही तुम्हास फक्त वरल्ल जागा विकली आहे त्या जागेवर असलेली विटाची दिवाल व गोटे मातीचे ढिगार हे विकले नाहींत म्हणून आमचा मसाला अटकाविण्याची तुम्हास गरज नाहीं. आता या मुद्दाम नोटिशीनें तुम्हास इतकेंच कळविण्याचें आहे कीं, आमचा माल मसाला तुम्ही आपले उपयोगीं विलकूल लावूं नये. जो तुम्ही खर्च केल्यास त्या ठिकाणीं आमचे गोटे १०० गाड्या, माती २०० गाड्या, व विटा १००० इतका मसाला आहे तो त्याचा आम्हांस आणून द्यावा नाहीं तर तितक्या किंमत रुपये ३०० सुमारानें होते ती तुम्हाजवळून कोर्टे खुले होताच फिर्याद करून घेतली जाईल. व या नोटिशीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. कळावें तारीख ४ माहे मे सन १८७८ इसवी.

( सही ) गणेशदास आत्माराम

मारवाडी दस्तुर नवकृष्ण

मजकुमी गुमास्ता.

नोटिस.

तुकाराम बिन दामासा वाणी दुकान कसबे पिंपळगाव राजा तालुके मलकापुर यांस भिवरा मर्द तुकाराम वाणी इजकडून नोटिस देण्यात येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असुन मला नीट रीतीनें वागवित नाहींस व गंधर्वाची दुसरी बायको केली आहेस त्यावरून दोन तीन वेळा तुला पंचात आणून जबाब मागितला तेव्हां तेव्हां तूं थापाथापीच्या गोष्टी सांगून चाल ढकल केलीस व आजपर्यंत मला नीट वागविलें नाहींस व आतां यापुढें चांगली वागविशील अशी आशा दिसत नाहीं त्यावरून तुला ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही नोटिस पोंचल्यापासून ८ आठ दिवसांचे आंत तुझे मनांत वागविण्याचें नसल्यास सोडचिठ्ठी पाठवून द्यावी तसें न केल्यास तुजपासून कायदेशीर रीतीनें सोड चिठ्ठी घेईन व त्या दिवसांपर्यंत जो पोटखर्च होईल तो तुजपासून कोर्टांत फिर्याद करून भरून घेईन कळावें. तारीख ७ माहे मे सन १८७८ इसवी.

[ सही ] भिवरा मर्द तुकाराम

वाणी दस्तूर पुंड्या वल्लद

सदाशिव दस्तुर खुद.

हें पत्र अकोल्या एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत लक्ष्मणराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १९ माहे मे सन १८७८ इसवी. अंक २०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारांनी लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ८१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| „ दुसरे खेपेस | ८२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचे शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थानीं तयार केलेलें आमच छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## वैद्यप्रकाश.

वैद्यप्रकाश नावाचा नवीन ग्रंथ तयार होऊन आह्माकडे विक्रीस आला आहे. सदर्हू ग्रथांत वैद्यक संबंधी सर्व विषय घेतले आहेतच. परंतु सर्प, कुत्रे, उंदीर, विंचू, वगैऱ्यांच्या विषावर तर फारच उत्तम योजना झाली आहे. ग्रंथाचे भाग तीन केले आहेत. त्यांतील तात्पर्य लोकांच्या ध्यानांत येण्याकरितां प्रत्येक प्रकरणाचा सारांश खालीं लिहिला तो येणेंप्रमाणें:—

प्रकरण १. — यांत स्त्रियांच्या जाती व लक्षणें, ऋतुकाल, व नियम गर्भाचीं लक्षणें, व तो गर्भ पोटांत असतां, स्त्री, किंवा पुरुष, अगर नपुसक ओळखण्याचा प्रकार, गर्भिणीचे नियम, प्रसूतकाळ, पुरुषाच्या प्रकृति, दूतपरिक्षा, वैद्यास शकून, स्वप्नाचें फल, वैद्य लक्षण, अष्टविध परीक्षा, असाध्य लक्षण, औषधीं आणावयास, करण्यास, रोग्यास देण्यास, व त्यास स्नान करण्यास मुहूर्त, ज्योतिषअभिप्राय, देशकाल लक्षण, दोष प्रकोप कारण, औषधी युक्तायुक्त विचार, व आणावयाचा प्रकार व घेण्याचा काल, औषधी प्रतिनिधी सर्व रसाचे गुण, औषधादिकांचे मान, दिनचर्या, ओकारीचा व ढाळाचा विधी, सर्व रोग वर्णानुक्रमानें अ पासून ज्ञ पर्यंत रोगांची उत्पत्ति, त्यांवर औषधी व पथ्य, अपथ्य.

प्रकरण २. — धातूपधातु, रसोपरस, विषोपविषें, व रत्नोपरत्नें, इत्यादिकांची शुद्धी व मारण, भस्मे करण्यास पुटें द्यावयाचा प्रकार, [ यंत्र ] यांत मुख्य यंत्रें व त्यांच्या आकृति व पुटें देण्याचा प्रकार, रसायनें, मात्रा, वर्णानुक्रमानें, तसेच पाक, अवलेह गुटिका, चूर्णें, गुग्गुळ घृतें, तैलें, अनुपान प्रकरण, धातुपुष्टीचीं औषधें, अजीर्ण मंजिरी, पोतविधि, अर्कप्रकाश, कर्मविपाक, इ. वर्णानुक्रमानें.

प्रकरण ३. — यांत सर्व वनस्पतींचे गुणदोष वर्णानुक्रमानें सांगितले आहेत. ह्या एकाच ग्रंथाचे संग्रहानें अनेक ग्रंथांचें श्रय येणार आहे. याची किंमत २८८ दोन रुपये आठ आणे व टपाल हशीलाबद्दल एकूण आह्माकडे पाठविले असतां पुस्तक तावडतोब रवाना करण्यांत येईल. कळावें तारीख १९ माहे मे सन १८७८ इसवी.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## वसूल.

| | |
|---|---|
| रा. रा. गणपतराव देशमुख | ६८८ |
| „ „ इलिचपुर रीडिंगरूमचे सेक्रेटरी | ४ |
| „ „ विष्णु कृष्ण स्कु. मा. आसळ. | ३८४ |
| „ „ पुरुषोत्तम पांडुरंग ना. तह. | १० |
| „ „ माधोबा वलद नागोजी | १५ |
| „ „ विष्णु कृष्ण श्रोत्री | ६८८ |
| „ „ दामोदर इच्छाराम | १ |
| „ „ बाळकृष्ण केशव जोशी | ६८८ |
| „ „ ने. लायब्ररीचे सेक्रे. मूर्तिजापुर | ४८२ |
| „ „ देवराव बळवंतराव | ६८८ |
| „ „ आनंदराव भवानराव | ६८८ |
| „ „ महादेव वासुदेव हेड मा. | ६८१० |
| मे. शेखहिसामुद्दीन साहेब | ६८८ |
| श्री. रा. रा. आपासाहेब पटवर्धन | ६८८ |
| „ „ शामरावबापु जोगेश्वर | ३८४ |
| „ „ रामकृष्ण रावजी हे. मा. | २८८८६ |
| „ „ परशराम वलद परभाजी | ६८८ |
| „ „ सेक्रे० नेटिव लाय० तळेगाव | ४ |
| „ „ सीतळसिंग पेशकार पुसद | ६८८ |
| रॉ. सा एटकिन सा. हे. अ हा. | २० |
| रा. रा. रामचंद्र गोविंद वामनाचार्य | ६८८ |
| „ „ नारायणराव यशवंतराव | ६८८ |
| „ „ अमृतराव देशमुख देशपांडे | १५ |
| मे. मीर फाजल अल्ली चौ. का. | ६८८ |
| „ महमद मुबारक अल्ली सा. तह. | ४० |
| श्री. रा. अमृतराव रावसाहेब डफळे | ३५ |

## कृष्णाकुमारिकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

मठांत कोलाहल वेदघोषें,
श्रोतेंहि होती जन पूर्ण तोषें ॥
शिष्यांस अध्यापक वेद चारी।
अध्यापिती आगि महा विचारी ॥३६॥
ज्यां पाठशक्ती बहुधारणाही
विश्रांति ज्यांच्या हृदयास नाहीं ॥
ते शिष्य रात्रिंदिव याच खेदीं
राहोनि पारंगत सर्व वेदीं ॥३७॥
ईर्ष्यागुणा दाविति जे न पाठ,
घनांत त्यांला विकृतीहि पाठ ॥
त्या त्या मठामाजि असे अमोल
संसिद्ध होती द्विजराज बाल ॥३८॥
तेथें येति अति प्रतिष्ठित चतु-
र्वेदी त्रिवेदी तसे
त्यांची अध्ययनोत्थदीप्ति अवलो-
कूनीच होती पिसे॥
कीं त्यांचें मन हर्षसिंधुजठरीं
वेगें करी मज्जन,
स्वोत्कर्षापरि मानिती प्रिय परोत्-
कर्षास ते सज्जन ॥ ३९ ॥
येतां श्रेष्ठ, तयां निजश्रमफलें
सानंद अर्पावया।
अन्योन्याप्रति बीर होउनि, दुजा
श्रोत्यांहि तर्पावया ॥
पंक्तीनें बसुनी, तृतीय सवनें
ते उच्च दीर्घ स्वरा
स्पर्धेनें अतिदीर्घ वाढविति ती
चर्चा सुखा दे परा ॥ ४० ॥
श्रौतस्मार्तविचारदक्ष सुमती
विप्राग्रय पापापह ।
प्रीतीनें करिती स्वकर्मचि, शुची
तेणें तयांचें गृह ॥
कल्पब्राह्मणसूत्रसंघ बहुधा
जो कर्मकांडा वदे,
त्यातें ते सरहस्य जाणाति, अशा
कां ईश न क्षेम दे ॥ ४१ ॥
ज्योतिष्टोम प्रमुख विकृती, पौंडरीकादि यज्ञ
श्रद्धालुत्वें करुनि अनला तर्पिती ते विधिज्ञ॥
अग्निप्रेमें सहजचि तयां स्वर्गसौख्येंहि तुच्छें।
कीं सांगे हे स्मृति “ हुतवहात्संपदुल्लासमिच्छेत्” ॥ ४२ ॥
ठायीं ठायीं बहुत असती
शास्त्रशाला विशाला,
तेथें शास्त्रें पढवुनि गुरू
लाधती सद्यशाला. ॥
शिष्यां माता पितृसमचि ते
दाविती प्रेमरीति,
कीं ते शिष्य त्यजुनि अळसा
सत्वर ज्ञान घेती ॥ ४३ ॥
लुङ्लङ्लृङ्क्ष्वडुकःकरतकरतिकाक्तिचृक्तीच
शेङधुण्ड॥गोःकुकटुङ्त्रभकुर्छुरांकसभृवृस्तु
दुस्त्रुर्जेजुसृक्षत्रः॥एवं दुर्घट सूत्र कैय्यटमहाभाष्यादि पारायणें ॥ त्यांचीं चालति, कीं
तयांस दिधली सद्बुद्धि नारायणें ॥४४॥
अत्रब्रूमः,कुतस्तमनुपटइतिचेत्अनुमानेनासिद्धे. तनुच्छे, तन्न, मैवं, तदपिनहिभवेदत्र
हेतुर्विरुद्धः ॥ या शद्बानींच शाळा गजव-
जति सभाशूर नैय्यायकांच्या, कीं त्यांनीं
नास्तिकांच्या सतत परिभवा. घातला घट
कांच्या ॥ ४५ ॥

( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

विजापुर—ता. ३ मे १८७८ इ.
रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळी कृपा करून प्रसिद्ध कराव्या.

आहवाल—विजापुर प्रांतीं वर्षीं या खरीफ पिकाची तर पेरणी झालीच नाहीं. रबीची तिजाई पेरणी झाली त्यांत गहूं व कापूस सर्व बुडून गेले. हल्लीं ८० रुपये भारानें जवारी ८ शेर, गहूं ६ शेर, हरभरे ४॥ शेर, तांदूळ ३॥ शेर, असा भाव आहे.

कलादगी मोडून विजापुर जिल्हा करण्याबद्दल मुंबईचे गव्हरनर सर फिलिप उडहौस साहेब हे विजापुरीं आल्यावेळीं ठराव केल्याप्रमाणें मेहेरबान हाग साहेब माजी कलेक्टर यांणीं सर रिचर्ड टेंपल साहेब हल्लींचे गव्हरनर यांजकडे जिल्हा स्थापन करण्याबद्दल रिपोर्ट केल्यावरून दुष्काळांत विशेष खर्च होईल ह्मणून तूर्त तें काम बंद ठेविलेलें होतें. हल्लीं शहरचे आंत किल्ल्यांतील सातखणी महालाची व आनंदी महालाची रिपेरी मोठ्या जारीनें चालली आहे. हें काम पुरें झाल्यावर हुकूम होईल. सारांश जिल्हा होणें खचीत आहे. तूर्तच आणल्यास कांहींच हरकत नव्हती. कारण दहा हजार माणसें एका जुमा महजदींत बसविली तरी या महजिदीचे अष्टमांश त्याम्यांतच बसणार आहेत. अशा एथें बोळघुमट, इभ्रामरोजे वगैरे मोठ्या इमारती पुष्कळ आहेत. हल्लीं जिल्ह्यासाठीं ज्याची रिपेरी चालली आहे त्या आनंदी महालाच्या दोन मजल्यांत सर्व कचेऱ्या पुऱ्या होऊन बाकी दोन मजले रिकामे रहाणार आहेत.

विजापुर शहर हें पहाण्याजोगें आहे. एथें हलालखोरांनीं आपले धंद्यावर महाल बांधविल्याची जुनी खबर आहे. तो महाल नाणत्या मनुष्यानीं पाहिला असतां जीव थक्क होतो. त्याप्रमाणें सुतारानीं बारा पंधरा वर्षें लाकडावर काम केलें तरी तसें कमळाकृती व नाना तऱ्हेचे वेल येणार नाहींत आणि त्याप्रमाणें दगडावर होणें तर दुर्लभच आहे. त्याचप्रमाणें इभ्रामरोजाचें काम सर्वोत्कृष्ट आहे. तें सर्व लिहिण्यास स्थळसंकोचामुळें लेखणीस रजा देतों कळावें.

एक फिरस्ता
विजापुरकर.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ३ शके १८००

## नगरास भयंकर आग.

हानि व्हावयाची झाली ह्मणजे ती कशी व कोणत्या वेळेस होते याचा नेम नाहीं, उन्हाळ्या रात्रीं आनंदानें घराबाहेर पडून मनोरंजक नाटकापासून जिवास करमणूक करून घ्यावी अशा हेतूनें अहमदनगरास जेथें लोक जमले होते तेथील नाटकगृहास आग लागून सुमार ५० मनुष्यें होरपळून व तरफडून जागच्याजागीं प्राणास मुकलीं व कित्येकांची अंगें करपून तीं आजारी झालीं आहेत. अशी गोष्ट होऊं लागली ह्मणजे तेथें ईश्वरेच्छेशिवाय दुसरें कांहीं समाधानकारक कारण कल्पितां येत नाहीं. पदरचे पैसे खर्चून लोक नाटकास गेले तेव्हां पुढल्या तासांत असा भयंकर प्रसंग आपणावर येणार आहे अशी या बिचाऱ्यांस काडीभर तरी कल्पना झाली असेल काय ! अहाहा ! ईश्वराचे चरित्र अतर्क्य आहे !

आतां याविषयींची सविस्तर गोष्ट कळावी अशी वाचकांस उत्कंठा झाली असेलच सबब हकीकत सांगतों.

साहेब लोकांच्या उत्तम नाटकाच्या दबीवर मुंबईस कांहीं पार्शी लोक नाटकें करूं लागले आहेत. ते हिंदुस्थानी, गुजराथी व कधीं कधीं इंग्लिश भाषेंतही नाटकें करितात. त्यांत विक्टोरिया थियेट्रिकल क्लब ह्मणून एक प्रसिद्ध मंडळी आहे. ती थोडे दिवसांपूर्वीं आपलें नाटक घेऊन अहमदनगरास गेलेली आहे. नगरास नुकतीच रेलवे सुरू झाली व ती पुन्हा लवकरच बंद होणार ह्मणून तितक्या दरम्यान हा हंगाम साधून घ्यावा अशी कदाचित त्याच्या मनांतील हौस असावी. यांनीं गावाचे उत्तरेस बाराइमामचे कोठ्या नजिक मैदानांत मोठा भव्य मंडप दिला होता व तेथें खेळ सुरू केले होते. त्याप्रमाणें कालचे मागील शनिवारीं त्यांनीं शीत ममर हा खेळ केला व पुढे फार्स चालू होता इतक्या सुमारांत त्या मंडपास आग लागली. मग काय विचारतां ! सर्वांची एकच त्रेधा झाली. सर्व मांडव कुडून घेऊन येण्या जाण्याकरितां एकच काय तो दरवाजा ठेविला होता तिकडे लोकांनीं पळ काढिला. त्या सरसे कांहीं गेले व कांहीं जाताहेत तों तिकडूनच आगीचा भडका चालू झाला. तेव्हां मागें फिरून मांडवाच्या बाजवा तोडून वगैरे कांहीं लोक बाहेर पडले. कांहीं अशक्त, दुर्बळ यांचीं घाबरेपणानें लोळण झाली व त्यांचे अंगावरून दुसरे लोक गेले. या इतक्या कृत्यास ९ मिनिटें पुरतीं लागलीं नाहींत तों अग्निनारायणानें सर्व मंडपाचा स्वाहाकार केला. पोलिसानें, लष्करी अधिकाऱ्यांनीं व इतर लोकांनीं दरवाज्याशीं जीं माणसें होरपळत होतीं त्यांस ओढून काढिलें व तितकाच काय तो मनुष्यनाश असें त्यांस पहिल्यानें वाटलें होतें पण पुढें पहातात तों मंडपाच्या निखाऱ्यांतून मांस जळत असल्याची दुर्गंधी सुटली तेव्हां विशेष तपास केला तों सुमार ३६ मनुष्यांचीं प्रेतें सांपडलीं. तीं इतकीं छिन्न भिन्न झालीं होतीं कीं घरच्या मनुष्यांस ओळखतां आलीं नाहींत. कोणी दागिन्यावरून ओळखलीं, कोणी बुटाच्या जोड्यावरून ओळखलीं, कोणी कुडतीच्या गुंड्यावरून ओळखलीं, असा दुःखदायक प्रकार होऊन साऱ्या शहरांत शोक पसरला आहे. भाजून आजारी झाले त्यांचीही संख्या सुमार शंभर आहे. तितके लोक इस्पितळांत गेले नाहींत. व गेले त्यांतून कांहीं मेले. आजपर्यंत मेलेल्यांची संख्या ४९ आहे. काळ्या पायदळ पलटणींतील ९ मनुष्यें मेलीं त्यांत ३ नाईक व ३ हवलदार होते. कोण्या घरचीं दोन व कोण्या घरचीं तीन मनुष्येंही मेलीं आहेत. एक मारवाडी सावकार आपल्या दोन मुलांस बरोबर घेऊन नाटकास गेला होता पण दुःखाची गोष्ट कीं त्या तिघांची ही राख रांगोळी झाली व त्याची एकटी बायको वैधव्यदुःख भोगण्यास मागें राहिली !

ही एवढी भयंकर आग एकाएकी लागण्यास कारण काय झालें तें अजून समजण्यांत आलें नाहीं, चौकशी चालू आहे. कोणी ह्मणतात विडी ओढतांना कोणाचे हातून काडी पडली असावी. कोणी ह्मणतात केरोसिन तेलानें भडका घेतला असावा. यांतून खरें कोणतें ठरतें तें पहावें अस्तु. नगरास एकंदरींत हा नाश फार अनिवार झाला. व पुष्कळ लोकांच्या सुखासुखी आहुती पडल्या याबद्दल पुन्हा मनांत आलें ह्मणजे पुन्हा अधिक दुःख होतें. पण ईश्वराची मर्जी ! तेथें कोणाचा काय इलाज !

## लढायी.

इंग्लिश सरकार व रशियन सरकार यांजमध्यें लढाई होईल कीं काय असा जो मागें संशय होता त्याविषयीं आतां कांहीं वर्तमान नाहीं, व आपसांत समजूत होऊन लढाईचें कारण मिटलें असें जें गेल्या आठवड्यांत वर्तमान आहे त्यास बाधकही कांहीं वर्तमान उभय सरकारचे संबंधानें प्रस्तुत नाहीं. पण तुर्कस्थान व रशिया यांची आणखी कांहीं रंजक झडणार कीं काय याविषयीं या आठवड्यांतील वर्तमानावरून संशय उत्पन्न होत आहे. तुर्कस्थानानें जे किल्ले रशियाच्या स्वाधीन करून द्यावे असें तहनाम्यांत होतें ते किल्ले तो अजून देत नाहीं व रशियास द्यावे असा तहनाम्यांत करार नाहीं. ते बलगेरियाचे स्वाधीन करावे असी शर्त असल्याविषयीं तुर्कस्थान तकरार सांगत आहे. व खालीं करून देत नाहीं. आणि ते किल्ले रशियाचे हस्तगत होऊन मार्मोरा समुद्रांतील इंग्लिश फौजा माघारी जाईपर्यंत आपण कान्स्टंटिनोपलवरील फौज उठविणार नाहीं असें रशिया ह्मणत आहे. शिवाय रशिया विरुद्ध तुर्कस्थानांत कित्येक ठिकाणीं बंडें उत्पन्न झालीं आहेत व त्यांनीं ख्रिस्ति लोकांवर हत्यार चालवावें असे जाहिरनामे लाविले आहेत व रोमेलियांतील बंडवाले फिलिपोपोलिस एथील रेलवेस अपाय करतील असा धाक आहे शिवाय बोसनिया प्रांत तुर्कानें आस्ट्रि.स द्यावा असें रशि.चें ह्मणणें आहे त्याचा अंमल अजून झाला नाहीं तसेंच तुर्कस्थानांत स्यानस्टिफानो एथें जी रशियन फौज आहे तींत आणखी पुष्कळ भरती रशियानें केली व व्हालंटियर मारमार जमविण्याचे खटपटींतही रशिया आहे. इत्यादि गोष्टी या आठवड्यांत बाहेर आल्या आहेत व या सर्व खऱ्या ठरतील तर शांततेस आणखी कांहीं बाधा होणार असा सुमार आहे.

रशियाचा वकील लंडनाहून सेंटपीटर्सबुर्ग एथें गेला त्यानें इंग्लिश सरकारचे सर्व विच्यार आणि बातंबात बादशहास तोंडीं कळविले असें वर्तमान आलें आहे— तुर्कस्थानानें आपल्या राज्यांत नवीन सुधारणा करण्याविषयांचे जाहिरनामे प्रसिद्ध केले आहेत—आपल्या चकवालींनी साहेबांनीं अलडरशाट एथें १६००० फौजेची नुकतीच कवाईत स्वतां पाहिली.—आस्ट्रियानें आपल्या हिताविषयीं दक्ष असावें व फौजही कारण पडल्यास हत्यार ठेवावी असें त्याच्या सभेंत ठरलें आहे.

## ग्रंथप्रकाशक मंडळी.

अलीकडे ४ । ५ महिने या मंडळीच्या जाहिराती बहुत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत त्यावरून आमचे वाचकांस यांच्या उद्देशाची कांहीं माहिती झाली असेल. प्रथमतः राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख नाशिकचे जाइंट जडज यांच्या मनांत ही उत्तम कल्पना आली व राव बहादूर महादेव गोविंद रानडे तेथील सबार्डिनेट जडज यांचा विचार त्यास अनुकूळ पडला. मग उभयतांनीं आपले सहीची जाहिरात दिली कीं, आपले देशांत जे ग्रंथकार आहेत व ज्यांचे उत्कृष्ट ग्रंथ तयार होत असून द्रव्यसहाय नसल्यामुळें जे कोपऱ्यांत पडत आहेत व यामुळें त्यांचा लाभ सर्व राष्ट्रास होत नाहीं तो करून देण्याची कांहीं तजवीज निघाल्यास पहावी. त्या जाहिरातींत त्यांनीं असें प्रसिद्ध केलें होतें कीं, तशा ग्रंथकारांचे ग्रंथ घेऊन मंडळीनें छापून प्रसिद्ध केले असतां त्याच्या प्रति घेण्यास देशहितेच्छु किती लोक तयार आहेत तें कळावें. या त्यांच्या प्रयत्नास आरंभींच चांगलें यश आलें असें दिसतें कारण प्रथमच सुमार ८०० सभ्य गृहस्थांनीं अशा ग्रंथास हमेशा मदत होण्याकरितां दरसाल पांच पांच रुपये देण्याचें कबूल केलें. व त्यावरून मग या मंडळीची गेल्या ११वे तारखेस पुण्यास सभा भरली होती. त्या वेळीं कित्येक थोर गृहस्थ व वर्तमानपत्रकर्ते व मासिकपुस्तककर्ते सभेस गेले होते. त्या प्रसंगीं रा. ब. महादेव गोविंद रानडे यांनीं सुरस व्याख्यान दिलें व मंडळीच्या उद्देशाची सर्वांस चांगली फोड करून दाखविली नंतर जनरल कमिटी व म्यानेजिंग कमिटी नेमण्यांत आली. या कमिटींत ठिकठिकाणचे मोठमोठाले विद्वान् व वजनदार असे २२ गृहस्थ मेंबर नेमिले त्यांचीं नांवें:—श्री० बापु साहेब कुरुंदवाडकर, आन० विश्वनाथ नारा. मंडलिक, रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे, गोपाळराव हरी देशमुख, माधवराव गोविंद रानडे, दादोबा पांडुरंग, शंकर पांडुरंग, माधवराव वासुदेव बर्वे, नारायणभाई दांडेकर. रा. रा. आर रघुनाथ राव, विनायकराव जनार्दन कीर्तने, विनायकराव नारायण भागवत, प्रो० रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रा. रा. माधवराव मोरेश्वर कुंटे, कृष्ण शास्त्री चिपळूणकर, रावजी शास्त्री गोडबोले, रा. सा. श्रीकृष्ण शास्त्री तळेकर, नारायण विष्णु बापट, आबाजी विष्णु कायवटे. सिताराम विश्वनाथ पटवर्धन, रेव० बाबा पदमणजी, व रा. रा. जनार्दन सखाराम गाडगीळ.

नंतर यांतून सहा गृहस्थांची एक म्यानेजिंग कमिटी नेमिली. व शेवटीं रा. ब. गोपाळरावजी देशमुख यांणीं सुरस व्याख्यान दिलें. व सभा विसर्जन झाली.

या मंडळीचा हा हेतु फार स्तुत्य आहे व तो आपले देशाचे प्रस्तुतचे स्थितीस फार अवश्यक आहे. ज्ञानप्रकाशांत कित्येक आठवडे याच्या या कृत्या विरुद्ध टीका झाली व अजून चालू आहे. तीविषयीं रा. ब. महादेव गोविंद रानडे यांनीं आपले भाषणांत खुलासा करून सांगितलें कीं, त्या लिहिणाराची या मंडळीच्या उद्देशाकडे बरोबर नजर पोंचली नाहीं व देशाच्या स्थितीविषयीं त्यांस चांगलें माहीत नाहीं. आमच्या या मंडळीचें इतकेंच काम आहे कीं ग्रंथकाराकडून जे ग्रंथ येतील ते परीक्षकाकडे पाठवावे. व त्यांत जे छापण्यासारखे ठरतील ते छापवून आणवावे व मंडळीच्या वर्गणीदाराकडे पाठवून द्यावे. असें करण्यास कोणतीही अडचण येणार नाहीं व कांहीं चांगले ग्रंथ निघतील तेणें करून लोकांचा उपयोगच होईल. खरेंच. आह्मांस हा विचार पसंत वाटतो व त्याप्रमाणें घडावें अशी आमची मनापासून इच्छा आहे.

**रेलवेकडील चोऱ्यांबद्दल कमिशन—** थोडे दिवसांमागें रेलवेतून धान्याचीं पोतीं चोरीस जातात ह्मणून ठिकठिकाणाहून अतिशय बोभाटा झाला होता. त्याची सरकारापर्यंत वर्दी जाऊन त्यांतील बीन काय असावें व तो प्रकार कशानें बंद होईल याविषयीं चौकशी करून रिपोर्ट करण्याकरितां सरकारानें एक कमिशन नेमिलें आहे त्यांत बरेच लोक मेंबर असून त्यांचे कामाचा मोठा झपाटा चालू आहे. कित्येक वेगवेगळ्या ठिकाणीं बसून त्यांनीं आपलीं कामें केलीं व हल्लीं सोलापुरास त्यांची बैठक असून काम चालू असल्याविषयीं समजतें. ते कोणत्या धर्तीवर व किती मर्यादेपर्यंत चौकशी करितात व त्यांनां अधिकार काय काय दिले आहेत हें आह्मास ठाऊक नाहीं. पण सोलापुरास चाललेल्या चौकशीचें स्वरूप फार कडक

आहे. असें तेथील पत्रांत लिहिलें आहे. कित्येक व्यापारी लोकांस पकडून अटकेंत ठेविल्याबद्दल व त्यांच्या वह्या जप्त केल्याबद्दल तिकडे मोठा गवगवा झाला आहे. पण आजपर्यंत चोरानीं जे हजारों रुपयांचें नुकसान केलें त्याचा सुगावा लागत असेल व पुढें चोरांस दहशत बसत असेल तर हे उपाय कडक आहेत असें मानण्याचें विशेष कारण नाहीं. एवढेंच कमिशनानें मपलें पाहिजे कीं बातमी पक्की आधाराची आहे अशी खात्री करून घेईपर्यंत त्यांनीं अनुदार लोकांचे उगीच हाल करूं नयेत. द्वेष दुस्मानीनें कोणा शत्रूचें घर माळवयाकरितां लुच्चे लोक खोट्या बातम्या देत असतात, तशांवर विशेष भर असा ठेवतां कामा नये असें आमचें मत आहे. या कमिशनाच्या प्रयत्नाचें चांगलें फळ होवो असें आम्ही इच्छितों.

**पत्रें पाठविणारांस—** चवथे पुस्तकाचा अन्वयार्थ नावाचें नवीन पुस्तक रा. रा. धोंडो बाळकृष्ण देव उर्दूअखबाराचे मराठी एडिटर यांनीं नुकतेंच केलें आहे असें दिसतें. त्यावर आक्षेप घेऊन दोन तीन गृहस्थांनीं आलीकडे आम्हांस पत्रें पाठविलीं आहेत तीं समग्र पहातां त्या पुस्तकांत दोष आहेत व रा. रा. धोंडोपंत यांना ते चांगले करतां आले नाहीं असा त्यांचा मतलब आहे व त्यांतील कित्येक ठिकाणचे दोषास्पद उतारे त्या पत्रांत त्यांनीं दाखल करून त्यांवर टीका केलेल्या आहेत. आतां वास्तविक पहातां रा. रा. धोंडोपंत यानीं केलेलें पुस्तक आमचे पहाण्यांत आलें नाहीं व त्यामुळें त्याच्या गुण दोषाविषयीं आम्हांस कांहीं माहिती नाहीं हे एक, व दुसरें असें कीं, ते पुस्तककार रा. रा. धोंडोपंत हे स्वतां एकापत्राचे एडिटर आहेत यास्तव आम्हांस पत्रें लिहिणारांनीं आपलीं पत्रें उर्दूअखबाराकडेसच एकदम पाठविलीं असतीं तर त्यांचें काम पाहून सुलभ रीतीनें व लवकर झालें असतें. उर्दूअखबाराच्या व त्याच्या कर्त्याच्या संबंधानें व्यर्थ निंदास्पद मजकूर आम्हाकडे कोणी पाठवावेत व ते प्रसिद्ध करावेत अशी आमची आरंभापासून तिलप्राय इच्छा नाहीं. व तदनुरूप वागण्याचा क्रमही आम्ही ठेविलेला आहे असें आमच वाचकांस एकंदरींत दिसून आलेंच असेल. सबब हीं पत्रें पाठविणारे गृहस्थ दोन वर्तमानपत्रांचा वाद चालवून मौज पहात बसण्या पेक्षां स्वतंत्रच त्या पुस्तककर्त्या एडिटराकडे आपलीं पत्रें अजून पाठवितील तर बरें होईल. किंवा आम्हांस परवानगी देतील तर तीं आम्ही त्याकडे रवाना करूं. या पत्रांतून जी चर्चा केली आहे तितकें हें पुस्तक वाईट असेल असें रा. रा. धोंडोपंत यांच्या विद्वत्तवरून व बुद्धिमत्तेवरून आम्हांस वाटत नाहीं.

**सुरतच्या दंग्याचें शेपुट.**

लायसेन्स ट्याक्सच्या संबंधानें गेल्या महिन्याच्या आरंभीं गुजराथेंत सुरत एथें पांच दाहा हजार लोक जमून मोठा दंगा झाला व पोलिस सुपिरटेंडेंट वगैरेवर मोठा भयंकर प्रसंग येऊन पलटणचे लोकही बोलाविले होते. ही हकीकत मागें आमचे वाचकांस समजलीच आहे. दंग्यातील पुढारी अशा कित्येक लोकांस सेशन कमीट करून सरकारानें मोठमोठाल्या शिक्षा दिल्या. व तें प्रकरण बहुतेक बिनालें असें वाटलें होतें. इतक्यांत या आठवड्यांत असें वर्तमान आलें आहे कीं, मि० किकाभाई परभुदास गुजरायमित्र वर्तमानपत्राचे एडिटर व मि० मंचाराम देशमित्र पत्राचे एडिटर आणि गुलाबदास वकील यांस कैद करून किल्यांत ठेविलें आहे. व जामिनाविषयीं त्यांनीं तजवीज केली असतां सरकारी अधिकाऱ्यांनीं ती मान्य केली नाहीं. याचप्रमाणें दुसरे दोन व्यापारी गणपतराम अंबाराम आणि हिरजी मीला यांसही अटकेंत ठेविलें आहे. यांजकडे कांहीं मुद्याचे कागदपत्र सांपडले आहेत असें समजतें. आतां त्या कागदांचें स्वरूप काय आहे व त्यांचे योगानें धरलेले गृहस्थ कशा प्रकारचे गुन्हेगार आहेत हें समजल्याशिवाय आम्हांस कांहीं लिहितां येत नाहीं. देश काल वर्तमान पाहून लोकानीं अशी गडबड करूं नये हें फार चांगलें. यांत कार्य करतांना सुख नाहीं, व परिणाम तर फारच दुःखकारक सबब असे प्रसंग मुळीं आणूं न ये व आल्यास टाळावे.

**दुसरी एक भयंकर आग—** खानदेशांत जळगावास कापडाची गिरणी नवीनच झालेली आमचे वाचकांस ठाऊक असेलच, तिला १२वे तारखेस रात्रौ आग लागून सुमार ४।९ लक्षाचें नुकसान झालें. कापूस, सूत, कापड, गंठ्ठे, व इमारतीचा बराच भाग अग्निनारायणानें गट केला. या लगयास स्वदेशीय व्यापराचीही एकच गिरणी झाली होती तिला परमेश्वरानें मोठें नुकसान आणिलें याबद्दल वाईट वाटतें! इच्छा त्याची!

## वऱ्हाड.

कमिशनर साहेब चिखलदऱ्यासच आहेत. जुडिशियल कमिशनर साहेब पहिले तारखेचे सुमारास एथें येणार आहेत. त्यांचे बंधू त्यांचे भेटीस आले आहेत तेही त्याच सुमारास परत जाणार असें कळतें.

मि. इनलग साहेब हैदराबादेस वऱ्हाडचे सेक्रेटरी आहेत ते लवकरच इकडे परत येऊन खामगावास काम पाहूं लागतील असें वर्तमान आलें आहे.

मि. कीज साहेब कमिशनर साहेबांचे हेडक्लार्क रजेवर गेले आहेत ते कामावर परत येत नाहींत असें वाटतें. कारण त्यांचे जाग्यावर मि. स्टेसी साहेब, त्यांचे जाग्यावर मि. जोन्स साहेब, त्यांचे जाग्यावर वाशिमचे मि. मकाई साहेब, व वाशिमास जु० कमि० आफिसांतील मि. मदीरा साहेब यांच्या नेमणुका झालेल्या कायम झाल्याची बातमी पसरली आहे. या वर्गांवगींत मि. थामसन साहेब अकोल्याचे सेकंड क्लार्क यास कोठें कांहींच प्रमोशन मिळाल्याचें दिसत नाहीं. ते हुशार असून आज सहा वर्षें १०० रुपये पगाराच्या एका जागेवर आहेत. पुढें मागें कोणी त्यांवर कृपेची नजर करावी अशी आमची त्यांस शिफारस आहे.

मे० अबदुलहक्क साहेब पीरजादे कर्नाळकर सुटींत हैदराबादेकडे गेले आहेत व तिकडे त्यांचे लग्नाचा निश्चय झाला. नवाब उसमानअली खानबहादूर साहेब यांची कन्या वधू असून जून महिन्याचे २६ वे तारखेस लग्नसमारंभ होणार असें समजण्यांत आलें आहे. हें ऐकून आम्हांस संतोष होतो. अब्दुलहक्क साहेब मोठ्या खानदानींतील असून त्यांचे पहिलें कुटुंब नामांकित थोर घराण्यांतील होतें व त्याच्या मरणजन्य दुःखानें ते उदासीन होते. अशा समयांत हे नवीन त्यांना अनुरूप असें थोर घराण्याचें स्थल मिळालें. हें त्यांना अधिक हुरूपास कारण झालें.

मे० अबदुलहक्क साहेब यांचे वडील बंधू खान साहेब शमसुदीन अलिखान हे दुष्काळाचेवेळीं घोडनदीसमामलेदार होते तेव्हां त्यांनीं विपत्तिग्रस्तास सहाय देण्याचें काम फार उत्तम केलें असें सर रिचर्ड टेंपल साहेब मुंबईचे गवरनर यांचे नजरेस आल्यावर त्यांनीं खुश होऊन त्यांस खानबहादूर असा किताब देण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास शिफारस केली व ती त्यांनीं मान्य करून त्यांस किताब दिला. व सिकंदराबादेस ४०० रुपये पगाराची असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंटची जागा दिली. आतां एयुन सिकंदराबादेस गेलेले असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट मि० हापसन साहेब हे लवकरच परत येतील असें दिसतें. अब्दुलहक्क साहेबाचे बंधूनेही चांगलें नशीब काढिलें ही संतोषाची गोष्ट होय.

असें वर्तमान आहे कीं, रा. रा. सखाराम दत्तात्रय जळगावचे तहशिलदार यांस लवकर पेनशन घ्यावयास सांगणार व त्यांचे जागेवर मि० नवलकिशोरखा यांस नेमणार. पंचावन वर्षांची अट आतां राहिलेली नाहीं, तर सखारामबापासारख्या भल्या मनुष्यास आणखी कांहीं दिवस तहशिलदार राहूं दिलें तर चांगलें होईल. व प्रकृतिमानानें काम करण्यासही ते चांगले सशक्त आहेत. पण सरकारचा उद्देश काय आहे तो ठाऊक नाहीं.

रा. रा. कृष्णराव हरी कोलटकर क्लार्क आफ धि कोर्ट नरनाळयाहून गेले रविवारीं एथें आले होते ते पुन्हा मंगळवारीं परत गेले.

बाळापुरास रा. रा. अच्युतराव पुरुषोत्तमराव देशपांडे व रा. रा. रामचंद्र कृष्णराव देशपांडे यांच्या घरीं त्यांच्या मुलींच्या लग्नाचे समारंभ मोठ्या कडाक्यानें चालू आहेत. एक लग्न प्रतिपदेस होणार होतें पण आतां दोन्ही पंचमीस होणार.

मि० हेनरी हेक्स्टर साहेब एथें व खामगावास कंट्राक्टर होते त्यांस उमरावतीचे म्युनिसिप्यालिटींत १९० रुपये पगाराची सेक्रटरीची जागा मिळाली असें एथें वर्तमान आहे.

पाण्याचें तापत्रय फारच झालें आहे. उन्हाळा फार प्रखर होतो. व एकादे वेळीं ढगें येऊन मनस्वी तलखी होते. परमेश्वर कृपेनें पर्जन्य काळ लवकर येऊन तो यथेच्छ होवो अशी इच्छा आहे.

वाशिमापलीकडे इंगोली वाजुस व मोंगलाईंत नांदेड वगैरे गावीं महामारीचा प्रळय बराच उद्भल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे. नांदेडाहून आलेले एक गृहस्थ सांगतात कीं, दीड महिन्यांत सुमार १२०० मनुष्यें तेथें या बाईचे भक्षस्थानीं पडलीं. शिवाय महागाई अतिशय असून पाण्याचाही मोठा ताप आहे.

रा. रा. रामराव पुरुषोत्तम देशपांडे एथील धर्माधिकारी यांस शंकराचार्यांनीं बहिष्कृत केलें होतें ते लोकांनीं मानिलें नाहीं असें दिसतें. गेल्या व्यतिपाताचे दिवशीं यजुः शाखेचे पुष्कळ ब्राह्मणानीं त्यांचे एथें जाऊन अन्नव्यवहार केला. ही आज्ञा यज्ञोपवीतमात्रास होती, शाखाभेदानें कांहीं लोकांपुर्ती नव्हती तरी शास्त्री भिक्षुक अशा यजुर्वेदी ब्राह्मणांनीं जर तिचा अवमान केला तर अश्रद्धालु गृहस्थ मग त्यांची किती प्रतिष्ठा ठेवणार आहेत हें उघडच आहे. सारांश कलियुगामध्यें धर्माचरणाविषयीं कोणास कांहीं नियमन राहिलेलें नाहीं त्यामुळें असेच अनंत घोंटाळे होऊन शेवटीं भविष्यपुराण प्रत्ययास यावयाचें असा ईश्वरी संकेत दिसतो.

पुण्याच्या ग्रंथप्रकाशक मंडळीच्या जनरल कामिटींत आमचे राव बहादूर नारायणभाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर यांस मेंबर निवडिलें आहे.

## वर्तमानसार.

श्री. यशवंतराव महादेव देवमामलेदार पुण्याहून विंचुरास आले.

सालमजकुरीं पैशाची फार ताणाताण असल्या कारणानें सिमला एथील सरकारी बंगला बांधण्याचें काम तहकूब ठेवण्याविषयीं स्टेट सेक्रेटरी यांजकडून हुकूम आला आहे.

इंग्लिशमन पत्रावरून कळतें कीं, महाराज होळकर यांणीं आपल्याकडून मिळण्याजोगी सर्व फौज या देशाच्या संरक्षणार्थ किंवा बाह्यदेशीं लढाई करितां ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन करण्याविषयीं आपली इच्छा प्रदर्शित केली आहे याचें नांव राजनिष्ठा. इं. प्र.

ऐसलन्ड बेटांत हेक्ला नामक ज्वालामुखी आहे त्यांतून हल्लीं विस्तव, प्रचंड ज्वाला, व धूर निघण्याची सुरुवात झाली असल्याचें कळतें.

मुंबई एथील दोन वोहोऱ्यांनीं पोलिसाचे परवानगी शिवाय दगडी तेल व दुसरे पेट घेणार कांहीं पदार्थ आपल्या घरांत सांठवले सबब माजिस्त्रेटांनें त्या प्रत्येकांस पन्नास पन्नास रुपये दंड केला. असले पदार्थ शहरांत अथवा कोठेंही मध्यवस्तींत न ठेवूं देण्याविषयीं सर्व ठिकाणीं बंदी असावी हें फार बरें, कारण यापासून मोठे अनर्थ होण्याचा संभव असतो.

मि. अल्ली आकबर बिन हाजी हुसेन हे विलायतेस इंडियन सिव्हिल एंजिनियरिंगची परीक्षा देण्यास गेले.

मि. एफ. एफ. आरबथनाट मुंबईचे कलेक्टर हे या वर्षाचे अखेरीस विलायतेस पेनशन घेऊन जाणार.

पंजाब वायव्यप्रांत व औद या प्रांतांत धंदे पट्टीबद्दल व जमीनीवरील धारा वाढविण्याकरितां जो कायदा केला त्यास स्टेट सेक्रेटरीचें सांगशन मिळालें.

या देशांत लागवड करण्याकरितां सेक्रेटरी आफ स्टेट यांनीं ५०० पौंड उत्तम अमेरिकेंतील कापसाचें बीं पाठविल्याचे कळतें. अमेरिकन कापसाची लागवड धारवाडाकडेस बरीच होत असते. या कापशीचा खानदेशांतही अलीकडेस बराच पेरा होऊं लागला आहे. कापसाच्या पेऱ्याकडेस आमचे शेतकरी. अधिक लक्ष्य देतील तर बारीक कापड काढण्याकरितां आमच्या गिरणीवाल्यास परदेशांतून कापूस आणावा लागणार नाहीं.

गेल्या रविवारीं जमखिंडी एथें मोठें तुफान होऊन कडाक्याचा पाऊस पडला. चार तासांत सुमारें एक महिना आणखी पाणी पुरेल इतका तळ्यांतून संचय झाल्याचे कळतें.

हैसूर पैकीं अष्टाग्रत जिल्ह्यांतील हसन नावाच्या गावीं कांहीं मुलांनीं अम्मा करितां आपल्या पैकीं एका मुलास ठार मारल्याचें कळतें.

सन १८७५।७६ सालचा टेलिग्राफ खात्याबद्दल रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें कीं, तारांच्या लैनीकरितां आजपर्यंत ३,०७,५७,५६७ रुपये खर्च झाला. पैकीं १३७२८९८ रुपये रेलवेवरील तारांच्या लैनीस लागले. तारांपासून या सालांत १९,४८,०८३ रुपये उत्पन्न झालें.

कोल्हापुरचे महाराजाच्या मुंजीची तीथ वैशाख शुद्ध १२ व लग्नाची वैशाख वद्य ५ याप्रमाणें नेमिली आहे. ने. ओ.

दुष्काळ न पडण्याबद्दल वगैरे करतां जे उपाय करण्याचें हिंदुस्थान सरकारानें योजले ते स्टेट सेक्रेटरींनीं पसंत केले असें समजतें.

पुण्याच्या डेकन हेल्ड पत्रावर अब्रूची फिर्याद झाली होती. पण माजिस्त्रेटांनें ती फाडून टाकली तरी त्या कामांत पुणें अबझावर पत्राचे मालक पार्शी गृहस्थ याजवर खोट्या साक्षीचा खटला होणार आहे असें ह्मणतात.

ज्या पत्रकर्त्यांपासून नवीन कायद्यावरून करार लिहून घेतले असतील त्या पत्रकर्त्यांस त्या जबाबदारींतून खुले करावे असा डाका प्रांताच्या कमिशनरास हुकुम गेला आहे.

सिविल कामदारांस तूर्त फर्लो रजा मिळूं नये असें ठरल्याचें समजतें. अ. द

---

## बोध

मनुष्यमात्राचें कांहीं नुकसान झालें ह्मणजे त्याकरितां तीं रडतात, ओरडतात, जिवाचा आटापिटा करतात, कपाळ फोडितात, ऊर बडवून घेतात, आणि ईश्वरास तूं कसारे चांडाळ, अरे दुष्टा देवा, हें संकट कसें मजवर आणिलेंस? असें ह्मणून त्याला नावें ठेवितात. तर ही त्यांची मोठी चूक आहे, ते वेडेपणानें उगीच ईश्वराला दोष देतात, व महा पातकांत पडतात आणि आपल्या जिवाचा नाश करून घेतात.

आतां पहा कसें तें— आपण आपल्या बरोबर कांहींएक घेऊन आलों नाहीं, घर दार नाहीं, शेत पेत नाहीं, धन दौलत नाहीं, हंडा मडकें नाहीं, मूल बाळ नाहीं, बायको पोर नाहीं, गुरें ढोरें नाहींत व जमीन जुमलाही नाहीं; सारांश कांहींएक आपलें असें नाहीं. व आपलें समजणें ही एक मोठी भ्रांति आहे. ह्या जगांतील सुख ईश्वरानें आपणास उसनें दिलें आहे त्यानें जर परत मागितलें तर तें आज इतके दिवस तूं आपल्या खुशीनें मजजवळ माझ्या सुखासाठीं ठेविलेंस ह्मणून त्याचे उपकार मानून मोठ्या आनंदानें परत द्यावें. कारण ज्याचें त्यानें नेलें त्यात राग कशास पाहिजे? तें बळकावण्यास आपण कां इच्छा करावी? तें परत देण्यास बळजोरीस कां यावें? व मागितलें ह्मणून त्यास शिव्या कां द्याव्या? आणि तेणेंकरून आपण पापांत कां पडावें? चांगला सभ्य, नीतिमान, धर्मशील मनुष्य असें करणार नाहीं.

एका श्रीमान गृहस्थाच्या बागेंत एक माळी चाकरीस राहिला होता. त्याला एकुलतें एक मूल होतें तें मेलें. तेव्हां ईश्वराचा त्याला फार राग येऊन त्यानें त्यास नाना तऱ्हेचे दोष दिले व त्याची निंदा केली.

ह्या गोष्टीस दोन तीन दिवस लोटले नाहींत तोंच त्या माळ्याच्या बागेंतील गुलाबाच्या ताक्यांतील एका झाडास असें सुंदर फूल आलें कीं तसें सुंदर फूल जन्मांत त्या माळ्यानें पाहिलें नव्हतें. हें फूल चांगलें फुलल्यावर आपल्या धन्यास द्यावें, असा त्यानें बेत केला होता पण त्याच दिवशीं यजमान त्या बागेंत फिरावयास आला होता. त्यानें तें फूल चांगलें दिसलें ह्मणून त्यानें तोडून घेऊन घरांत उत्तम ठिकाणीं ठेविलें. दुसरे दिवशीं सकाळीं त्या माळ्यानें त्या झाडावर पाहिलें तो फूल नाहीं, तेव्हां त्याला फार वाईट वाटलें, राग आला आणि शिव्या देऊं लागणार इतक्यांत त्याला कळलें कीं यजमानानेंच तें फूल तोडून नेऊन घरांत चांगल्या ठिकाणीं ठेविलें आहे, हें समजतांच त्याचा राग शांत होऊन त्यास उलटा आनंद झाला.

ही गोष्ट यजमानास कळल्यावर तो त्या माळ्यास ह्मणाला माझ्या बागेंतील फूल मी घेतलें हें तुला समजल्याबरोबर आनंद झाला, त्याप्रमाणेंच तुझें मूल हें ईश्वराचें फूल होतें, त्यास आवडलें ह्मणून तें त्याचें त्यानें नेलें त्यांत तुला राग कां यावा? वाईट कां वाटावें? उलटें बरें वाटावें. ह्या यजमानाच्या बोलण्याकडून त्या माळ्याची समजूत झाली आणि चीप राहिला.

मु० खे०

---

## नोटिसा.

शेठ शिवबक्ष पन्नालाल मारवाडी दुकाने मौजे शेरी बुजरूख तालुके अकोट यासी राघोजी वल्लद गोबाजी व पंढरी वल्लद राघोजी अवचाळ रहाणार मौजे शेरी बुजरूख तालुके अकोट याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो ऐसाजे, तुह्मी तारीख २० माहे एप्रिल सन १८७८ इसवीच्या उर्दूअखबार वर्तमानपत्रांतून नोटिस दिली तिचें उत्तर येणेंप्रमाणें:—

आह्मी आपली मौजे शेरी एथील जागा तुह्मास विकली नाहीं. सालबंदीचे रुपयांत आह्मी आपली जागा तुह्मापाशीं गहाण ठेविली होती व त्या सालबंदीपैकीं २ सालबंद्या द्यावयाच्या राहिल्या आहेत व ते रुपये आह्मी देण्यास सिद्ध आहों. माझे जागेवर तुमचा बिलकूल हक्क नाहीं एकवेळ आह्मा बापालेकांत फूट पाडून बुध्यापासून तुह्मी एक दस्तैवज लिहून घेतला होता. पण सदहू दस्तैवजावर सही झाली नाहीं अगर त्याबद्दल रुपये ही घेतले नाहींत व ते पक्कें होणें न होणें आह्मा बापालेकांचे भेटीवर अवलंबून राहिलें होतें. आह्माला जागा विकण्याची गरज नाहीं. सदहू बिनसहीचा लेख रद्दीच असे. या नोटिशीचा खर्च ८ दिवसांचे आंत आणून द्यावा कळावें. तारीख १३ माहे मे सन १८७८ इसवी.

(सही) राघोजी वल्लद गोबाजी अवचाळ
पंढरी वल्लद राघोजी अवचाळ
या उभयतांच हातच्या
निशाण्या.

ताजा कलम— सालबंदीशिवाय तुमचे आह्माकडे १२५ एकशें पंचवीस रुपये आहेत व ते आह्मी तुह्मास देण्याकरितां पांच चारवेळा तुमचे एथें घेऊन आलों पण ते तुह्मी घेतले नाहींत व घरावर हक्क करतां हें फार गैर आहे. आह्मी कार्तीक मासी प्रथम तुमचे एथें रुपये घेऊन आलों पण तुह्मी परत केले ह्मणून सदहू रुपयाचें व्याज तेव्हांपासून तुह्मास मिळणार नाहीं. व जागाही देणार नाहीं. कळावे तारीख १३ माहे मे सन १८७८ इसवी.

---

### नोटिस

रा. रामामाळी वल्लद हरमाळी रहाणार पिंजर तालुके अकोला यांस खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचें शेत मौजे मोझरी एथील सर्वे नंबर १५ नदीथडीचें माझ्या नावानें असून मी तुह्मास गहाण दिलें होतें व ५७ रुपये त्याबद्दल घेतले होते ते रुपये आह्मी तुह्मास देत असतां तुह्मी घेत नाहीं. ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे. तरी ही पावल्यापासून ८ दिवसांत आपले रुपये घेऊन आमचे वावर आमचे स्वाधीन करावें याप्रमाणें न केल्यास दिवाणींत फिर्याद करून वावर परत घेऊं. कळावें तारीख १५ माहे मे सन १८७८ इसवी.

(सही) सखाराम वल्लद भोवानजी
सोनटक याचे हातची
निशाणी आहे.

---


## जाहिरात.

## नवीन बुकाची जाहिरात.

(प्रती फार थोड्या काढल्या आहेत घेणारांनीं जलदी करावी.)

## मुंबई हायकोर्टाच्या दिवाणी व फौजदारी सर्क्युलरांचें बूक.

ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति आह्मी तयार केली आहे. ह्यांत आजपर्यंत रद्द झालेलीं सरक्यूलरें काढून नवीन आलेलीं सर्व जेथील तेथें घालूनीं आहेत. ह्या शिवाय शेवटीं सन १८७७ चा आक्ट १० ह्यांतील चवथे परिशिष्टांतील सर्व नमूने दिले आहेत. बूक तारीख १ जून पासून विकत मिळेल. किंमत सरकारी कामगारास फक्त सरकारी कामा करितां घेणें असल्यास रुपये ३०।१ व इतरांना रुपये ४०३ पुणें बाहेरील लोकांना टपालाचा व मेण कापडाचा खर्च ०६ पडेल. नाटपेडपत्र घेणार नाहीं. स्टांप पाठविल्याशिवाय उत्तर मिळणार नाहीं. किंमत वगैरे रोख आल्याशिवाय बूक रवाना होणार नाहीं. रुपयास अर्धा आणा वर्ताळ्याशिवाय टिकिटें पाठवूं नये. लवकर मागणी केल्यास मुद्दाम बूक राखून ठेविलें जाईल. बुकाबद्दल सर्व व्यवहार रा. रा. भाऊ गोविंद सापकर ज्ञानचक्षु छापखान्याचे मालक यांजकडे ठेवावा. तारीख ७ मे सन १८७८ इसवी.

व्यंकटराव रामचंद्र वकील.

---

## जाहिरात.

NOTICE.

THE BANK OF BOMBAY

The Khamgaum Branch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 per-cent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, and upwards other arrangements may be made by addressing the under signed.

Harry H Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November


---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० २६ माहे मे सन १८७८ इसवी. | अंक २१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढे दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

## कामिडी आफ एरर्स

अथवा

## भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## वैद्यप्रकाश.

वैद्यप्रकाश नावाचा नवीन ग्रंथ तयार होऊन आह्माकडे विक्रीस आला आहे. सदर्हू ग्रंथांत वैद्यक संबंधी सर्व विषय घेतले आहेतच. परंतु सर्प, कुत्रे, उंदीर, विंचू, वगैऱ्यांच्या विषावर तर फारच उत्तम योजना झाली आहे. ग्रंथाचे भाग तीन केले आहेत. त्यांतील तात्पर्य लोकांच्या ध्यानांत येण्याकरितां प्रत्येक प्रकरणाचा सारांश येणेंप्रमाणें:—

प्रकरण १. — यांत स्त्रियांच्या जाती व लक्षणें, ऋतुकाल, व नियम गर्भाचीं लक्षणें, व तो गर्भ पोटांत असतां, स्त्री, किंवा पुरुष, अगर नपुंसक ओळखण्याचा प्रकार, गर्भिणीचे नियम, प्रसूतकाल, पुरुषाच्या प्रकृति, दूतपरीक्षा, वैद्यास शकून, स्वप्नाचें फल, वैद्य लक्षण, अष्टविध परीक्षा, असाध्य लक्षण, औषधी आणावयास, करण्यास, रोग्यास देण्यास, व त्यास स्नान करण्यास मुहूर्त, ज्योतिषअभिप्राय, देशकाल लक्षण, दोष प्रकोप कारण, औषधी युक्तायुक्त विचार, व आणावयाचा प्रकार व देण्याचा काल, औषधी प्रतिनिधी सर्व रसांचे गुण, औषधादिकांचें मान, दिनचर्या, ओकारीचा व ढाळाचा विधी, सर्व रोग वर्णानुक्रमानें अ पासून ज्ञ पर्यंत, रोगांची उत्पत्ति, त्यांवर औषधी व पथ्य, अपथ्य.

प्रकरण २.— धातूपधातु, रसोपरस, विषोपविषें, व रत्नोपरत्नें, इत्यादिकांची शुद्धी व मारण, भस्में करण्यास पुटें द्यावयाचा प्रकार, [ यंत्रें ] यांत मुशी यंत्रें व त्यांच्या आकृति व पुटें देण्याचा प्रकार, रसायनें, मात्रा, वर्णानुक्रमानें, तसेंच पाक, अवलेह गुटिका, चूर्णें, गुग्गुळ घृतें, तैलें, अनुपान प्रकरण, धातुपुष्टीचीं औषधें, अजीर्ण मंजिरी, पोतविधि, अर्कप्रकाश, कर्मविपाक, इ. वर्णानुक्रमानें.

प्रकरण ३. — यांत सर्व वनस्पतींचे गुणदोष वर्णानुक्रमानें सांगितले आहेत. ह्या एकाच ग्रंथाचे संग्रहानें अनेक ग्रंथांचे श्रय येणार आहे. याची किंमत २०८ दोन रुपये आठ आणे व टपाल हशीलाबद्दल ०२०६ एकूण २०१०० ६ आह्माकडे पाठविले असतां पुस्तक तावडतोब रवाना करण्यांत येईल. कळवें तारीख १९ मे सन १८७८ इसवी.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

## नवीन बुकाची जाहिरात.

( प्रती फार थोड्या काढल्या आहेत घेणारांनीं जलदी करावी. )

## मुंबई हायकोर्टाच्या दिवाणी व फौजदारी सर्क्युलरांचें बूक.

ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति आह्मी तयार केली आहे. ह्यांत आजपर्यंत रद्द झालेलीं सरक्युलरें काढून नवीन आलेलीं सर्व जेथील तेथें घातलीं आहेत. ह्या शिवाय शेवटीं सन १८७७ चा आक्ट १० ह्यांतील चवथे परिशिष्टांतील सर्व नमुने दिले आहेत. बूक तारीख १ जून पासून विकत मिळेल. किंमत सरकारी कामगारास फक्त सरकारी कामाकरितां घेणें असल्यास रुपये ३०११ व इतरांना रुपये ४०३ पुण्याबाहेरील लोकांनी टपालाचा व मेण कापडाचा खर्च ०६ पडेल. नाटपेडपत्र घेणार नाहीं. स्टांप पाठविल्या शिवाय उत्तर मिळणार नाहीं. किंमत वगैरे रोख आल्याशिवाय बूक रवाना होणार नाहीं. रुपयास अर्धा आणा वर्ताळ्या शिवाय टिकिटें पाठवूं नयेत. लवकर मागणी केल्यास मुद्दाम बूक राखून ठेविलें जाईल. बुकाबद्दल सर्व व्यवहार रा. रा. भाऊ गोविंद सापकर ज्ञानचक्षु छापखान्याचे मालक यांजकडे ठेवावा. तारीख ७ मे सन १८७८ इसवी.

व्यंकटराव रामचंद्र वकील.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

या परी सकल शास्त्रविलास ।
स्पष्ट शोभविति त्या नगरास ॥
ब्राह्मणांस मिळतां बहुमान ।
क्षत्रियांसहि चढे अभिमान ॥ ४६ ॥
राजपुत्र धरुनी उमेद ते ।
होति शीघ्र चललक्ष्यभेदिंत ॥
नित्य त्यांस रुचि युद्धकीर्तिची ।
नाहि लेश परवा स्वमूर्तिची ॥ ४७ ॥
चढाओढीनें ते अधिकचि धनुर्वेद पढती
गदाखड्गादीनीं निजसदनिं खोटेच लढती
उपायें या शत्रुक्षपितविविधास्त्रा चुकवुनी
स्वयें छेदाविल्या अशिकुशलतायें युवजनीं ४८
हस्तीवरी बैसुनि हस्तियुद्ध ।
अश्वावरी बैसुनि अश्वयुद्ध ॥
ते लाविती साहस हें विचित्र ।
या साहसाचें यश बाळमित्र ॥ ४९ ॥
प्रत्यालीढप्रमुख कथितो
जीं धनुर्वेद ठाणें ।
ज्यांतें भीष्मार्जुनरविसुत-
प्राय योध्धाचि जाणे ॥
तीं अभ्यासें वश असति त्या
राजपुत्रांसि सर्व ।
त्यांच्या योगें जणु हरिति ते
अंतकाचाहि गर्व ॥५०॥
असेंच हस्त्यश्व रथास फेरिती ।
नाना गतीच्या शिकवोनि ते रिती ॥
ते अश्वशास्त्रा नळसेच जाणती ।
ह्मणोनि त्यांचे नच अश्व शीणती ॥५१॥
स्वच्छंद सिंहावरुनीहि घोडे ।
नेती जवानें उडवूनि कोडें ॥
नाहीं तया कांहिंच ही शितापी ।
दावील ऐसा न दुजा प्रतापी ॥५२॥
सांजे अखाड्यामधिं दांडपट्ट ।
ते खेळतां होति हतास घट्ट ॥
चापल्य सिंहाहि गणी न ऐसे,।
देखीं तयांच्याचि, दुज्या न तैसं ॥५३॥
ते बाहुयुद्धीहि तसे प्रचंड ।
पृथ्वीतळीं या न तसे उदंड ॥
जे श्येनपातादिक दुष्ट पेंच ।
त्यांतें खरे जाणति एक तेच ॥५४॥
सेनेचीं च्यारि अंगें सजवुनि करि जो
व्यूह सेनाप आधीं ।
त्यांतें फेरूनि अन्या क्षणहि न लगतां
दुर्घटातेंहि साधी ॥
तेव्हां अक्षौहिणींची जरिहि इतरथा
मांडणी होत आहे, ।
ती एका पुरुषाची तशिच गमति हो
काय एकाग्रता हे ॥ ५५ ॥
चमूमधीं त्या कपटी न पातकी, ।
न मत्सरी वा अवसानघातकी ॥
न भीरु लोभातुर वा उदास वा, ।
न मत्त नानाव्यसनी, असा युवा ॥५६॥
राजे चमूला बहुमान देती ।
तेणें चमूनायक हृष्ट होती ॥
अशा गुणें ते ममताभिमानी ।
होतां न कां होइल शत्रुहानी ॥५७॥

( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० खालीं लिहिलेल्या मजकुरास जागा द्याल अशी आशा आहे.

### हानी साहिली जाते, पण सज्जन नाहीं सहन होत.

मनुष्यमात्राचे मागें लोभ हा असा जबरदस्त शत्रु लागलेला आहे कीं तो हवीं तितकीं दुःखें व संकटें सहन करवितो पण सज्जनाप्रीत्यर्थ यत्किंचित् श्रम व जोखीम सोसण्याचा प्रसंग आला तर तो सहन करण्यास विवेक काडीमात्र धैर्य देत नाहीं. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. आतां अशा वर्तणुकीचे सर्वच लोक असतात असें नाहीं तथापि वरील ह्मणीप्रमाणे परिणाम घडून सर्वस्वी लयास गेलेल्या लोकांचीं शेकडों किंबहुना असंख्य उदाहरणें सांपडतील.

दुर्योधनानें आपले १०१ बंधुजनासह सर्वस्वाचा नाश करून घेतला पण न्याय मार्गास अनुसरून युधिष्ठिरादि पंडुपुत्रांस हिस्सेरसीनें किंबहुना एक सुद्धां गाव दिला नाहीं. जरासंधानें आपला देह अर्पण केला पण कारागृहांतील राजे बंदमुक्त केले नाहींत.

रावण आपल्या लक्षपुत्रासह व सवालक्ष पौत्रांसह बळी गेला पण एक सीता परत देऊन श्रीरामचंद्राशी मैत्री जोडली नाहीं याला कारण लोभच नसावा काय? मला तर वाटतें याला सर्वस्वी कारण लोभच असावा. ह्या फार प्राचीन काळच्या गोष्टी झाल्या पण अलीकडे ही अशा प्रकारचीं उदाहरणें वारंवार घडून येतात. फार दूर कशाला हल्लीं युरोपखंडांत जो कलहाग्नी प्रदीप्त झाला आहे, त्याला देखील लोभावाचून दुसरें कोणतेंच सबळ कारण दिसत नाहीं. नाहींपेक्षां युरोपांतील बहुतेक सर्व राष्ट्रें एकधर्मी असून एकमेकांचीं नातेंवाईक आहेत इतकेंच नाहीं तर खुद्द रशियाचे बादशहाची कन्याच आपल्या चक्रवर्तिनी साहेबांचे चिरंजिवास दिलेली आहे. इतकें जवळचें नातें आहे व याच उभयतां सरकारांत वैमनस्य इतकें वाढलें आहे कीं, त्या उभय सरकारच्या सैन्याची कडेकोट तयारी चालू असून केव्हां तुमुल युद्ध माजेल याचा नेम नाहीं. रशिया हा प्रबळ खराच

व तुर्कस्थानास नुक्ताच जिंकून याचे नेत्रावर लोभाचें नवें पटल चढलें आहे ह्मणून त्याच्यानें पोटच्या मुलीच्यासुध्दां हितास धक्का देण्याचें टाळवत नाहीं व धनकनक संपन्न व महान् पराक्रमी अशा इंग्रज सरकाराशीं सामना करण्यास तयार झाला हें केवढें आश्चर्य समजावयाचें ! ह्मणून अशा प्रकारें जेव्हां लोभ उत्पन्न होतो तेव्हां विवेकाचे योगानें याचा परिहार करण्याकरितां सर्वांनीं मोठें सावध राहिलें पाहिजे व सज्जनाचें प्रेम. संपादनार्थ जरी थोडें अंगावर येत असलें तरी तें मोक्या आनंदानें सोसून धन्यता मिळवावी हें सर्वांस उचित कर्म होय. ता. २१।५।७८ इ.

आपला दास रामात्मज

## वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १० शके १८००

## अमूल्य रत्नाचा नाश!

### वे. शा. सं. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचा मृत्यू!

प्राणी जन्मास आला तो मरण पावणार हें निश्चितच आहे तरी मरण फार कठीण आहे व साधारण गलितपत्र कोणी मरण पावला तरी त्याजबद्दल दुःख वाटतें मग जगविख्यात, साऱ्या राष्ट्रास आवडणारा आणि अति उपयोगी असा मोहरा अकस्मात गमावला ह्मणजे लोकांच्या चित्तवृत्ती दुःखाग्नीनें किती होरपळून जात असतील व सारें जग त्यांस कसें उदास वाटत असेल याची कल्पना असले प्रसंग जेव्हां येऊन बेततात तेव्हांच विशेष होत असते, तो दुष्ट प्रसंग आज पुण्यांतील विद्वन्मणी वेदशास्त्रसंपन्न रा. रा. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे मरणानें प्राप्त झाला आहे.

गेले सोमवारीं दोन प्रहरीं शास्त्री बावास देवाज्ञा झाली. त्यांचे चिरंजीव तीन आठ वड्यांपूर्वी एथून पुण्यास गेले त्या वेळीं शास्त्री बावांच्या आजारीपणाविषयीं देखील कांहीं वार्ता नव्हती, तेव्हां साधारण व थोड्या दिवसाच्या आजारानेच त्यांचा अंतकाल झाला असें दिसतें. यांचें वय ५४ वर्षांचें होतें. व ते नुकतेच काशीयात्रा करून आले होते. त्यांनां स्मशानामध्यें पोंचविण्यास दोनशें मंडळी गेली होती, व यांच्या मरणानें सारें पुणें शहर हळहळलें, आणि त्यांच्या आदरार्थ त्या दिवशीं लायब्ररी, गायनसमाज, व वेदोत्तेजक मंडळींचा समारंभ हीं बंद राहिलीं होतीं. व गुरुवारीं त्याकरितां स्मारक कय करावें ह्मणून पुण्यास मोठी सभा भरली होती.

इतक्या लवकर शास्त्री बावांचें मरण ऐकण्यास आह्मी तयार नव्हतों ह्मणून अकस्मात तें ऐकतांच छातींत मोठा धक्का बसल्यासारखें झालें, व बराच वेळ सर्व मनोवृत्ती स्तब्ध झाल्या. कृष्ण शास्त्री हे विद्या, ज्ञान, चातुर्य, थोरवी, व बुद्धि यांच्या उत्तमतेनें केवळ एक सत्पुरुष आह्मामध्यें होते. साऱ्या महाराष्ट्र देशाला किंबहुना मुंबई इलाख्याला यांच्या पूर्वोक्त सद्गुणाचा लाभ होत होता, व साऱ्या हिंदुस्थान देशाच्या कल्याणासाठीं ज्या ज्या महत्विक गोष्टी पुणे प्रांतीं व्हावयाच्या त्यांत त्यांत ते असत, एवढेंच नाहीं तर त्या बहुत कर्यांचे ते अग्रणी ह्मणजे अध्यक्ष असत. लहान वयांतच ते संस्कृताचा विद्याभ्यास करीत असतां कै० मोर शास्त्री बावा साठे यांनीं त्यांच्या उत्तम बुद्धिमत्तेवरून त्यांस बृहस्पति असें नाव दिलें होतें व तें केवळ यथार्थ होतें असें त्याच्या आमरणपर्यंतच्या बुद्धिप्रकाशावरून आतां सर्वांस दृग्गोचर झालें आहे; फार तर काय सांगावें, चौघांत वागणारा महाराष्ट्र भाषाभिज्ञ मनुष्य शास्त्री बावास जाणत नसेल असा सापडणें फार विरळा. त्यांनीं केलेल्या रसभरित कित्येक पुस्तकांचें पठण हजारो मनुष्यें करीत आहेत. कोटिक्रम व विच्याराची सरणी त्यांच्या ग्रंथांत जागोजाग आढळते तेव्हां तेव्हां त्यांची अशभाक आपणास प्राप्त होण्याकरितां त्यांचें छात्रत्वच करावें असी मानसाचे ठायीं बुद्धि होते. पुण्यास कोणे प्रसंगीं समारंभांत व अन्यत्रही त्यांचें भाषण ऐकिलें ह्मणजे महत्तमतेचा मनावर तात्काळ ग्रह होऊन जाई. व कित्येकांचे तोंडून आह्मी बहुत वेळां ऐकिलें आहे कीं खासगी बैठकींतही त्यांसी ते साधारण प्रकरणांत बोलूं लागले तरी त्यांनां धाक पडे कीं, या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें, व आतां दुसरा काय प्रश्न येईल ! सारांश मार्मिकपणा त्यांजमध्यें अत्यद्भुत होता. दक्षिणाप्राइज कमिटींत ते पुस्तकपरीक्षक होते व त्यांनीं कित्येक पुस्तकावर जे अभिप्राय दिले आहेत ते वाचून पहावे व त्यांचा अभ्यास करावा असे ते समर्पक आहेत. असलेल्या गुणाची चहा व अवगुणाची झाडणी केल्याशिवाय त्यांनीं कधीं सोडली नाहीं ज्ञानप्रकाशाचे कांहीं वर्षें ते एडिटर होते व शाळापत्रक कांहीं वर्षें त्यांकडे होतें त्यांतून कांहीं कांहीं निबंध त्यानीं असे उत्कृष्ट लिहिले आहेत कीं, अनुनही ते पाहिले असतां हातेंच टाकवत नाहींत. तेव्हां अशा अनंत गोष्टींनीं लोकांच्या उपयोगी पडले त्यांचें आकस्मीक मरण ऐकून कोण हळहळणार नाहीं; पण उपयोग काय? मृत्यूला तिलमात्र दया नाहीं, व सारासार विच्यार नाहीं, त्याची ज्यावर तब्येत लागते त्याला तो एकदम घेऊन जातो व भोंवतालच्यानां शोकसागरांत लोटून देतो. तेव्हां विवेक करावा व स्वस्थ बसावें एवढेंच आपलें मर्त्यांचें काम आहे.

आतां दुःखांत सुख एवढेंच कीं कृष्ण शास्त्री यांस दोन सत्पुत्र आहेत. वडील रा. रा. विष्णु शास्त्री चिपळुणकर प्रसिद्ध निबंधमालेचे कर्ते रत्नागिरीस मास्तर आहेत ते, व दुसरे रा. रा. लक्ष्मण शास्त्री नुकतेच उमरावतीच्या हायस्कुलांत मास्तर आले आहेत ते. उभयतांही बी ए असून चांगले सद्गृहस्थ आहेत. ह्मणून ईश्वरकृपेनें ते लवकरच अधिक नावारूपास येऊन तीर्थरूपांचा लोकांस विसर पाडतील असी आशा करितों.

## बडोद्याचा रिपोर्ट.

बडोदें संस्थानचे राज्यकारभाराचा वार्षिक रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे असें इंग्लिश वर्तमानपत्रांवरून समजतें. त्याच्या प्रतीही त्या वर्तमान पत्रांस गेल्या आहेत. या जाऊं नयेत असें आमचें ह्मणणें नाहीं. पण नेटिव संस्थान आहे त्यावर नेटिव दिवाण सर टी. माधवराव हे आहेत ह्मणून त्यांच्या कारभाराची व संस्थानची माहिती आमच्या नेटिव लोकांस कळणें फार अवश्यक आहे व त्याकरितां त्या रिपोर्टाच्या प्रती माधवराव यांनीं नेटिव वर्तमानपत्रांसही देणें अवश्यक होतें पण तसें त्यांनीं कां केलें नाहीं कोण जाणें. दक्षिण महाराष्ट्र देशांतील लाहानसें संस्थान जमखिंडी याचा वार्षिक रिपोर्ट रा. ब. नारायण भिकाजी जोगळेकर कारभारी नेटिव वर्तमानपत्रांस पाठवीत असतात व त्यावरून त्या संस्थानची माहिती व कारभारांतील गुणदोष सर्वत्र प्रसिद्ध होतात तर असा प्रकार माधवरावासारख्या हुशार दिवाणानीं करू नये असें नाहीं, व या पुढें ते कदाचित असें करतीलही. अस्तु.

गेल्या वर्षांत बडोदें संस्थानास जमीन बाबीचें उत्पन्न सुमार ९० लक्ष रुपये व जकातीचें उत्पन्न सुमार ३५ लक्ष रुपये मिळून सवाकोटीचें उत्पन्न झालें व खर्च एक कोटि चार लक्ष रुपये झाला. या खर्चांत १५९१२५२ रुपये राजवाड्याकडे. ३४,८७,९२४ रुपये फौजेकडे, ४६८२३१रु. धर्मादायाकडे, २९७८०० रु. किरकोळ बाबीकडे, ५९३६४३ रु. विशेष बाबीकडे, ६९३२२४ रु. पोलिसाकडे; ८१०८९ वैद्यक खात्याकडे, व ७५३७९ रु. तुरुंगाकडे असा खर्च झालेला आहे. या संबधानें लिहितांनां आमचे नेटिवांचें हितेच्छु बांबे ग्याझेटकर्ते लिहितात कीं १५ लक्ष रु. महाराजांचे नेमणुकीकडे फार आहेत. धर्मादाय खर्चही खिचडी वगैरे वाढविण्याचें कारण नाहीं. व फौजेचा खर्च तर केवळ व्यर्थ आहे. साऱ्या जमेची सरासरी तिजाई रकम फौजेकडे जासणें कांहीं कामाचें नाहीं. व या नेटिव संस्थानाचें ब्रिटिश सरकार संरक्षण करीत असतां हा बुडीतखर्च करण्याचें त्यास कांहीं कारण नाहीं. बांबेग्याझेटकर्त्यानें असें लिहिणें स्वाभावीकच आहे परंतु आह्मासही वाटतें कीं त्याची एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे ती फौजेच्या ३४ लाख रुपयांची. जर बडोदें शहरांतही साधारण चांगले रस्ते नाहींत, मैल्यांची अतिशय घाण प्रसिद्ध रस्त्यांवरून वहात असते, दुर्गंध चहूकडे ओतप्रोत भरलेला असतो, बाराही महिने महामारीसारखा आजार तेथून आपली वस्ती काढित नाहीं, तसेंच इतर रोगांचेंही प्राबल्य विशेष, संस्थानांतही सर्वत्र पोलिसाचा चांगला बंदोबस्त नाहीं तर हीं आवश्यक कामें करण्याकडे विशेष रकम योजणें अवश्य होतें व ती रकम फौजांचे खर्चांतून घेण्यास कांहीं हरकत नव्हती असें आह्मास वाटतें.

पदाभिषिक्त राजास सवालाख रुपये महिन्याचा खानगी खर्च कांहीं फार नाहीं व त्याबद्दल ग्याझेटकर्त्यांची टीका व्यर्थ आहे. तसेंच बडोदें संस्थानचें औदार्य आज शेकडो वर्षें खिचडीच्या योगानें साऱ्या हिंदुस्थानांत दुमदुमत आहे व तें श्रेयस्कर आहे सबब ग्याझेटकर्त्यांचे मताप्रमाणें कधीं बंद करू नये. सवा कोटीच्या राज्याला चार लाखाचा धर्म कांहीं फार नाहीं.

विद्येच्या कामीं या संस्थानांत दरसाल किती खर्च होतो व त्यापासून काय फल होतें हें रिपोर्टांत लिहिलें असेल, पण तो पहाण्यास न मिळाल्यावरून त्याविषयीं कांहीं समजलें नाहीं.

महाराजांची शरीरप्रकृती चांगली सुधारत आहे. व विद्याभ्यास चांगला चालला आहे हें ऐकून आह्मांस संतोष होतो. महाराजांचे लग्नाचा बेत लवकर करावा असें मातुश्रीच्या मनांतून आहे पण मि० मलाविल साहेब कांहीं वर्षें अवकाश करावा असें ह्मणतात. पण तसा अवकाश करण्याचें कांहीं कारण नाहीं लग्नास त्यांच्या स्थितीप्रमाणें त्यांचें योग्य वय आहे. व अशा प्रसंगीं मनोत्साहाप्रमाणें त्यांचा विवाह न करणें हें त्यांस उदासीन करण्यासारखें आहे. आह्मांस वाटतें कीं, संस्थानिकांचे धर्मादाय, लग्न वगैरे खानगी गोष्टींत इंग्लिश सरकारानें विशेष मन घालू नये. उगीच फाजील व मूर्खपणाचा खर्च होईल तर मात्र दरबार संबंधानें पैशा पुरतें पहावें ह्मणजे झालें. बाकी इंग्लिश सरकार संस्थानाच्या कामाकाजांत तारकाच्यानें मन पुरवून त्याची सुधारणा करितात हो त्यांस मोठी भूषणाची गोष्ट आहे.

## रेलवे नोकरावर गदा.

रेलवेकडील कित्येक कामदार लांच खातात असा बहुत दिवस बोभाट आहे व दुष्काळ, कपाशीची तेजी वगैरे रेलवेला तेल लागण्याचीं प्रकरणें उपस्थित झालीं ह्मणजे तशा कामदारीची चांगली पोळी पिकते व मग ते चांगला हात मारतात पण या कामीं बंदोबस्त होण्याचें जरा अवघडच. वरिष्ठांनीं कसा बंदोबस्त करावा? एक ह्मणतो माझा माल आधीं चढवा मी अमुक रुपये देतों, व दुसरा ह्मणतो माझा सर्वांच्या आधीं चढवा मी अमुक रुपये देतों तेव्हां रेलवेवाल्यास कोणाचा तरी माल चढवावयाचा असतोच व तो चढला ह्मणजे त्या मालाचा धनी येऊन मुकाट्यानें त्याचा हात दाबतो. व बिनबोभाट तें काम होऊन जातें तेव्हां वरिष्ठानें काय करावें! जेथें बोभाट होतो तेथें मुकद्दमें होऊन शिरस्तेप्रमाणें शिक्षाही होतात तरी बहुत लोक उघडीस आल्यावांचून सहतात. अशी घरीं बसल्या लक्ष्मी येऊं लागली तर ती अन्यायाची ह्मणून तिचा अव्हेर करणारे ईश्वर वे लाल फारच फार थोडे सापडतील; सबब अशा कामीं जास्ती त

नवीज होऊं शकत नाहीं. व अन्यायी छपले जातात आणि मग त्यांचे पापाचा घडा भरतो तेव्हां उघडकीस येतात.

हल्लीं मुंबईस रेलवे गुड्स खात्यांकडील कित्येक मोठमोठाले कामदार अशा बाबदींत आरंटावरून धरून कैद केले आहेत व पांच पांच दहा दहा हजार रुपयांचे त्यां कडून जामीन घेऊन तूर्त मोकळे सोडले आहेत. त्यांच्या चौकशीस आतां आरंभ होईल. पुरावा कसा काय होतो पहावें. जे लोक धरले आहेत त्यांचीं नावें.

१ मि. ड्युई गुड्स एजंट.
२ मि. जनार्दन त्यांचे हेड क्लार्क.
३ मि. परेरा डेड फोरमन.
४ मि. डायात ,, ,,
५ रा. विष्णु सखाराम
६ रा. नाना घोडे हेड फोरमन.

या लोकांवर धान्य रेलवेवर चढविण्याचे बाबदींत लांच घेतल्याची लखमसी पुनसी याची फिर्याद आहे व मि. डोसाभाई कामजी माजिस्त्रेट यांपुढें त्यांची चौकशी चालू आहे. मि. ड्युइ यानें वीस हजारांचा जात मुचलका व दहा दहा हजारांचे दोन जामीन देऊन मोकळें व्हावें नाहींपेक्षां कैदेंत राहावें असें माजिस्त्रेटानीं सांगितलें पुढें त्यास जामीन मिळेनात सबब तो कैदेंत राहिला आहे. व २९वे तारखेस या मुकद्दम्याची पुढें चवकशी चालणार आहे. तेव्हां काय निष्पन्न होतें पहावें. तोंपर्यंत आह्मी याविषयीं कांहीं लिहित नाहीं.

## अमेरिकेंतील स्त्रिया.

पुरुषाप्रमाणें स्त्रिया विद्याविभूषित होणें व व्यवहारमार्गांतही त्यांची योग्यता वाढणें हे देशाच्या उत्तम स्थितीचें लक्षण होय. आपल्या हिंदुस्थान देशांत स्त्रियांस विद्या शिकविण्याचा नवीनच प्रघात पडला आहे व तेणेंकरून अजून देशस्थिति सुधारण्यास जरी कांहीं चांगलेंसें साधन झालें नाहीं, तरी गृहस्थिति सुधारण्यास त्याचा पुष्कळ उपयोग झाला आहे, व तेणेंकरून स्त्रियांस गोठ्यांतील पशूप्रमाणें न ठेवितां ज्ञानी कराव्या व खरोखर त्या सर्व गोष्टींत आपल्या साहकारी करून घ्याव्या अशी शहाण्या व रसिक मनुष्यांची खात्री झाल्यावाचून राहिली नाहीं. तरी हा केवळ स्त्रियांच्या सुस्थितीचा ओनामा आहे. विलायतेस देखील या कामीं अजून अमेरिकेची सर आली नाहीं. अमेरिकेंत पुष्कळ सुशील स्त्रिया मोठमोठल्या व्यवहार धंद्यांत अग्रेसर झालेल्या आहेत हें पाहून कोणा ज्ञानी मनुष्यास संतोष होणार नाहीं? अशी स्थिति सर्वत्र व्हावी असें आह्मी मनापासून इच्छितों.

अमेरिका खंडांत चिकागो ह्मणून नामांकित शहर आहे तेथील स्त्रियांविषयीं आह्मांस समजलेली माहिती आह्मी आपले वाचकांस कळवितों. तयें तीन स्त्रिया बारिष्टरचें काम उत्तम करितात व त्यांस त्या धंद्यांत इतके चांगले उत्पन्न होतें कीं, शहाण्या, न वर्तरीत तरूण बारिष्टरांनीं त्यांचा हेवा करावा. एक स्त्री कायद्या कानूत प्रवीण होऊन तिनें एका विद्वान् जडजाला वरिलें आहे व त्याचे कामाची ती अर्धेविभागिनी झाली आहे. विद्याविषय तर तेथील स्त्रियांस केवळ आवडती चीज होऊन गेलेली आहे. ७१८ उत्तम वर्तमानपत्रांत स्त्रिया एडिटर आहेत. व रिपोर्टर, कारस्पांडंट (बातम्या लिहिणाऱ्या) व रिव्हयुअर (ग्रंथाचे गुणदोष विवेचक) वगैरे कामावर पुष्कळ स्त्रिया आहेत. व्यापारांत ब्रोकर ह्मणजे दलालाच्या कामावर कित्येक स्त्रिया आहेत व एक स्त्री सरकारच्या पेनशन एजंटच्या हुद्यावर आहे व तिच्या हाताखालीं १०१२ क्लार्क आहेत.

इतकी स्त्रियांची प्रवीणता अन्यत्र कोठें अजून आढळून आली नाहीं ह्मणून तसा दिवस ईश्वरानें लवकर आणावा.

## लढायी.

तुर्कस्थान व रशिया यांच्यात पुन्हा बेबनाव होण्याचें थोडेंसें चिन्ह गेल्या आठवड्यात दिसून आलें होतें पण त्याविषयीं या आठवड्यांत कांहीं नाहीं. रशियाची फौज कानस्टांटिनोपलच्या अगदी जवळ जवळ येऊ लागली आहे त्यावरून सुलतानास भय दाखवावें, किंवा कानस्टंटिनोपल घ्यावें या इराद्यानें ही खटपट आहे कीं काय अशी पृछा होऊन तिचें निराकरण झालें कीं, फक्त चांगली हवा व आरोग्य यां करितांच हा फौजेचा थारापालट आहे दुसरें कांहीं नाहीं— कानस्टंटिनोपल शहरांत दंगखोर मुसलमान लोकांनीं बरीच गडबड केली. पुष्कळ लोक जमून राजवाड्यांत गेले व माजी बादशहा सुलतान मुराद तेथें प्रतिबंधांत होता त्याला भेटले व आपला आनंद प्रदर्शित केला. पुढें यांचा इरादा काय आहे तें अजून परिस्फुट झालें नाहीं. इंग्लंड व रशिया यांजमधील लढायीविषयींही कांहीं वर्तमान नाहीं. रशियाचा वकील कौंट स्कावलाफ रशियांतून परत इंग्लंडास गेला. त्याचें भाषण अजून परिस्फुट झालें नाहीं. तरी मिटवामिटवीचा रंग आहे असें ह्मणतात. रशियांतील वर्तमानपत्रें इंग्लंडाविषयीं उच्छृंखलपणानें लिहीत असत तीं आतां सौम्यवृत्तीनें व सभ्य रीतीनें लिहीत असतात— रशियानें अमेरिकेंत कालिफोर्निया एथें एक लढाऊ जहाज खरीदी केलें आहे व तें चाचेपणा करितां समुद्रांत ठेवण्याचा विच्यार आहे असें ह्मणतात. रशियन लोक इजिप्त देशावर स्वारी करतील किंवा हिरातकडून हिंदुस्थानावर येतील ही गोष्ट इंडिया आफिसास खोटी वाटते, तरी मुंबई बंदर व इतर बंदरें यांचा चांगला बंदोबस्त असावा हा विच्यार विलायतेस मानवला आहे.

## वऱ्हाड.

हैदराबाद कंटिनेंट पैकीं डा. ईव्हस यांस वऱ्हाडच्या स्यानिटरी कमिशनरची जागा मिळाली ती त्यांस न मिळतां डा. लिडल साहेब अकोल्याचे सिविल सर्जन यांस मिळाली असती तर चांगलें झालें असतें. व त्यांची हुशारी व हक्क त्या जागेस योग्य होता. अशा मतलबाचें मुंबई ग्याझेटांत एक पत्र छापिलें आहे. व त्यांत असेंही लिहिलें आहे कीं ही जागा कायमची भरते वेळीं तरी या गोष्टीचा विचार होईल. व खात्याबाहेरच्या मनुष्याची भरती करून हक्कदाराची बढती बुडविणार नाहींत.

उमरावतीचे माजी स्टेशन मास्तर रा. रा. विष्णु सखाराम हल्लीं मुंबईकडे गुड्स खात्यांत आहेत व तिकडे त्या खात्यांतील बहुत लोकांवर लांच खाल्याचें आरोप आले आहेत त्यांत यांवरही लखमसी पुनसी याजकडून ३० रुपये [illegible] घेतल्याचा आरोप असून वारंट [illegible]लेले होतें तेव्हां त्यांनीं ५००० रुपयाचा जातमुचलका व अडीच अडीच हजार रुपयांचे दोन जामीन दिले व खुले झाले. हे नुकतेच तिकडे गेलेले आहेत तेव्हां यांचा हात त्या भ्रष्टकृत्यांत नसावा असें ह्मणतात व वऱ्हाडांत त्यांनीं काम चांगल्या प्रकारें केल्याचा लौकिक आहे तेव्हां ते मोकळे होतील अशी आह्मी आशा करितों.

मि. रीड साहेब इरिगेशन खात्यांकरितां इकडे इंजिनियर नेमिलेले विलायतेस रजेवर गेले होते ते परत आले. आतां हें खातें पब्लिकवर्क्स खात्यांतून काढून पुन्हा स्वतंत्र करतात कीं काय पहावें. रीड सा. विलायतेत एल एल डीची परीक्षा देऊन तींत पास होऊन आले असें समजतें.

कापाशिच्या सवद्यांत वीस रुपयावरील पावतीस एक आण्याचें टिकीट लावणें अवश्य आहे तें लावण्याची इकडील व्यापारांत वहिवाट नाहीं असें दिसून आल्यावरून यापुढें तसे पावतीस टिकीट लावीत जावें, नाहींपेक्षां शिक्षा दण्यांत येईल असा कमिशनर साहेबांनीं ठराव केला आहे.

शाळाखात्यांकडील इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. श्रीराम भिकाजी जटार थोडे दिवसाचे फुरसतीनें कौल पुण्यास गेले.

क्या० लेन साहेब पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल यांजकडे गुदस्त सालीं जेलच्या इन्स्पेक्टर जनरलचें काम दिलेलें आहे. व आतां रेजिस्टर जनरलचेंही काम त्यांकडेसच देण्याचा विच्यार आहे असें टाइम्स मध्यें लिहिलें आहे. स्वतंत्र कामदार न नेमितां काटकसरीनें कमी खर्च व्हावा यासाठीं या योजना आहेत असें सदर पत्रकर्ता ह्मणतो.

मि० पोप साहेब एक्झिक्युटिव इंजिनियर हक्काची रजा घेऊन जाणार व त्यांचें काम मि० लाब साहेब पहाणार.

उमरावतीचे डिपुटी कमिशनर ले. कर्नल मेकंजी यांस अधिकार मिळाले ते.

१ क्रिमिनल प्रोसिजर यांतील कलम ३६ यांतील अधिकार

२ कोणत्याही प्रकारचे व कितीही रकमेचे दिवाणी अव्वल दावे पहाण्याचा अधिकार व १०० रुपये पर्यंतच्या खालच्या कोर्टाच्या फैसल्यावर अपील घेण्याचा अधिकार.

३ क्रि प्रो. क. २७ बरहुकूम सेकंड व थर्ड क्लास माजिस्त्रेटचे ठरावावर अपिलें घेणें व फौ० खटल्याची चौकशी करणें.

उमरावतीचे तहशिलदार रा. रा. गिरिराव रामचंद्र यांस सेकंड क्लास माजिस्त्रेटचा व ५० रु. पर्यंतचा दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार दिला.

मंगरूळचे तहशिलदार रा. रा. लक्ष्मणसिंग बाळाराम व पुसदचे तहशिलदार मि. बाकरअली यांस फर्स्ट क्लास सिविल जडजाचे अधिकार दिले.

मेजर लाटण साहेब यांचे रजेंत बर्गाबर्गी झाली ती अशी— मि० ताजुद्दीन साहेब सेकंड क्लासच आफिशिएटिंग फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर व मि० हेर साहेब थर्ड ग्रेडचे आफिशिएटिंग सेकंड ग्रेड असिस्टंट कमिशनर झाले.

वणीचे तहशि. मि. सी. शेषाचलम् मुदालियार यांस २० दिवसांची रजा मिळाली व त्यांचे गैरहजीरींत रा. रा. पुरुषोत्तम पांडुरंग यांस आफि. तहशि. नेमिलें.

अकोला जेलच्या सुपिन्टेन्डेन्टचें काम मि० डेविस साहेब यांकडे होतें तें डा० लिटिल सा. याकडे दिलें.

मि० राईट साहेब फर्स्ट ग्रेड पोलिस सुपिन्टेन्डेन्ट रजेवरून परत आल्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें बदल्या झाल्या.

क्या० गनत्राप साहेब आफिशियेटिंग फर्स्ट ग्रेड होते ते सेकंड ग्रेड झाले.

मि० मोफट साहेब आफिशियेटिंग सेकंड ग्रेड झाले होते ते थर्ड ग्रेड झाले.

इकडे युरोपियन लोक व्हालंटियर पलटणीची तयारी करीत आहेत त्यांची भरती ९० पर्यंत झाली आहे असें कळतें.

उर्दूअखबारचे मराठी एडिटर यांनीं आह्मांस पत्र लिहून कळविलें आहे कीं ते व्हारे एथील मन्याबा यांजवर जबरीच्या संभोगाचा आरोप असल्याचें त्यांचे कालचे पत्रांत प्रसिद्ध झालें आहे ती बातमी खोटी आहे. व ती तशी प्रसिद्ध झाल्याबद्दल ते दिलगीर आहेत.


## जाहिरात.

तमाम लोकांस जाहीर होण्यास्तव कळविण्यांत येतें कीं, अकोले म्युनिसिपाल हद्दींत जे लोक कुत्रे बाळगतील त्यांजवर दर कुत्र्यास दर साल चार आणे कर बसविण्याचा हेतु आहे. त्यास ज्यांची तक्रार असेल त्यांणीं आपले तक्रारीचा अर्ज आजतारखेपासून १५ दिवसांचे आंत कमिटीकडे पाठवावे ह्मणजे त्यांचा कमिटी विचार करील कळावें. तारीख २५ माहे मे सन १८७८ इसवी.

V. K. Desai
व्हाईस सेक्रेटरी,
अकोले म्यु. क.


## वर्तमानसार.

हिंदुस्थानांत मीठ पिकविण्याच्या कारखान्याची सरकारानें गादी करावी असें हिंदुस्थानांतील एका कामदारानें विलायतेतील पत्रांत लिहिलें आहे. तो ह्मणतो कीं, त्यापासून पुष्कळ फायदे आहेत. एक मासे खारविण्याचा व्यापार पुष्कळ चालेल. दुसरा, मिठाच्या कायद्याविरुद्ध गुन्हे करणारे पकडण्याचा व त्याच्या तजविजीचा सरकारचा त्रास वाचेल. तिसरा, दस्तुरी जमा करण्यास जो खर्च येतो त्यांत पुष्कळ बचत राहील. व या खात्याचे कामदार दुसऱ्या दारू वगैरेच्या खात्याकडे देण्यास सवड होईल. आणि चवथा फायदा हा कीं, मिठाचा व्यापार इंग्लंड व हिंदुस्थान यांत चांगला चालेल.

पुढच्या नोवेंबर महिन्यांत कलकत्यास रेलवे कान्फरन्स भरणार आहे. बहुत दिवस हें भरण्याची वाटाघाट चालू होती. हिंदुस्थानांतील व ब्रह्मदेशांतील प्रत्येक इलाख्याच्या सरकाराकडून व प्रत्येक रेलवे कंपनीकडून या सभेकरितां मनुष्यें पाठविलीं नाहींत असा विच्यार झाला आहे. तसेंच तिन्ही इलाख्याच्या चेंबर आफ कामर्स व प्रसिद्ध शहरांतील मोठमोठे युरोपियन व नेटिव व्यापारी यांनींही आपल्या तर्फे कोणी पाठवा असें सरकार कळविणार आहे. सारांश रेलवेच्या कामीं कोणत्याही प्रकारची सुधारणा कोणीही कळवावी व त्याचा विच्यार व्हावा असा सरकारचा मानस आहे.

काबुलचा अमीर अफगाणिस्थानचे हदीवर फौजा जमवीत आहे व खिलात आणि केटा एथें असणाऱ्या इंग्लिश फौजेसी जे सरदार लोक सलोख्यानें नाहींत त्यांसी कांहीं खटपट करीत आहे व ज्या लोकांस अमीराचें इंग्लिश सरकारासी सख्यत्व असणें आवडत नाहीं त्यांची मनधरणी करीत आहे अशा बातम्या आल्या आहेत. पण त्याप्रमाणें घडेल असें नाहीं. व तसें घडल्यास त्याचीं शंभर वर्षें भरलीं व त्याची प्रजा त्याच्या जुलमातून सुटली असें ह्मणावें लागेल.

कराचीस मि. सीव राइट ह्मणून रेलवे आसिस्टंट इंजिनियर आहेत ते आपले बंगल्यांत माडीवर निजले होते तेथें फार उकडूं लागलें ह्मणून त्यांनीं अंगणाकडील बाजूची खिडकी उघडी ठेविली व पुन्हा निजले. नंतर झोपेंतून उठून त्या खिडकींतून नीट बाहेर चालले तों २० फूट खालीवर खालीं जमीनीवर पडले. व पडतां पडतां खालीं एका छपराला लागून घासटले यामुळें त्यांस पुष्कळ लागलें व ते बेशुद्ध झाले. लागलीच डाक्टर आणून औषधोपाय केला. पण जबर लागलें असल्यावरून अजून कांहीं भरंवसा वाटत नाहीं.

इंडस व्हाली स्टेट रेलवे ह्मणजे सिंधू नदीच्या कडेची सरकारी आगगाडी आणखी एका महिन्यानें चालू होईल. सतलज नदीच्या पुलाचें काम मोठ्या झपाट्यानें चालू आहे.

सुरतेचे डिपुटी कलेक्टर रा. ब. काशिनाथ महादेव थत्ते यांस अमदाबादेस नेमणार कारण तेथील डिपुटी कलेक्टर मि. कुवरजी कावसजी हे पेनशन घेणार आहेत असें ह्मणतात.

मि. पेडर साहेब यांस नवीन कराचे कामावर मुंबई इलाख्यांत नेमिलें आहे. व त्याकरितां त्यांच्या पगाराशिवाय ९०० रुपये यांत अलाविन्स देण्याचा ठराव झाला आहे. त्यांची स्वारी इलाखाभर फिरून प्रांताची व लोकांची स्थिति पाहात आहे. हल्लीं ते रत्नागिरी, कारवार या भागाकडे आहेत. सारी पाहणी करावयास त्यांना सहा महिने लागतील असें ह्मणतात.

रा० रा० नागोबा सोनोबा डेप्युटी कलेक्टर पुणें यांत पक्षघात होऊन देवाज्ञा झाली.

आफ्रिका खंडाचे दक्षिणेस केप आफ गुड होप एथें इंग्लिश लोकांची वसाहत असून शेजारीं काफरी नामक लोकांचें एक संस्थान आहे. या संस्थानांतील लोकांचा व इंग्लिश वसाहतीचा बेबनाव झाल्यामुळें उभय संस्थानांत लढायी उत्पन्न होईल असें लक्षण दिसत आहे.

चिनी समुद्रांत विलायत सरकारचें आरमार आहे. आरमारवरील मुख्य अधिकार्यास कांहीं गुप्त हुकूम झाला असून आरमार नेहमीचें ठिकाण सोडून दुसरेकडेस जाणार असें कळतें.

मि० लेथाब्रिज यांस हिंदुस्थान सरकारानें प्रेस कमिशनर नेमलें असून त्याकडेस वर्तमानपत्रांत वेळोवेळीं बातमी पोंचविण्याचें काम सोपलें असल्याचें समजतें.

आलजिरीआ नांवाचा प्रदेश उत्तर आफ्रिकेंत आहे. या देशांत शंभर पासून ११८ वर्षें ज्याचें वय आहे असे ८९ लोक असल्याचें एका डाक्टरानें लिहिलें आहे.

गेल्या सालांत हिंदुस्थान व दुसरे देश यांत परस्पर किती व्यापार झाला याबद्दल रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें कीं, गेल्या सालांत बाहेरून ५८,८१,७९,६३७ रुपयांचा माल आला व ६७,४२,१३,६५८ रुपयांचा माल इकडून बाहेर देशीं गेला.

मिसर देशांत सोनें, चांदी, तांबें, इत्यादि बहुतेक धातूंच्या खाणी सांपडल्याचें कळतें.

कौंटेस हेलेना गाझेवस्का नामक एका फार श्रीमान युरोपियन घराण्यांतील स्त्रियेनें मार्सेल्स, नाइस, ब्रुसेल्स, पारिस इत्यादि शहरांत मोठमोठ्या सावकारांस फसवून लक्षावधि रुपयांचें जवाहीर त्यांजवळून उपटलें. हा चोरीचा माल तिनें मोठमोठ्या लोकांस विकला व कोणी कां विकते ह्मणून विचारल्यास लढाईंत घायाळ झालेल्या रशियन शिपायांचे संरक्षणाकरितां विकतें ह्मणून सांगत जाई. ने. ओ.

## डाक्टर, वैद्य वगैरे.

आपल्या देशांत इंग्रेजांचें राज्य स्थापन झाल्यानंतर लवकरच यांनीं जागोजाग सरकारी शाळा स्थापिल्या आणि लोकांस विद्येची अभिरुचि लाविली व चांगले शिक्षण देऊन कांहीं लोक तयार केले. पुढें उत्तरोत्तर जसजशी यांस अधिक गोडी लागूं लागली व लोक विद्या संपादन करण्याविषयीं हटें लागले तसतशी तो जास्ती महाग होत चालली ह्मणजे शाळेची फी, परिक्षेची फी, व पुस्तक संबंधी वगैरे खर्च हा फारच वाढत चालला. परंतु तितकाही सोसून लोकांनीं तीं साध्य करण्याविषयीं अत्यंत उत्सुकतेनें प्रयत्न केला आणि मोठमोठ्या परीक्षा देऊन पास झाल्याचीं सरटिफिकिटें मिळविलीं. व दिवसानुदिवस अशा लोकांची संख्या वाढतच आहे.

अशा प्रकारें सरकारी शिक्षणाच्या योगानें हुशार झालेल्या लोकांपैकीं कित्येकांनीं आपण आपल्या योग्यतेप्रमाणें नव्या होतकरू विद्यार्थ्यांस शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला आणि ह्याच धंदावर ते स्वतंत्रतेनें चरितार्थ चालवूं लागले. शिक्षणपद्धतीचा क्रम इतक्या योग्यतेस आला हें पाहून देशहितेच्छु लोकांस अत्यंत आनंद होतो, ह्यांची ही शिक्षण देण्याची रीति कित्येक गावठी पंतोजींनींही पूर्वीपासून चालत आलेली अप्रशस्त रीति मोडून ही नवीन रीति स्वीकारिली आणि आपआपल्या योग्यतेप्रमाणें त्यांत जय मिळवूं लागले.

हें स्तुत्य सत्कृत्य विद्या वृद्धेच्छु अशा सांप्रतच्या सरकारच्या नजरेस आल्यानंतर त्यांनीं त्या लोकांस उत्तेजन यावें ह्मणून वार्षिक परिक्षेच्या समयीं असल्या शाळेंतील विद्यार्थ्यांचीही परीक्षा घेऊन शाळेची स्थिति पाहून तें काम करणारास यथायोग्य बक्षीस देणें सन १८७० त सुरू केलें. ह्या योगानें दिवसानुदिवस शाळांची स्थिति पुष्कळ सुधारली व थोडक्याच दिवसांत त्यापासून होणारें सुख लोक अनुभवूं लागले. अस्तु. ह्या उदाहरणावरून आमच्या मनांत अशी कल्पना येते कीं, अशाच प्रकारें स्वतंत्रतेनें वैद्यकाचा धंदा करणारे जे लोक आहेत त्यांच्या दवाखान्याची स्थितीही वर्षांतून एक दोन वेळा तपासून ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार सरकारानें त्यांस बक्षिसें देण्याचें सुरू करावें, असें केलें तर त्यांस अधिक उत्तेजन येऊन ते आपल्या दवाखान्यांची व्यवस्था सुधरण्याच्या मार्गास लागतील व त्यापासून अनुपम फायदे होतील ह्यांत संशय नाहीं.

प्रस्तुत वैद्यक कर्माचा असा कांहीं घोटाळा होऊन गेला आहे कीं, ज्याला पाहिजे त्यानें वैद्यककर्म करावें, लागेल तशी व्यवस्था ठेवावी, हव्या त्या वैद्याची व्यर्थ निंदा करून आपलें महत्व मिरवावें आणि लोकांस फसवावें. एकाद्या परीक्षा पास झालेल्या डाक्टराच्या हाताखालीं पांच सहा महिने कंपौंडरचें काम केलें अथवा एकाद्या प्रसिद्ध वैद्याच्या किंवा हकीमाच्या हाताखालीं कांहीं दिवस हस्तकाचें काम केलें कीं बनला वैद्य. लागलेच शेपन्नास बाटल्या, एक दोन कपाटें, कांहीं बुकें, पोथ्या, दोन चार खुर्च्या घेऊन एखादि भाड्याची जागा घेऊन स्वतंत्र धंदा सुरू केलाच ! ! अज्ञानी लोक ह्यांच्या बाह्य स्वरूपास भुलून बिचारे फसतात. यांच्या द्रव्याची खराबी होते ती होतेच; पण याहूनही विशेष हें कीं, शरीराची खराबी होऊन कित्येक वेळा तर यांच्या अमोलिक प्राणावर संकट येऊन बेततें. जसजसे ह्यांच्या पाशांत लोक जास्त सांपडतात व द्रव्यप्राप्ती होऊं लागते तसतसा ह्यांचा नफा इतका वाढत जातो कीं, यांच्या या बाह्य स्वरूपावरून हा वैद्य, डाक्टर आणि हकीम किती योग्यतेचा आहे ह्याचा निर्णय करणें शहाण्यासही कठीण पडतें. मग इतरांची कथा काय? फार काय सांगावें? कित्येक डाक्टरांकडचे हमाल, व वैद्याकडचे गडीही आपल्या धंद्यास सोडून हा पंथ स्वीकारतात ! ! ह्या अशा प्रकारच्या वर्तनानें किती अनर्थ होतात तें सांगण्याची विशेष आवश्यकता नाहीं. कारण थोडे बहुत असले अनर्थ सर्वांच्या पाहण्यांत व एकण्यांत आहेतच.

अशिक्षित वैद्यांपासून असे अनर्थ घडतात व हे घडूं देणें गैर आहे इकडे सरकारचें लक्ष गेलें आहे व ते अनर्थ टळावे ह्मणून सुशिक्षित वैद्यांची संख्या वाढविण्याकरितां पुणें व अहमदाबाद येथें नवीन विद्यालयें स्थापन करण्याचें ठरलें आहे. परंतु आमच्या विचारानें असें येतें कीं ते लोक तयार होतील तेव्हां होवोत पण तूर्त जर नुसती बक्षिसाची आशा दर्शविली तर सुशिक्षित असूनही त्यांच्या दवाखान्यांची स्थिति निष्काळजीनें वगैरे अव्यवस्थित आहे ते ताळ्यावर येतील, त्यांचा कित्ता घेण्याविषयीं अशिक्षित झटतील, व ईर्षेनें यांची बरोबरी करतील व इनाम मिळवतील आणि जे निरुद्योगी, ज्यांना ह्या कर्माची योग्यता नसून हें कर्म करणारे असे ढोंगी निराळे पडतील व बक्षीस न मिळाल्यामुळें यांची अयोग्यता स्पष्ट लोकांच्या नजरेस येऊन तिजपासून होणारे, अनर्थ टळतील. इतर खेडेगांवची गोष्ट असो; पण सांप्रत मुंबईसारख्या सुधारलेल्या शहरांतही असले ढोंगी निःशंकपणें दिमाखानें रहातात व भुलथाप देऊन गिऱ्हाइकाचें मन आपल्याकडे वळवितात. एखाद्या भोळ्या गिऱ्हाइकास नसता भयंकर रोग तुला झाला आहे. असें सांगून काळजींत घालतात आणि किंचित आराम वाटला, ह्मणजे तुला मोठ्या रोगापासून वांचविलें; असें सांगून द्रव्य उपटतात. अशा भासाचे रोग बरे करून व्यर्थ महाव्याधि, कफक्षय, आणि जलोदर इत्यादि रोग बरे केल्याची कीर्ति गातात आणि या आत्म स्तुतीच्या झोकांत असतां, ज्यांस या रोगाची उत्पत्ति, स्थिति, लय, वगैरे कांहींच ज्ञान नाहीं, असे लोक तत्संबंधीं चांगल्या ज्ञात्यासही कांहीं कळत नाहीं असें स्पष्ट बोलतात. काय आश्चर्य हें ! ! ! अहो असल्या लोकांच्या प्रसिद्धपणें वर्तमानपत्रांतुन जाहिराती किंही असतात. ! !

आमची अशी पक्की खात्री आहे कीं, तपासणी होऊन सदरील प्रकारें उत्तेजनाचा प्रकार सुरू झाला तर असे ढोंगी लोक हळू हळू लयास जातील. सरकारचें महत्व वाटेल आणि तेणेंकरून लोक मन गोंतुन सुटून सरकारचे फार आभार मानतील. ने. ओ.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत वंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.